४८।१८६ परशराम त्रिंबक प्रतिनिधी यांजकडील फौज व पायदळ मळ्या घाटाचे घाटमाथा जमा होऊन घाटाखालीं कोंकणांत उतरोन दंगा करणार, ह्मणोन हुजूर विदीत जाहलें. त्यावरून सदरहू बंदोबस्ताचें काम सरकारांतून बाळाजीराम मामलेदार माहालांनिहाय तालुके रत्नागिरी याजकडे सांगोन हे सनद सादर केली असे, तरी तुह्मीं किल्ले व महालानिहाय येथील बंदोबस्त चांगला मजबुदीनें राखोन तेथील नेमणुकी शिबंदीपैकीं लोक दारु व गोळी व पोटाची बेगमी करून देऊन, मशारनिल्हेकडे मळ्याचे वगैरे घाटांचे बंदोबस्तास रवाना करणें. लोकांनीं तेथें जाऊन बाळाजीराम याचे रजातलबेंत वर्तोन यास हजीरी देऊन सरकार लक्ष राखोन हे सांगतील त्याप्रमाणें सरकार चाकरी करीत जाणें. ह्मणोन लोकांस ताकीद करून बाळाजीराम याजकडे घाटमाथा लोक जलद रवाना करणें. घाट व वाटा कोंकणांत उतरावया-

इ. स. १८०४-५. समस मयातैन व अलफ साबान ७.

48. Government was informed that Parasharam Pandit Pratinidhi had collected an army above the Malya ghant, and was about to attack the Konkan. Bal-jiram mamlatdar of Taluka Ratnagiri was directed to proceed against him, and the other officers in Konkan were instructed to assist him.

A. D. 1804-1805.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA

GSL

च्या [illegible]शील त्या पाडणें जाहल्यास बाळाजीराम सांगतील त्याप्रमाणें घाट व वाटा पाहून बंदोबस्त राखणें, ह्मणोन किल्लेदार व महालांनिहायचे मामलेदार वगैरे यांस. सनदा.

२ तालुके अंजनवेल.

१ विठोजी गायकवाड महालांनिहाय यांस.

१ विठ्ठल विश्वनाथ किल्लेहाय यांस.

२

१ परशराम रामचंद्र किल्ले बहिरवगड तालुके अंजनवेल यांस.

२ तालुके रत्नागिरी.

१ बाळाजीराम महालांनिहाय यांस.

१ चिंतो वामन किल्लेहाय यांस.

२

१ आपाजी शिंदे किल्ले महीपतगड यांस.

१ खंडेराव निळकंठ तालुके विजयदुर्ग यांस.

१ आनंदराव धुळप सुभा आरमार, विजयदुर्ग यांस.

१ नारो रामचंद्र तालुके देवगड यांस.

१ विठोजी गायकवाड तालुके सुवर्णदुर्ग यांस.

१ खंडोजी जाधव किल्ले प्रतापगड यांस.

१ परशराम लक्ष्मण किल्ले परळी यांस.

१ नारो गोविंद तालुके रायगड यांस.

१ नारो गोविंद प्रांत राजपुरी यांस.

१ सदाशिव जयराम तालुके अवचितगड.

१ अनंदराव पंडित प्रतिनिधी विशाळगडकरी यांस.

१६

रसानगी यादी.

४९।२३५ राजश्री परशराम पंडित प्रतिनिधी यांजकडे महाल, मुलूख, व किल्ले कोट, वगैरे सरंजामास व सरंजामाखेरीज चालत होते. तें त्यांजकडून दूर करून सरकारांत घ्यावयासी बापूजी गणेश गोखले यांस आज्ञा केली, त्याजवरून त्यांनीं प्रतिनिधीकडील महाल, मुलूख, व किल्ले कोट, वगैरे सरकारांत घेतले. त्यांची जप्ती गोखले यांजकडे आहे. त्यांपैकीं महालगांव वगैरे बितपसील.

इ० स० १८११-१२ इसने अशर मया तैन व अलफ. जिलकाद १४.

49. The territory and forts held by Parasharam Pandit Pratinidhi on Saranjam or other tenure, were formerly taken from him by Bapuji Ganesh Gokhle under the orders of Government and were managed by him. A portion of the territory was now restored to the Pratinidhi.

A. 181I-I2

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · सत्यमेव जयते · भारत सरकार

CSL

१ करियात आठपाडी येथील हिस्सेदार व दुमालेदार खेरीजकरून अमल.
१ परगणें बागेवाडी देहे सतावीस येकूण तनखा, खेरीज हिस्सेदार करून पेशजी प्रतिनिधी मशारनिल्हे यांजकडे फौजेचे बेगमीस सरंजामास लाऊन दिल्हा. ते बेरीज ९८८३०॥ रुपये.

पैकीं वजा, ठाणें परगणे मजकूर सरकारांत ठेविलें आहे. त्याचे लगत कसबे बागेवाडीसुद्धां गांव सरकारांत ठेवावयाचे त्यांची बेरीज ३७२१९॥=॥।.

बाकी बेरीज ६१६१०॥।-। रुपये.

येकूण येकसष्ट हजार साहाशें पावणेअकरा रुपये सवा आणा बेरजेचे लाऊन द्यावे.

× × × × × ×

येकूण महाल व गांव वगैरे येथील सदरहू प्रतिनिधीकडील अमलाची जप्ती गोखले यांजकडून दूर करून सालमजकुरीं परशुराम पंडित प्रतिनिधी यांजकडे जातीस वगैरे बेगमी बदल सरंजामास लाऊन देविला येविसी. सनदा.

राजकीय (ब) इतर माहिती.

(४) आंगरे.

५०।९. राघोजी आंगरे मृत्यु पावले. सबब त्यांजकडील महाल व गांव व जमीनी सरकारांतून सरंजामास होते ते व त्यांजकडील अमलाचे गांव वगैरे यांची जप्ती सन आर्बातिसेनांत तुम्हांकडे सांगितली होती. ते सालमजकुरीं त्यांचे पुत्र मानाजी आंगरे, वजारतमाहा, सरखेल, यांजकडे पेशजीप्रमाणें त्यांजकडील अमल सरंजामास गांव व जमीनी वगैरे आहेत, ते करार करून हे सनद तुम्हांस सादर केली असे, तरी सदरहूची जप्ती मोकळी करून मशारनिल्हेचे दुमाला करणें म्हणोन. सनदा.

इ. स. १७९५-९६. सौन तिसेन मया व अलफ साबान २०.

५१।३६. मानाजी आंगरे वजारतमाहा, सरखेल, यांचा व बाबुराव आंगरे यांचा घरकलह लागला आहे. त्यास बाबुराव आंगरे यांजकडून धोंडजी लंबडे लोक सुद्धां कुलाब्यास गेले आहेत. त्यांचेबरोबर सताविसी महालांनिहाय, येथील कमाविसदार यांचे नांवें सनदा.

इ. स. १७९६-९७. सबा तिसेन मया व अलफ, जिलकाद ३१.

१ आनंदराव राम यांस सनद कीं, प्रांत कर्नाळा येथें कुलाबकराकडील चाकरमाने लोकांचीं घरें असतील तीं जप्त करणें, व किल्ले माणीकगड येथील महालांत वजारतमाहा, याजकडील अमल असेल त्याची जप्ती करून, जप्तीमुळें ऐवज वसूल होईल तो धोंडजी लंबडे यांजकडे देणें म्हणोन.

50, Raghoji Angria having died his territory was attached in A. D. 1793-94. It was now ordered to be continued to his son Manaji Angria.

A. D. 1796-97.

51. A family dispute having ensued between Manaji Angria Wazarat Maha Sarkhel and Baburao Angria, the Angria's revenue in Government territory was ordered to be attached.

A. D. 1796-97.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · संस्कृति मंत्रालय · भारत सरकार

२ रामचंद्र आबाजी याचें नांवें सनद कीं, परगणें शेवगांव येथील दुमाले गांव खेरीज करून, बाबती सरदेशमुखीचे अमलाची जकात सुद्धां मामलत तुह्मांकडे होती. त्यापैकीं कसबे तिसगांव सरकरांत ठेवून बाकी अंमल तुम्हांकडून दूर करून, मशारनिल्हे यांजकडे फौजेचे बेगमीस सरंजाम करार करून देऊन, हे सनद तुह्मांस सादर केली असे. तरी परगणे मजकूरचा सदरील अंमल मशारनिल्हे करतील. ह्मणोन. सनद १.

येविसी जमीदार परगणे मजकूर यांस कीं, मशारनिल्हेसी रुजू होऊन, परगणें मजकूरचा सदरील अंमल सुरळीत देणें. ह्मणोन. सनद.

२

२ रामचंद्र दीक्षित व लक्ष्मीनारायण दीक्षित यांचे नांवें सनद कीं, परगणे ढाकोणी प्रांत हिंदुस्थान, हा महाल तुम्हांकडे होता. त्याचे मोबदला तुह्मांस द्यावयाचा ठरावून परगणे मजकुरचा अंमल मशारनिल्हे यांजकडे फौजेचे बेगमीस सरंजाम करार करून दिल्हा असे. तरी परगणे मजकुरचें ठाणें मशारनिल्हेचें हवालीं करून कबज घ्यावें. ह्मणोन. सनद १.

येविसी जमीदार परगणे मजकूर यांस कीं, मशारनिल्हेसी रुजू होऊन परगणे मजकूरचा अंमल सुरळीत देणें. ह्मणोन. सनद १.

२

१ परगणे पाचोरें प्रांत खानदेश, येथील दरोबस्त अंमल मशारनिल्हे यांजकडे फौजेचे बेगमीस सरंजाम करार करून दिल्हा असे. तरी मशारनिल्हेसी रुजू होऊन परगणे मजकूरचा अंमल सुरळीत देणें. ह्मणोन जमीदार परगणें मजकूर यांचें नांवें. सनद.

१ परगणे वरणगांव प्रांत खानदेश, येथील मोकासा खेरीज करून लळींगचे जहागिरीचे गांव सुद्धां दरोबस्त अंमल मशारनिल्हे यांजकडे फौजेचे बेगमीस सरंजाम करार करून दिल्हा असे. तरी मशारनिल्हेसी रुजू होऊन, परगणे मजकूरचा सदरहू अंमल सुरळीत देणें. ह्मणोन जमीदार परगणे मजकूर यांचें नांवें. सनद.

१ मौजे सविंदणें तर्फ पाबळ प्रांत जुन्नर, येथील मोकासा खेरीज करून, दरोबस्त अमलाची कमावीस खंडेराव यांजकडे होती. ते दूर करून मशारनिल्हे यांजकडे फौजेचे बेगमीस सरंजाम करार करून दिल्हा असे. तरी मशारनिल्हेसी रुजू होऊन, मौजे मजकूरचा सदरहू अंमल सुरळीत देणें. ह्मणोन मोकदम मौजे मजकूर यांचें नांवें. सनद.

१ मौजे मोशी तर्फ हवेली प्रांत पुणें, येथील मोकासी व गोपाळ नारायण

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · संस्कृति मंत्रालय · भारत सरकार

CSL

येकबोटे यांस शंभर रुपये नेमणूक आहे. ते खेरीज करून, दरोबस्त अंमल परशराम रामचंद्र यांजकडे सरंजामास होता. त्याची जप्ति सरकारांत करून, कमावीस राघो बल्लाळ यांजकडे सांगितली आहे. ते दूर करून मशारनिल्हेसी रुजू होऊन अंमल सुरळीत देणें. ह्मणोन मोकदम मौजे मजकूर याचें नांवें.

सनद.

३ परगणें गांडापूर येविसी सनदा.

१ महादाजी नारायण याचे नांवें सनद कीं, परगणें मजकूर येथील मोकासा व बाबती व दुमाले गांव खेरीज करून, दरोबस्त अमलाची मामलत तुह्मांकडे होती. त्यापैकीं मौजे सुरेगांव व मौजे जळके हे दोन गांव सरकारांत ठेवून, बाकी परगणें मजकूरचा अंमल तुम्हांकडून दूर करून, मशारनिल्हे यांजकडे फौजेचे बेगमीस सरंजाम करार करून देऊन, हे सनद तुह्मांस सादर केली असे. तरी परगणे मजकूरचे ठाणें जकिरासुद्धां मशारनिल्हेचे हवालीं करून कबज घेणें ह्मणोन. सनद.

१ खंडेराव जाधव याचे नांवें सनद कीं, परगणें मजकूर येथील बाबतीचे अमलाची कमावीस तुह्मांकडे होती. ते दूर करून मशारनिल्हे यांजकडे फौजेचे बेगमीस सरंजाम करार करून देऊन, हे सनद तुह्मांस सादर केली असे. तरी परगणे मजकूरचा सदरहू अंमल मशारनिल्हे करितील. ह्मणोन

सनद.

१ जमीदार, परगणे मजकूर यांस कीं, परगणे मजकूर येथील मोकासा व दुमालेगांव खेरीज करून, दरोबस्त अंमलापैकीं मौजे सुरेगांव व मौजे जळकें हे दोन गांव सरकारांत ठेवून बाकी जहागीर व सरदेशमुखीचा अंमल महादाजी नारायण यांजकडे व बाबतीचा अंमल खंडेराव जाधव यांजकडे कमाविसीनें होता, तो दूर करून मशारनिल्हे यांजकडे फौजेचे बेगमीस सरंजाम करार करून दिल्हा असे. तरी मशारनिल्हेसी रुजू होऊन परगणे मजकूरचा जहागीर व बाबती व सरदेशमुखी सुद्धां दरोबस्त अंमल सदरहूप्रमाणें सुरळीत देणें. म्हणोन सनद.

३

१७

रसानगी यादी.

जमा जामदारखाना.

६६।५० कमावीसभेट, राजश्री आपासाहेब यांसी बाबत, दौलतराव शिंदे यांचे डेन्यास

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · संस्कृति मंत्रालय · भारत सरकार

CSL

१ चिंतो वामन यांस, कीं दहा हजार रुपयांचे गांव सरकारचे सोईचे तुम्हीं हवालीं करून घेऊन इमानें इतबारें वर्तोन गांवचा अंमल चौकशीनें करून जमाखर्चाचा अजमास अलाहिदा करून दिल्हा जाईल, त्याप्रमाणें वर्तणूक करणें ह्मणोन. सनद.

२ रसानगी यादी.

राजकीय. (ब) इतर माहिती.

(५) सचीव.

इ० स० १७९९-१८००. मया तैन व अलफ. रबिलावल २३.

५५।९८ दुखवटा खर्च, चिमणाजी शंकर सचीव यांचे तीर्थरूप शंकरराव रघुनाथ सचीव मृत्यु पावले, सबब मशारनिल्हेस पुत्र घेतले. त्यांस दुखवटा गोविंदराव बाजी जोशी याजबरोबर पाठविला. रवाना भोर, तसलमात देवराम परदेशी प्यादा दिमत गोविंदराव बाजी. छ १९ रबिलावल.

इ० स० १८००-०१. हिद्दे मया तैन व अलफ. जमादिलाखर २६.

५६।११६ राजश्री चिमणाजी शंकर यांचे तीर्थरूप शंकरराव पंडित सचीव, यांस सन तिसा तिसेनांत देवआज्ञा जाहली. त्यांनीं वर्तमान असतां मशारनिल्हे यांस दत्तपुत्र घेतले. त्यांजकडे सुरनिसी व जिल्हा व सरंजाम व किल्ले कोट वगैरे दौलत पूर्ववत प्रमाणें करार करून, नजर व श्रीमंत महाराज राजश्री छत्रपति स्वामी यांजकडील खर्चवेंच सुद्धां ऐवज सरकारांत ध्यावयाचा करार करून, हे सनद तुम्हांस सादर केली असे; तरी सुरनिसीच्या पदाचीं वस्त्रें पेशजीचे चालीप्रमाणें यांस द्यावयाचीं, त्यांची यादी अलाहिदा पाठविली आहे. त्याप्रमाणें तुम्हीं महाराजास विनंती करून सरकारांतून कृष्णाजी भगवंत कारकून रवाना केले आहेत, त्यांचे हवालीं वस्त्रें करणें. ते त्यांजकडे पावतीं करतील ह्मणोन. कृष्णराव नारायण याचे नांवें. सनद १.

सदाशिव भास्कर याचे नांवें सनद कीं तुह्मीं
व कृष्णराव नारायण मिळोन महाराजास विनंती करून. १

वस्त्रें हवालीं करण्याविसी. २

रसानगियादी.

A. D. 1799-1800.

55. Shankarrao Raghunath Sachiv having died, clothes of condolence were sent to his adopted son Chimnaji Shankar.

A. D. 1800-1801.

56. Shankarrao Pandit Sachiv died in A. D. 1798-99. He adopted Chimnaji Shankar as his son, during his life time, A Nazar was taken from Chimnaji Shankar and the dignity of Surnis, the Zilla revenue, the Saranjam, and forts, and other estate enjoyed by his fathar was continued to him. Krishnarao Narayan the officer of Satara was directed to request the Satara Raja to give the usual dress of honour to Chimnaji Shankar.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · संस्कृति मंत्रालय · भारत सरकार

CSL

१ राजकीय. (ब) इतर माहिती.

(६) दाभाडे व गायकवाड.

इ० स० १७९८-९९ तिसा तिसेन मया व अलफ. जिल्हेज ६.

५७।९५ त्रिंबकराव दाभाडे यांजकडे फौजेचे बेगमीस सरंजाम हुजुरून होता, तो पेशजी सरकारांत जप्त केला. त्याची कमाविस मामलेदार यांजकडे आहे ते दूर करून त्रिंबकराव दाभाडे मृत्यू पावले सबब त्यांचे पुत्र येशवंतराव दाभाडे यांस सेनापतीचें पद सांगोन महालांनिहाय व गांव येथील मोकाशाचा अंमल मशारनिल्हे यांजकडे पेशजी प्रमाणें सरंजाम सालमजकुरापासून करार करून दिल्हा असे. तरी यासी रुजू होऊन अंमल सुदामतप्रमाणें सुरळीत देणें. ह्मणोन जमीदार व मोकदम यांस, व कमाविसदारांस वगैरे सनदा पत्रें.

बाळोजी कुंजर यांच्या कीर्दीपैकीं.

इ. स. १८०१-०२ इसने मयातैन व अलफ.

५८।१४५ आबाजी कृष्ण शेलूकर व गोविंदराव गायकवाड सेनाखासखेल समशेर बहादर, यांच्या परस्परे तालुके अमदाबाद संबंधें लढाया होऊन, तालुके मजकूरचीं ठाणीं गोविंदराव यांणीं घेतलीं. आणि आबाजी कृष्ण यांस मंडळी सुद्धां व त्यांजकडील अमृतलाल गुजर वगैरे यांस हस्तगत करून त्यांची चीजबस्त झाडून दौलत जप्तींत ठेविली आहे. त्यास आबाजी कृष्ण यांस मंडळी सुद्धां व अमृतलाल गुजर वगैरे यांस हुजूर आणविलें असेत. तरी ज्यांचे पायांत बिड्या असतील त्या तोडवून मोकळे करून झाडून कुटुंबासुद्धां मंडळीस बसावयास पालख्या व घोडीं वगैरे सामान लागेल तें व रखवालीस समागमें स्वार व प्यादे व यांची वाटखर्चाची बेगमी करून देऊन, हुजुरून मंगाजी नलवडा व हरजी अहीर खीजमतगार पाठविले आहेत; त्यांजबरोबर देऊन पोहोंचवून देणें. ह्मणोन छं १५ रबिलाखर. सनदा.

१ अनंदराव गायकवाड यांस.

१ रावजी आपाजी यांस.

२

रसानगी याद.

A. D. 1798-99.

57. Trimbakrao Dabhade being dead, his Saranjam which was under attachment, was released and bestowed on his son Yashwantrao. The title of Senapati was conferred on him.

A. D. 1801-1802.

58. Battles were fought between Abaji Krishna Shelukar and Govindrao Gaikwad, Senakhaskhel Samsher Bahadoor, in respect of Taluka Ahamadabad. Govindrao there upon took possession of all the Thanas in the Taluka. and made Abaji and his followers prisoners. Anandrao Gaikwad was directed to release them and to send them to the Huzur.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · संस्कृति मंत्रालय · भारत सरकार

५९।१५७ येशवंतराव दाभाडे सेनापति हे मुलेंमाणसें सुद्धां पेठेंत आहेत. तो मुलें-
इ. स. १८०२–३ माणसें किल्ल्यावर ठेऊन खुद्द वसईस निघोन येणार. त्यांस मशार-
सल्लास मयातैन व अलफ; निल्हेचीं मुलेंमाणसें व चीजवस्त किल्ले याजवर घेऊन बरदास्त
जिलकाद २५ राखणें, हाणोन हसाजी निकम हवालदार किल्ले विसापूर याचे नांवें
सनद १. रसानगी यादी.

---

१ राजकीय. (ब) इतर माहिती.

(७) नागपूरचे भोसले.

जमा जामदारखाना.

इ० स० १७९७–९८ ६०।४१ कमावीस भेट, बाबद रघोजी भोसले सेना-
समा तिसेन मया व अलफ. साहेब सुभा यांचे डेऱ्यास मेजवानीस स्वारी गेली, ते समयीं
जिल्हेज १८. पोषाक दिल्हे. ते गुजारत हाय. सनंगें येकूण. रुपये.

१७०० राजश्री बाबासाहेब यांसी, गुजारत कृष्णाजी अगला खीजमतगार, सनंगें.

येकूण		रुपये.
४५०	मंदील जरी.	१
४५०	चादर जरी.	१
५००	जामेवार जरी, २ दर २५०.	२
३००	किनखाप.	१
१७००		५

१०५० राजश्री आपासाहेब यांसी, गुजारत आबाजी पडवळ खिजमतगार, सनंगें.

येकूण		रुपये.
१५०	तिवट छिट्टी हलपुरी भस्मी.	१
५००	दुपेटा छिटी हलपुरी भस्मी.	१
२००	जामेवार छिटी हलपुरी भस्मी. दर १०० प्रमाणें.	२
		रुपये.
३००	किनखाप.	१
१०५०		५

---

59. The officer of the fort Visapuc was directed to receive the family and property of Yeshwantrao Dabhade, Senapati into the fort, as Yeshwantrao intended to proceed to Bassin (where the Peshwa was now encamped.)

A. D. 1802-1803.

A. D. 1797-98. 60. Bajirao went to a feast at Raghoji Bhosle, Sena Saheb Soobha, at his tent.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · संस्कृति मंत्रालय · भारत सरकार · सत्यमेव जयते

६७३ राजश्री अमृतराव साहेब यांसी, गुजारत राणोजी दुधाणा खिजमतगार. सनगें येकूण. रुपये.

१५०	तिवट छिंटी हलपुरी भस्मी.	१
३५०	दुपेटा छिटी हलपुरी भस्मी.	१
४८	जामेवार छिटी हलपुरी.	२ दर २४ प्रमाणें रुपये.
१२५	किनखाप.	१
६७३		५

५०० राजश्री विनायकराव बापू, गुजारत राणोजी दुधाणा खिजमतगार सनगें. येकूण. रुपये.

५०	तिवट छिटी हलपुरी.	१.
२५०	दुपेटा छिटी हलपुरी.	१.
५०	जामेवार छिटी हलपुरी.	२ दर २५.
१५०	किनखाप.	१.
५००		५
३९२३		३०

६१।४३ राजश्री रघोजी भोसले सेनासाहेब सुभा, यांजकडे संस्थान गढेमंडले येथील रेवा उत्तरतीरचा अंमल द्यावयाचा करार केला असे. तरी सरकारांतून आपाजी रघुनाथ कारकून पाठविले आहेत त्यांचे गुजारतीनें त्यांजकडील अंमलदार येतील, त्यांचे हवालीं संस्थान मजकूर ठाणें जात सुद्धां करून कबज घेणें. ह्मणोन बाळाजी गोविंद याचे नांवें सनद. १.

इ० स० १७९७–९८ समान तिसेन मया व अलफ. जिल्हेज १९.

येविसी सदरील अन्वयें मशारनिल्हेचें नांवें दोन सनदा. २

१ दुसरी सनद कीं, अलाहिदा तुह्मांस सनद सादर जाहली आहे, त्याप्रमाणें हवालीं करणें ह्मणोन.

१ तिसरी सनद कीं, अलाहिदा दोन सनदा सादर जाहल्या आहेत, त्याप्रमाणें हवालीं करणें ह्मणोन.

२ ३

रनानगी याद.

६२।४४ राजश्री रघोजी भोसले सेनासाहेब सुभा यांजकडे किल्ले चौरागड सरंजाम सुद्धां द्यावयाचा करार केला. येविसी सनदा.

इ० स० १७९७–९८ समान तिसेन मया व अलफ. जिल्हेज १९.

A. D. 1797-98. 61. The territory to the north of the Rewa in Sansthan Gadhemandal, was ordered to be handed over to Raghoji Bhosle.

A. D. 1797-98. 62. The fort of Choragad with the Saranjam attached to it, was also ordered to be handed over to him.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · सत्यमेव जयते · भारत सरकार

CSL

३ बाळाजी गोविंद यांस कीं, सेनासाहेब सुभा यांजकडे किल्ले मजकूर सरंजाम सुद्धां द्यावयाचा करार केला असे. तरी सरकारांतून आपाजी रघुनाथ कारकून पाठविले आहेत, त्यांचे गुजारतीनें त्यांजकडील अमलदार येतील त्यांचे हवालीं किल्ला सरंजाम सुद्धां करून कबज घेणें. ह्मणोन. सनद १.

येविसी, सदरहू अन्वयें मशारनिल्हेचे नांवें. सनदा २.

१ दुसरी सनद कीं, अलाहिदा तुम्हांस सनद सादर जहाली आहे, त्याप्रमाणें किल्ला सरंजाम सुद्धां हवालीं करणें. ह्मणोन.

१ तिसरी सनद कीं, अलाहिदा दोन सनदा सादर जाहल्या आहेत, त्याप्रमाणें किल्ला सरंजाम सुद्धां हवालीं करणें. ह्मणोन.

—

२ ३

१ देशमूख व देशपांडे सरंजाम किल्ले मजकूर यांस कीं, सेनासाहेब सुभा यांजकडील अंमलदार येईल, त्यासी रुजू होऊन किल्ले मजकूर येथील सरंजामाचा अंमल सुरळीत देत जाणें. ह्मणोन. सनद.

—

४ रसानगी याद.

६३।१३३ संस्थान गढेंकोट येविसी सनदापत्रें, दौलतराव शिंदे अलीजाबहादर यांचे नांवें सनद कीं, संस्थान मजकूर सरकारचे पेठ्यांतील असतां रघोजी भोसले सेनासाहेब सुभा यांणीं मसलत करून संस्थानास महसरा दिल्हा. हें वर्तमान अखबारें वरून तुह्मांस कळलें. तेव्हां तुह्मीं फौज पाठवून संस्थान हस्तगत केलें. तें संस्थान बाळोजी कुंजर याचे हवालीं करप्याविषयीं तुम्हांस, व हवालीं करून ध्यावयाविशी कुंजीर यास, व संस्थानास आपले कडून उपद्रव न होतां अलीजा बहादर यांजकडील फौजेसी खटला करूं नये, निक्षून ताकीद आपले कडील फौजेंतील सरदारांस करावी, ह्मणोन सेनासाहेब सुभा यांस, याप्रमाणें पत्रें सदाशिव माणकेश्वर यांणीं पेशजी पाठविलीं. त्याजवरून तुह्मीं माधवराव निकम देशमुख नेवासेकर यास छ २६ जमादिलावलचें पत्र पाठविलें. तें त्यांणीं हुजूर आणून दाखविलें. त्यांत मजकूर सेनासाहेब सुभा यांजकडील वकील पुणीयास आहेत त्यांचें पत्र येथील वकील घारपुरे आहेत त्यांचें नांवें आलें आहे कीं, संस्थान गढेकोट प्रकणीं बोलणें जाहलें आहे. येक दोन दिवसांत परवानगी घेऊन पाठवितो. याप्रमाणें लिहिलें आहे. त्यास

इ० स. १८११–१२ इसने अशर मयातैन व अलफ; रजब १०

63. The Sansthan of Gadhekot, though under the jurisdiction of Government was taken by Raghoji Bhosle, Sena Saheb Subha, Daulatrao Scindia having learnt the news from the report of news-writers, sent an army against him; and retook the province. Daulatrao's action was approved and he was directed to hand over the Sansthan to Baloji Kunjir. Raghoji Bhosle was informed of the issue of the order and was directed not to harass the army of the Scindia,

A. D. 1811-12.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA

संस्थान हातांखालीं घालावयाकरितां सेनासाहेब सुभा यांजकडील वकील बोलणें बोलतील, त्याजवरून नजर न देतां संस्थान सरकारचें सरकारांत ठेवावें. सरकारांत ठेविलें असतां यासी गुण फार आहेत. हें ध्यानांत न यावें असें नाहीं. येवेसी तुम्हीं विनंती करून व कारभारी यांजवळ बोलून पक्कें करून कुंजीर याचें स्वाधीन संस्थान करण्याविसी पत्रें आलीं आहेत; त्याप्रमाणें सरकारचें पत्र पाठवावें. ह्मणजे इकडून कोणेविसी गुंता पडणार नाहीं. आज्ञेप्रमाणें घडेल, ह्मणोन विस्तारें लिहिलें. व देशमुख मशारनिल्हे यांणीं विनंति केली. ऐशास संस्थान गढेंकोट हें सरकारचे पेठ्यांतील, सेनासाहेब सुभा यांचा कांहीं तेथें संबंध नसतां घेतात, हें तुम्हांस समजल्यावरून तुम्हीं फौज पाठवून किल्ल्यासुद्धां हस्तगत केलें. हें चांगलें केलें. या करण्यांत हुजूरची मर्जी प्रसन्न झाली. संस्थान बाळोजी कुंजर याचें हवालीं करावयाविसी तुम्हांस पेशजी सदाशिव माणकेश्वर यांणीं लिहिलेंच आहे, व हल्लीं संस्थान सेनासाहेब सुभा यांजकडे देऊं नये, सरकारचें सरकारांत ठेवावें, म्हणोन देशमूख मशारनिल्हे याचें पत्रांत तुम्हीं लिहिलें, हें सलाह उत्तम लिहिली. सेनासाहेब सुभा यांजकडील वकील घारपुरे तुम्हांसी बोलतात, कीं गढेंकोट प्रकर्णीं सरकारांत बोलणें लाविलें आहे. एक दोन दिवसांत परवानगी घेऊन पाठवितों. असें पत्र पुण्याहून सेनासाहेब सुभा यांजकडील वकिलाचें आम्हांस आलें आहे ह्मणोन, त्यास या गोष्टीचा हुजूर संभूत नाहीं. घारपुरे वकील तेथें तुम्हास समजावितात तो मजकूर बातल. येविसी सेनासाहेब सुभा यांस पत्र गढेंकोट संस्थान सरकारचें पेठ्यांतील, तेथें तुम्हांकडून उपसर्ग हरगीज होऊं नये, या मजकुराचें लिहिलें आहे. तुम्हीं संस्थान, महाल, व किल्ले, व ठाणीं जकिरासुद्धां बाळोजी कुंजीर याचे हवालीं करून त्याची पावती घेऊन हुजूर पाठवणें. म्हणोन. सनद १

रघोजी भोसले सेनासाहेब सुभा यांस कीं, संस्थान मजकूर सरकारचे पेठ्यांतील दौलतराव शिंदे अलीजाबाहादर यांणीं सरकारांत घेऊन हुजूर विनंति लिहिली. त्याजवरून दरोबस्त संस्थान बाळोजी कुंजीर याचे हवालीं करण्याविसी अलीजाबहादर यांस हुजुरून लिहिलें आहे. त्याप्रमाणें तें संस्थान कुंजीर याचे हवालीं करतील. आपलेकडील फौज त्या प्रांतीं आहे, त्यांनीं संस्थानासी व अलीजाबहादर यांजकडील फौजेसी खटला करूं नये, ह्मणोन फौजेंतील सरदार यांस निक्षून ताकीद करावी. येविसी सदाशिव माणकेश्वर यांनीं पेशजी आपणास लिहिलेंच आहे. ह्मणोन. सनद १.

राजकीय (ब) इतर माहिती.

(८) शिंदे व होळकर.

६४।१ आपाजी शामजी व बाबाजी अनंत चिकोडकर यांनीं सरकार कामास करत

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA

इ० स० १७९५।९६ सीत तिसेन मया व अलफ, रजब ९

मेहनत बहुत करून काम काजें केलीं. सबब उभयतांस दोन गांव पांच हजार रुपयांचे नूतन इनाम सरकारांतून द्यावयाचा करार सन अर्बा समानीनांत जाहला आहे. त्या ऐवजीं सन अर्बा व सन खमस समानीन दुसाला साडेसात हजार रुपये इतलाख पावले. त्यांस सन सीत समानीना पासून परगणें मजकूर पैकीं इनाम गांव दिल्हे. त्यांची बेरीज. रुपये.

३७५० मौजे निडसोसी करियात मनोळी, हा गांव तुह्मांकडे कमाविसीनें होता, तो दूर करून दिल्हा. त्याची बेरीज. रुपये.

२९४४॥ बाबद आकार, सन खमस समानीन.

१२०९८≈ जाजती भरतीस रुपये.

३७९० (मुळांप्रमाणें आहे.)

१२५० मौजे गिरगांव करियात कट, हा गांव आपाजी शामजी याचें कर्ज करवीर करांकडे येणें, त्या ऐवजीं रदकर्जास गांव आहेत, त्यांपैकीं मौजे मजकूर दूर करून दिल्हा त्याची बेरीज. रुपये.

८४९८≈ ऐन तनखा, होन नाणें ४२४॥८ दर होनीं २ प्रमाणे. रुपये.

४००॥≈ जाजती भरतीस रुपये.

५००० १२५०

येकूण पांच हजार रुपयांचे कमाल आकाराचे दोन गांव, खेरीज हक्कदार, व कदीम इनामदार करून दरोबस्त नूतन इनाम सरकारांतून करार करून देऊन, हे सनद तुम्हांस सादर केली असे. तरी सदरहू प्रमाणें गांव यांचे दुमाला करून गांवचा आकार मशारनिल्हेचें नांवें सन सीत समानीनापासून परगणें मजकूरचे हिशेबीं इनाम खर्च लिहीत जाणें. या सनदेची प्रत लिहून घेऊन असल सनद मशारनिल्हे जवल भोगवटीयास परतोन देणें. म्हणोन बाळकृष्ण लक्ष्मण कमाविसदार परगणें हुकेरी दिमत परशराम रामचंद्र याचें नांवें

सनद.

रसानगी यादी.

आपाजी शामजी यांस, सन समान सबेनांत महादजी शिंदे यांणीं येसाजी शिंदे यांजकडे करवीरास सरकारचे जाबसाला करितां पाठविलें असतां, आपाजी शामजी याचे डोळे जबरदस्तीनें काढिले. व अंताजी शामजी यांचे पुत्र बाबाजी अनंत यांणीं किल्ले भुदरगड येथील राजकारण सरकारचे आज्ञेप्रमाणें केलें. किल्ला सरकारांत आला. सबब उभयतांस

64. Appaji Shamji was sent by Mahadaji Scindia to Yesaji Scindia at Karvir in A. D. 1777-78 to explain some matters on behalf of Government, while there his eyes were forcibly taken out. As a recompense for this loss and in recognition of the service done by his brother's son Balaji Anant, who obtained the fort of Bhudhargad for Government two villages were given to the family in Inam.

A. D. 1795-96.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA

CSL

दोन गांव ५ हजार रुपयांचे कमाल आकाराचे सरकारांतून नूतन इनाम द्यावयाचा करार जाहली आहे. त्याप्रमाणें देणें. यांचे यादींत मखलासी जाहली असे.

इ० स० १७९७।९८ ६५।४९ दौलतराव शिंदे अलीजाबहादर यांजकडे फौजेचे
समान तिसेन मया व अलफ, बेगमीस सरंजाम करार करून दिल्हा. येविसी सनदा.
सफर ७.

२ व्यंकटराव शिवाजी याचे नांवें सनद कीं, जालनापुर येथील मोकासा व बाबती व सरदेशमुखीचा अंमल व दुमाले गांव खेरीज करून, बाकी दरोबस्त अमलाची मामलत तुह्मांकडे होती. ते दूर करून मशारनिल्हे यांजकडे फौजेचे बेगमीस सरंजाम करार करून देऊन, हे सनद तुह्मांस सादर केली असे. तरी परगणे मजकूरचे ठाणें जकिरा सुद्धां याचे हवाली करून कबज घेणें. ह्मणून सनद १.
येविसी जमीदार परगणे मजकूर यांस कीं, मशारनिल्हेसी रुजू होऊन परगणे मजकूरचा सदरहू अंमल सुरळीत देणें. ह्मणोन सनद १.

२ नरसो तुकदेव याचे नांवें सनद कीं, कसबे पुणतांबे प्रांत गंगथडी येथील खेरीज मोकासा करून दरोबस्त अंमल परशराम रामचंद्र याजकडे सरंजामाम होता, त्याची जप्ती सरकारांत करून कमाविस तुह्मांकडे सांगितली आहे. ते दूर करून मशारनिल्हे यांजकडे कसबे मजकूरचा सदरहू अंमल फौजेचे बेगमीस सरंजाम करार करून देऊन हे सनद तुह्मांस सादर केली असे, तरी कसबे मजकूरचे ठाणें जकिरासुद्धां मशारनिल्हेचे हवालीं करून कबज घेणें म्हणोन सनद. १.
येविसी मोकदम कसबे मजकूर यांस कीं,
मशारनिल्हेसी रुजू होऊन अंमल सुरळीत देणें. म्हणोन सनद १.
२

२ मोरो हरी कमावीसदार परगणें नेवासें वगैरे महाल याचे नांवें सनद कीं, कसबे सोनई परगणे मजकूर येथील दरोबस्त अंमल मशारनिल्हे यांजकडे फौजेचे बेगमीस सरंजाम करून देऊन, हे सनद तुम्हांस सादर केली असे. तरी कसबे मजकूर ठाणें जकिरासुद्धां मशारनिल्हेचे हवालीं करून, आकार याचें नांवें परगणें मजकूर येथील हिशेबीं खर्च लिहीत जाणें. म्हणोन सनद. १
येविसी मोकदम कसबे मजकूर यांस कीं, मशारनिल्हेसी रुजू होऊन, कसबे मजकूरचा अंमल सुरळीत देणें. म्हणोन. सनद १.
२

A. D. 1797-98. 65. Daulatrao Scindia Alija Bahadoor was given certain Amals in Pargana Jalnapoor, in Pargana Sewagaum &c. in military Saranjam.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · सत्यमेव जयते · संस्कृति संचालनालय, भारत सरकार

CSL

१ भास्कर लक्ष्मण परणें सांकसें याचें नांवें सनद कीं, कुलाबे याजकडील चाकरमानें लोकांचीं घरें तालुके छतीसी परगणें मजकूर येथें असतील; तीं जप्त करणें, व परगणें मजकूर पैकीं वजारतमाहा, यांजकडील अमलाची जप्ती करून ऐवज वसूल होईल तो धोंडजी लंबडे यांजकडे देणें ह्मणोन.

सनद.

१ बाबुराव पासलकर याचे नांवें सनद कीं, धोंडजी लंबडे तुम्हांस लिहून पाठवितील त्याप्रमाणें पुस्तपन्हा करणें. कुलाबा याकडील चाकरमाने लोकांचीं घरें तालुके अवचितगड येथें असतील त्यांची व वजारतमहा याजकडील, अमलाचीं जप्ती बाबूराव आंगरे करतील त्यांस करूं देणें ह्मणोन.

सनद.

१ अमृतराव पासलकर याचे नांवें सनद कीं, धोंडजी लंबडे तुम्हांस लिहून पाठवितील त्याप्रमाणें पुस्तपन्हा करणें. कुलाब्याकडील चाकरमाने लोकांचीं घरें तालुके उंदेरी येथें असतील त्यांची जप्ती बाबुराव आंगरे करतील त्यांस करूं देणें व तालुके मजकूर येथें वजारतमाहा, यांचा निमे अमल आहे त्याची जप्ती तुम्हीं करून ऐवज वसूल होईल तो लंबडे याजकडे देणें ह्मणोन.

सनद.

४

चार सनदा राजश्री आबाजी कृष्ण शेडूकर, जबाजी गोविंद, नानाजी भानु, दिमत मजकूर.

५२।३७ मानाजी आंगरे, वजारत महा, सरखेल, यांचा व बाबूराव आंगरे यांचा घरकलह लागला आहे. त्यास बाबूराव आंगरे यांजकडील धोंडजी लंबडे लोकसुद्धां कुलाबा प्रांतीं गेलें आहेत. त्यांचे बंदोस्ताबिसी चिठणीसी.

इ० स० १७९६-९७ सबा तिसेन मया व अलफ, जिलकाद २१

पत्रें.

१ मेस्त्र (मिस्तर) सर चारलीस बारे मालीट, गोवर्ण दारे, (गव्हरनर) जनराल (जनरल) बंदर मुंबई यांचें नांवें पत्र, कीं धोंडजी लंबडे दारुगोळी वगैरे सरंजाम बंदर मजकुराहून खरेदी करून आणतील त्यांस आणूं द्यावा. सरखेल याजकडील जैसिंगें आंगरे यांजकडे सदरहू सरंजाम येकंदर जाऊं देऊं नये. व त्यांजकडून जवाहीर मोल करावयास येईल तें अटकाऊन बाबूराव आंगरे याजकडील कारकून येतील त्यांचे हवालीं करावें. ह्मणोन पत्र.

---

52. Baburao Angria sent Dhondji Lawando to Kolaba. Sir Charles Warre Malet, Governor of Bombay was requested to allow Dhondji to purchase ammunition at Bombay and to prevent any ammunition being sent to Jaising Angria of the party of Manaji Angria.

A. D. 1796-97.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · सत्यमेव जयते · भारत सरकार

CSL

१ राजश्री शंकरराव पंडित यांस पत्र कीं, कुलाबकर चाकरमाने तालुके सुधागड येथें असतील त्यांची जप्ती मशारनिल्हेकडील सरदार गेले आहेत ते करितील त्यांस आपणाकडून अडथळा होऊं नये. हरएक साहित्याविसी मशारनिल्हेकडील सरदारांचे लिहिलें तालुके मजकूरीं येईल त्याप्रमाणें साहिय करावें ह्मणोन. पत्र.

१ सदाशिव रघुनाथ यांचे नावें पत्र कीं, परगणें राजपुरी येथील चाकरमाने कुलाबकराकडे असतील, त्यांचीं घरें बाबूराव आंगरे यांजकडील धोंडजी लंबडे गेलें आहेत ते जप्ती करतील त्यास करूं देणें. तुम्हीं अडथळा न करणें ह्मणोन. पत्र.

१ आनंदराव शिंदे यांस पत्र कीं, धोंडजी लंबडे तुम्हांस सांगतील त्याप्रमाणें पुस्तपन्हा हरयेकविसी करीत जाणें, व रेवदंडा पैकीं दारुगोळी द्यावयाविसी अलाहिदा सनद सादर केली आहे, त्या अन्वयें देणें. कुलाबकर चाकरमाने तालुके मजकुरीं असतील त्यांचे घरचीं व आंगरे यांजकडील महालची जप्ती बाबूराव आंगरे करतील त्यांस करूं देणें. व कुलाबियाकडील रयत तेथें आली असेल त्यांजकडील धाऱ्याचा व बाकीचा वसूल हे घेतील त्यांस घेऊं देणें. तुम्हीं जमाव सुद्धां जाऊन कामकाज करणें ह्मणोन. पत्र.

४

चार पत्रें दिल्हीं असत.

५३।२४५ प्रांत कुलाबा येथील बंदोबस्त तुह्मांकडे सांगोन हें पत्र लिहिलें असें, तरी तुम्हीं सरकार लक्ष धरून प्रांत मजकूरचा बंदोबस्त करून निघोन पुण्यास यावें. ह्मणून मानाजी आंगरे वजारतमाहा सरखेल यांचे नांवें चिठणीसी पत्र. १

इ० स० १८१४–१५ खमस अशर मयातैन व अलफ साबान १३

५४।२४७ प्रांत कुलाबा येथील महाल व गांवचा अमल मानाजी आंगरे वजारतमाहा सरखेल, यांजकडे आहे त्याजपैकीं रुपये १०००० दहा हजार रुपयांचे गांव मशारनिल्हे कडून दूर होऊन सालमजकुरापासून सरकारांत आंगरे यांनीं द्यावयाचा करार केला. त्यास सदरहु गांवची मामलत सालमजकुरीं चिंतो वामन यांजकडे सरकारांतून सांगितली येविसी सनदा.

इ. स. १८१४–१५ खमस अशर मयातैन व अलफ; रमजान ४

१ मानाजी आंगरे, वजारतमाहा सरखेल, यांस कीं, दहा हजार रुपयांचे गांव सरकारचे सोईचे मशारनिल्हेचे हवालीं करून कबज घेणें ह्मणोन.

---

53. Manaji Angria Vazarat Maha Sarkhel was appointed to Prant Kolaba and was directed to arrange its affairs and repair to the Huzur.

A. D. 18I4-15.

54. Manaji Angria agreed to surrender villages valued at Rs. 10000 in Prant Kolaba to Government.

A. D. 1814-15.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA

इ. स. १७९७-९८ समान तिसेन मया व अलफ; सफर २६

गोकूळअष्टमीचे उत्साहनिमित्य स्वारी गेली. ते समयीं पोषाक दिला. तो गुजारत रामजी खिजमतगार. सनंगें येकूण रुपये.

४० तिवट छिटी बऱ्हाणपुरी.	१
२५० दुपेटा छिटी बऱ्हाणपुरी.	१
७० किनखाप.	१
२४ शेल साधे धुवट २ दर १२ प्रमाणे.	
३८४	

जमा जामदारखाना.

६७।५९ कमावीसभेट, बाबत दौलतराव सिंदे यांचें लग्न जाहलें सबब खासा स्वारी मेजवानीस लष्करांत डेऱ्यास गेली. ते समयीं पोषाक दिल्हे ते गुजारतहाय. सनंगें येकूण. रुपये.

इ. स. १७९७-९८ समान, तिसेन, मया व अलफ; रमजान २७

८०० राजश्री बाबासाहेब यांसी, गुजारत भोपत खिजमतगार सनंगें येकूण रुपये.

१०० तिवट चुनडी.	१
४५० दुपेटा चुनडी आसवली किनारदार.	१
१९० किनखाप.	१
१०० शेले साधे धुवट बंगाली.	२ दर ५०.
८००	५

४७५ राजश्री आपासाहेब यांसी, गुजारत मल्हारजी तनपुरा खिजमतगार. सनंगें येकूण रुपये.

९० तिवट छिटी हिलपुरी.	१
२०० दुपेटा छिटी हिलपुरी.	१
१२९ किनखाप.	१
१०० शेले साधे धुवट बंगाली.	२ दर ५० प्रमाणें रुपये.
४७५	५
१२७९	१०

जमा जामदारखाना.

इ. स. १७९८।९९. तिसा तिसेन मया व अलफ. मोहरम ३.

६८।६६. कमावीस भेट बाबदहाय, सनंगें येकूण रुपये.

A. D. 1797-98. 66. Appasaheb went on a visit to Daulatrao Scindia at his tent on the Gokul Ashtami festival.

A. D. 1797-98. 67. The Peshwa went to Daulatrao Scindia's tent for a dinner party given in honour of the latter's marriage.

A. D. 1798-99. 68. The Peshwa went to Khadki to pay a visit to Laxumibai, widow of Mahadaji Scindia.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · संस्कृति संचालय · भारत सरकार

GSL

७२१ बाबद लक्ष्मीबाई महादजी शिंदे यांची स्त्री यांजकडे खडकीचे मुक्कामीं भेटीस गेले, ते समयीं दिल्हीं तीं सनंगें. येकूण रुपये.

३०८ राजश्री रावसाहेब यांनीं लष्करांतून खडकीचे मुक्कामीहून पाठविलीं. गुजारत खंडोजी दहीभाता खिजमतगार, सनंगें

येकूण		रुपये.
३२॥	तिवट पैठणी.	१
१५०	जाफरखानी पैठणी.	१
२०॥	शेले साधे धुवट.	२
१०५	किनखाप.	१
३०८		

२७१॥ राजश्री बाबासाहेब यांसी, गुजारत भिवजी ढवळा खिजमतगार. सनंगें येकूण

		रुपये.
३२॥	तिवट पैठणी.	१
१०५	दुपेठा पैठणी.	१
२१॥	शेले साधे धुवट.	२
११२॥	किनखाप.	१
२७१॥		५

१४१॥ राजश्री विनायकराव यांसी, गुजारत कृष्णाजी पराड खिजमतगार. सनंगें येकूण रुपये.

१८॥	तिवट पैठणी.	१
६२॥	दुपेठा पैठणी.	१
१०॥	शेला साधा धुवट.	१
५०	किनखाप.	॥
१४१॥		३॥
७२१		१३॥

६८८ राजश्री आप्पासाहेब यांसी, गुजारत रामजी जोशी खिजमतगार, सनंगें

येकूण		रुपये.
३०२	बाबत लक्ष्मीबाई महादजी शिंदे यांची स्त्री, यांजकडे खडकीचे मुक्कामीं भेटीस गेले ते समयीं दिल्हीं. सनंगें येकूण रुपये.	
२५	तिवट पैठणी.	१
१५०	दुपेठा पैठणी.	१
२७	शेले साधे धुवट.	२
१००	किनखाप.	१
३०२		५

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · सत्यमेव जयते · संस्कृति मंत्रालय · भारत सरकार

CSL

६९।७९ बदल देणें. दौलतराव शिंदे अलीजाबहादर हिंदुस्थानांत जातात. सबब रवानगीबाबद ऐवज खर्चास द्यावयाचा ठरला आहे. त्यापैकीं राजश्री नारो शिवराम कारकून निसबत दफ्तर.

इ. स. १७९८-९९
तिसा तिसेन मया व अलफ.
रजब २६.

४००००० रुपये.

चार लक्ष रुपये कर्ज गुजारत हरीभक्ती याजपासून कर्जाचा ऐवज सरकारांत घ्यावयाचा करार केला. त्यापैकीं देविले.

७०।८० गंगाजल निर्मळ लक्ष्मीबाई शिंदे यांजकडील बारभाई वगैरे लोक कोंकणांत उतरोन दंगा करितात. त्यांचे बंदोबस्तास हुजुरून गोविंद बल्लाळ कारकून निसबत नारो शिवराम या समागमें स्वार देऊन पाठविले असेत. तरी तालुके मजकूर पैकीं लोक मशारनिल्हेकडे पाठवून ते सांगतील त्याप्रमाणें जागा जागा नाकेबंदी करून बंदोबस्त करणें. त्याजकडील घोडीं पाडाव करून वस्तभाव वगैरे जें सांपडेल तें गोविंद बल्लाळ यांजकडे जमा करणें. हाणोन मामलेदार तालुकेहाय यांचे नांवें सनदा.

इ. स. १७९८-९९.
तिसा तिसेन मया व अलफ.
साबान ३.

१ प्रांत कल्याण भिवंडी निसबत सदाशिव केशव.
१ तालुके राजमाची निसबत नारायणराव रामचंद्र.
१ किल्ले माहुली निसबत परशराम भगवंतराव शिंदे.
१ किल्ले कर्नाळा निसबत परशराम निळकंठ.
१ किल्ले विसापूर निसबत सदाशिव भास्कर.
२ तालुके शिवनेर.
१ रामचंद्र नारायण मामलेदार यांस.
१ नारसांवत हवालदार किल्ले मजकूर.

२

१ तालुके रतनगड निसबत येशवंतराव महादेव.
१ तालुके त्रिंबक निसबत पांडुरंग धोंडाजी.
१ तालुके कावनई निसबत गोविंद रंगनाथ.
१ तालुके वसई व मामले कोहज निसबत बामनाजी हरि यांस.
१ किल्ले लोहगड निसबत राजश्री बाळाजी जनार्दन यांस.

१२ रसानगी नारो शिवराम चक्रदेव कारकून निसबत दफ्तर.

69. Rs. 4 Lacs were paid to Daulatrao Scindia, in past payment of the amount agreed to be paid to him for his expenses, now that he was about to return to his territory in upper India.

A. D. 1798-99.

70. Men in the service of Laxumibai Scindia descended into the Konkan and were harassing the country. A body of Sowars under Govind Ballal was sent to put them down.

A. D. 1798-99.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · संस्कृति मंत्रालय · भारत सरकार

CSL

७१।९९ कमावीस भेट. राजश्री अमृतरावसाहेब यांसी बाबत, दौलतराव शिंदे यांचे
इ० स० १७९७-९८ डेव्यास गोकुलअष्टमीच उत्साहनिमित्त स्वारी गेली, तेसमयीं
मया तैन व अलफ. पोषाक दिल्हा. तो गुजारत राणोजी दुधाणा खिजमतगार
रबिलावल २७. सनगें येकूण. रुपये.

४०	तिवट पैठणी आबासी.	१
२००	दुपेटा पैठणी आबासी आसवली जरी किनारदार.	१
१५०	किनखाप.	१
३०	शेले साधे धुवट २ दर १५.	२
४२०		५

बाळोजी कुंजरच्या कीर्दीपैकीं.

७२।१२५ दौलतराव शिंदे अलीजाबहादर यांजकडे फौजेचे बेगमीस सरंजाम
इ. स. १८००-०१ सालमजकुरापासून करार करून दिल्हा. येविसी छ ३ रमजान
इहिदे मयातैन व अलफ; सनदापत्रें.
मोहरम २२

३ परगणे हवेली विजापूर व परगणे बागेवाडी येथील सरदेशमुखी व बाबती व नाडगौडी व दुमालेगांव खेरीजकरून दरोबस्त अंमल परशराम पंडित प्रतिनिधी यांजकडे फौजेचे बेगमीस सरंजाम चालत होता. तो त्यांजकडून दूर करून मशारनिल्हेकडे हरदु महालांचा सदरहू अमल करार करून दिल्हा. येविसी सनदा.

१ परशराम पंडित प्रतिनिधी यांस कीं, सदरहू महालचीं ठाणीं मशारानिल्हेचे हवालीं करून कबज घ्यावें ह्मणोन.

२ रुजू होऊन अंमल सुरळीत देणें. ह्मणोन हरदु महालाचे जमीदारांस सनदा.

३

२ परगणे देवासें प्रांत माळवा, येथील बाबतीखेरीजकरून दरोबस्त अंमलापैकीं निमे अंमल तुकोजी पवार यांजकडे फौजेचे बेगमीस सरंजाम चालत होता. तो त्याजकडून दूर करून मशारनिल्हेकडे परगणे मजकूरचा सदरहू अंमल करार करून दिल्हा. येविसी सनदा.

---

71. Amritrao Saheb went to Daulatrao Scindia's tent on the occasion of
A. D. 1799-1800. the Gokul Ashtami festival.

72. The following Saranjam was taken from its holders and conferred on
A. D. 1800-1801. Daulatrao Scindia.

1 Pargana Haveli Bijapur and Pargana Bagewadi—taken from Parasha ram Pandit Pratinidhi.

1 Half the Amal in Pargana Dewas, taken from Tukoji Powar.

1 Pargana Sarangpur in Prant Malwa taken from Tukoji Powar and Sadoji Powar.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · सत्यमेव जयते · भारत सरकार · संस्कृति मंत्रालय

CSL

१ तुकोजी पवार यांस कीं, परगणे मजकुरचे ठाणें मशारनिल्हेचे हवालीं करून कबज घेणें. ह्मणोन.

१ जमीदार परगणे मजकूर यांस कीं, रुजू होऊन अंमल सुरळीत देणें. ह्मणोन.

२ परगणे सारंगपूर प्रांत माळवा येथील बावतीखेरीजकरून दरोबस्त अंमल तुकोजी पवार, व सदाशिव पवार, यांजकडे फौजेचे बेगमीस सरंजाम चालत होता. तो त्यांजकडून दूर करून, मशारनिल्हेकडे परगणेमजकुरचा सदरहु अंमल करार करून दिल्हा. येविसी सनदा.

१ तुकोजी पवार व सदाशिव पवार यांस कीं, परगणेमजकूरचे ठाणें मशारनिल्हेचे हवालीं करून कबज घेणें. ह्मणोन.

१ जमीदार परगणे मजकूर यांस कीं, रुजू होऊन अंमल सुरळीत देणें. म्हणोन.

२

७ रसानगीयाद.

बाळोजी कुंजरच्या कीर्दीपैकीं.

इ० स० १८००–०१ इहिदे, मया तैन व अलफ मोहरम २२.

७३।० दौलतराव शिंदे अलीजाबहादर यांचे नांवे सनद कीं, महाल बीत तपसील.

१ परगणे हवेली विजापूर येथील सरदेशमुखी व बाबती व नाडगौडी व दुमालेगांव खेरीजकरून दरोबस्त अंमल.

१ परगणे गोटे येथील दुमालेगांव खेरीज करून तिजाईचा व बावतीचा अंमल.

१ परगणे बागेवाडी येथील सरदेशमुखी व बाबती व नाडगौडी व दुमालेगांव खेरीजकरून दरोबस्त अंमल.

येकूण तीन महालांचा सदरहू अंमल परशराम पंडित प्रनिनिधी यांजकडे फौजेचे सरंजामास होता. तो सालमजकुरीं तुह्मांकडे सरंजामास लावून दिल्हा आहे, तो दूर करून महालांनिहायचा लिहिल्याप्रमाणें अंमल पंडित मशारनिल्हे यांजकडे फौजेचे सरंजामास पेशजीप्रमाणें करार करून देऊन हे सनद तुह्मांस सादर केली असे. तरी सदरहू महालची ठाणीं त्यांचे हवालीं करून कबज घेणें. म्हणोन. सनद १.

येविसी जमीदार यांस कीं, पंडित यांसी रुजू होऊन अंमल सुरळीत देणें. ह्मणोन. सनदा ३.

१ परगणे हवेली विजापूर येथील सरदेशमुखी व बाबती व नाडगौडी व दुमालेगांव खेरीजकरून दरोबस्त अंमल येविसी.

A. D. 1800–1801

73. The Parganas of Haveli Bijapur, Gote, and Bagewadi were taken back from Scindia and ordered to be restored to Pratinidhi.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · सत्यमेव जयते · संस्कृति मंत्रालय · भारत सरकार

CSL

१ परगणे बागेवाडी येथील सरदेशमुखी व बावती व नाडगौडी व दुमाले गांव खेरीजकरून दरोबस्त अंमल येविसी.

१ परगणे गोट येथील दुमालेगांव खेरीजकरून तिजाईचा व बावतीचा अंमल येविसी.

३ ४

रसानगी याद छ २२ जिलकाद.

बाळोजी कुंजरच्या कीर्दीपैकीं.

इ. स. १८००–०१ इहिदे मयातैन व अलफ; मोहरम २२

७४।१२६ देहाय येथील अंमल पेशजीचे अंमलदार यांजकडे चालत होता. तो त्यांजकडून दूर करून सालमजकुरीं दौलतराव शिंदे अलीजाबहादुर यांजकडे फौजेचे बेगमीस सरंजाम करार करून दिल्हा. येविसी छ २४ सवाल. सनदा.

बाळोजी कुंजीराच्या कीर्दीपैकीं.

इ० स० १८०१–०२ इसने मयातैन व अलफ. जमादिलावल २०.

७५।१५१ काशिराव होळकर यांजकडे फौजेचे बेगमीस सरंजाम व इनाम चालत आहे. त्यास मशारनिल्हेस दौलतराव शिंदे आलीजाबाहादर यांजकडे जाण्याची सरकार आज्ञा असतां गेले नाहींत. सबब सरंजाम व इनामाची जप्ती सरकारांत करून, जप्तीची कमावीस कमावीसदार यांजकडे सांगितली असे. तरी यासी रुजु होऊन अंमल सुरळीत देणें. ह्मणोन छ २० जमादिलावल. सनदा.

इ० स० १८०१–०२ इसने मया तैन व अलफ. सफर ३.

७६।१५२ काशिराव होळकर यांजकडे फौजेचे बेगमीस सरंजाम व इनाम चालत आहे. त्यास मशारनिल्हेस दौलतराव शिंदे अलीजाबहादर यांजकडे जाण्याची सरकार आज्ञा असतां गेले नाहींत. सबब सरंजाम व इनामाची जप्ती सरकारांत करून जप्तीची कमाविस लोकाकडे सांगितलेली होती. त्यास हल्लीं पेशजीप्रमाणें सरंजाम व इनाम काशिराव होळकर यांजकडे चालवावयाचा करून जप्ती मोकळी केली असे. तरी मशारनिल्हेसी रुजू होऊन अंमल सुरळीत देणें. ह्मणोन जमीदार व मोकदमास पत्रें.

७७।१५३ गुजराथ प्रांतीं होळकर यांजकडील फौज व पायदळ जाऊन सरकारचे

A. D. 1800-1801. 74. The Amal in few villages in Deccan was also given to Daulatrao Scindia as Military Saranjam.

A. D. 1801-1802. 75. Kashirao Holkar having failed to join Daulatrao Scindia as directed by Government, his Saranjam and Inam were ordered to be attached.

A. D. 1801-1802. 76. The above attachment was ordered to be removed.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA

इ० स० १८०२-०३ सन्नास मया तैन व अलफ. रबिलाखर २६.

महालपैकीं सरभुवन व परगणे बलवड यांस उपद्रव केला. ह्मणोन तुर्ही हुजूर विदित केलें. त्यास गुजराथेंत फौज व पायदळ जाण्याचे मार्ग असतील ते झाडून बंद करावयाकरितां, सरसुभाकडे स्वार व गाडदी व प्यादे यांची नेमणूक आहे; त्याखेरीज जास्ती स्वार व गाडदी नेमून दिल्हे असेत. तरी हे, व राजे रजवाडे, व गायकवाड, व बावचे वगैरे सामील होऊन सरकार लक्ष राखोन सरकार ताल्लुक्यांस काडीमात्र उपद्रव न होतां घांटमाथा सदरेवर सरंजाम पाठऊन, गुजराथ प्रांतीचे झाडून मार्ग बंद करून, मुलखास होळकराकडील उपद्रव लागो न देणें. गायकवाड व संस्थानिक यांस येविसी अलाहिदा पत्रें सादर केलीं आहेत. ह्मणोन आनंदराव रामचंद्र सरसुभा प्रांत मजकूर यांचे नांवें सनद. रसानगी.

इ. स. १८१३-१४. आबौ अशर मयातैन व अलफ. रजब २०

७८।२४२ रामचंद्र बल्लाळ यांचें नांवें पत्र कीं, तुम्हीं चैत्र वद्य पंचमी सालगुदस्त सन सल्लास अशर मयातैनचें विनंतीपत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहलें. परगणे भवरासे वगैरे महाल व ठाणें मल्हारगड येथील मामलतीच्या सनदा माझे नांवें व मामलतीचा बंदोबस्त करून देण्याविसी दौलतराव शिंदे अलीजाबहादर व मल्हारराव होळकर व बाळोजी कुंजर यांस, सरकारचीं पत्रें व मेस्त्र आलफिस्टिन (मि. एलफिन्स्तन) वकील दिमत इंग्रज कलकत्तेकर पुणीयांत आहेत त्यांचे पत्र दौलतराव शिंदे यांचें लष्करांत इंग्रजाकडील वकील आहेत त्यांस, याप्रमाणें पाठविलीं. तीं पत्रें कारकुनाबरोबर शिंदे व होळकर व कुंजर व शिंदे यांचे लष्करांत इंग्रजाकडील वकील आहेत त्यांजकडे पाठविलीं. परंतु महालचा व ठाणें मल्हारगडचा बंदोबस्त होत नाहीं. व सरवरखान पठाण दिमत होळकर यानें परगणे भवरासे व परगणे मुगावली व ठाणें मल्हारगड येथें दंगा करून आपला अंमल बसविला आहे. याजकरितां हल्लीं दुसरीं सरकारचीं पत्रें शिंदे व कुंजर यांस महालचा व ठाण्यांचा अंमल बसवून देवण्याविसी, व परगणे भवरासे व परगणें मुगावली व ठाणें मल्हारगडचा अंमल सरवरखान पठाण यास ताकीद करून सदरहु

A. D. 1802-1803.

77. Anandrao Ramchandra Sir Subha of Gujerath reported that the army of Holkar made in roads in the Parganas of Serbhoovan and Balwad and oppressed the territory. Additional man were therefore sent for the protection of the province, and the Rajas of the province, the Gaikwad, and the Bawaches were requested to afford them full assistance and to guard the roads leading into the province against Holkar.

A. D. 1813-14.

78. At Ramchandra Ballal's request, letters were sent by the Peshwa to Daulatrao Scindia, Malhar rao Holkar, and Baloji Kunjir, asking them to bestow Pargana Bhavarase and the Thana of Malhargad in mamlat to him (Ramchandra). A letter to the same effect was sent by Mr. Elphinstan to the English Agent with Daulatrao Scindia. The request was not complied with and Sarwarkhan Pathan in the service of Holkar usurped the Pargana Bhavarase &c Letters as above were again issued at the request of Ramchandra.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA

[illegible] व ठाणें जकिरासुद्धां माझे हवालीं करण्याविसी मल्हारराव होळकर यांस व पुणीयांतील इंग्रजांचें पत्र शिंदे यांचे लष्करांत इंग्रजांकडील वकील आहेत त्यांस, याप्रमाणें पाठविलीं पाहिजेत. ह्मणोन तुमचे विनंतिपत्र आलें. त्याजवरून दौलतराव शिंदे अलीजाबहादर व मल्हारराव होळकर व कुंजर यांस सरकारचीं पत्रें, व अलफिस्टन वकील दिमत इंग्रज कलकलेकर याचें पत्र शिंदे याचें लष्करांत इंग्रजांकडील वकील आहे त्यांस, सदरहू महाल व ठाण्याचे बंदोबस्ताविसी पाठविलीं आहेत. हीं ज्यांचीं त्यांस देऊन तुह्मीं सरकारचा अंमल परगणे भवरासें वगैरे महालचा व ठाणें मल्हारगडचा बसवून बंदोबस्त यथास्थित करून विनंतिपत्र हुजूर पाठवावें. ह्मणून

पत्र १.

रसानगीयादी.

राजकीय (ब) इतर माहिती.

—:०*०:—

(९) विंचूरकर.

रत्नशाळेपैकीं.

७९।१८० देणें, नरसिंह खंडेराव विंचूरकर यांस स्वारीस पाठविले. सबब निरोपसमयीं विद्यमान खासा शुक्रवारचे वाड्यांत रूबरू पाहोन दिल्हे.

इ. स. १८०४–०५
समस मयातैन व अलफ;
रबिलावल १२

किंमत रुपये.

२२७०॥।।। ऐन.
५६७॥≡ सवाई.

२८३८।≡॥

खाशांस कंठी मोत्याची. बाबद सावळ भक्ती साहुकारपैकीं किंमत रुपये.

१६६०।≡॥ ऐन.
४१५८–॥। सवाई.

२०७५॥–।

शहत.

६ धुगधुगीस घांट साधा किंमत रुपये.

४४८॥।

५ हिरे.
१ पांच. मणीलोलक, वजन रती १४॥।

६

79. Jewelery worth Rs. 2838 was presented to Narsinh Khanderao Vinchurkar when proceediug on a campaign.
A. D. 1804-1805.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · संस्कृति मंत्रालय · भारत सरकार · सत्यमेव जयते

५६ मोत्यें, माळेस वजन टांक ६।३॥। चव २४२।-॥। किंमत रुपये १२११॥≈॥.

६२

एकूण दागीना १.

बाळाजी लक्ष्मण यांस चौकडा मोत्यांचा किंमत रुपये.

६१०।- ऐन.
१५२॥-। सवाई.

७६२॥।≈।

मोत्यें बाबद खरेदी वजीर चंद जोहरी पैकीं वजन रती १०॥≈ येकूण खंडीत किंमत. रुपये ६००.
मोत्यें ४

वजन तोळे सोनें पिंपळ्यास व कोंड्यास शिलकी दर तोळा रुपये १५ प्रमाणें. १०।- रुपये.
एकूण तोळे. -॥≈।

खाजगत खर्च, खासी (खाशाची) आंगठी हिऱ्याची खासगीकडील. त्याचे दांडीचा पाचकिर्डा हारवला, सबब दुसरा लाविला. पाचकिर्डा शिलकी वजन रती ८≈ येकूण दर रतीस रुपये ५ प्रमाणें रुपये. .॥≈ पाचकीर्डा १.
लागवडखर्च दागिन्यांचे लोलक तुटले, त्यांस व नथांस वगैरे वजन लागलें तें किंमत. -॥।-॥। सोने तोळे.

८०।२०३ देणें विठ्ठलराव नरसिंह, नरसिंह खंडेराव यांचे पुत्र, नरसिंह खंडेराव मृत्यु पावले सबब मशारनिल्हेचे दत्तविधान करून सरदारीचीं वस्त्रें दिल्हीं. त्याजवर विद्यमान राजश्री बाबासाहेब यांनीं शुक्रवारचे वाड्यांत रुबरू पाहून दिल्हा. शिरपेच घांट साधा. बाबत लक्ष्मीबाई प्रतिनिधी पैकीं, छ ६ रबिलावल खमस मयातैन, किंमत रुपये.

इ. स. १६०६-:७
सबा मयातैन व अलफ;
सफर ३०

६०० शिरपेच.
१५० सवाई.

७५०

एकूण शहत.

७९ हिरे व हिरकण्या.
१ पाच, मणी व लोलक.

८०

जडाव दागिना १.

80. Narsinh Khanderao having died, Vithalrao was allowed to be adopted as his son and was invested with the dignity of his father.
A. D. 1806-1807.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · संस्कृति मंत्रालय · भारत सरकार

CSL

राजकीय (ब) इतर माहिती.

(१०) पटवर्धन.

इ. स. १७९६-९७
सबा तिसेन मया व अलफ;
जमादिलावल २५

८१।२० किल्ले महिमानगड तर्फ देवरुख महाल परशुराम रामचंद्र यांजकडे होता. तो सरकारांत जप्त करून किल्ल्याचे व महालाचे बंदोबस्तास सरकारांतून शिवाजी बल्लाळ यासमागमें लोक देऊन पाठविले आहेत. त्यांस लोक सुद्धां किल्ल्यावर घेणें. ह्मणोन तुम्हांस पेशजी सनद सादर जहाली आहे. ऐशास तुह्मीं सरकार लक्ष राखोन आहा. येविसी मशारनिल्हेनीं लिहिलें. याजवरून हें अभयपत्र तुह्मांस सादर केलें असे. तरी किल्ले मजकूर जकिरासुद्धां व किल्ल्याचे बेगमीस तर्फ मजकूर हा महाल आहे, तो व परशुराम रामचंद्र यांची वस्तवानी नक्त रोकड वगैरे जे किल्ल्यावर असेल, ते जराबाजरा शिवाजी बल्लाळ यांचे हवालीं करून कबज घेणें. आणि तुह्मीं कोणेविसी वसवसा न धरितां निघोन हुजूर येणें. ह्मणोन भगवंतराव मोहिते हवालदार किल्ले मजकूर यांस. सनद १.

गोंदजी भुजबळराव सरनोवत किल्लेमजकूर यांस कीं, परशुराम रामचंद्र यांची वस्तवानी, नक्त, रोकड वगैरे जे किल्यावर असेल तें जराबाजरा व किल्ला शिवाजी बल्लाळ यांचे हवालीं करणें. हे किल्लेमजकूरचा व किल्ल्याचे बेगमीस देवरुख महाल आहे त्याचा बंदोबस्त करितील. तुह्मीं कोणेविसी वसवसा न धरितां निघोन हुजूर येणें. ह्मणोन सदरहू अन्वयें. सनद १.

२

दोन सनदा दिल्या असेत छ २७ जमादिलावल परवानगी रुबरू. [ह्या महिन्यांत त्यांचीं दुसरीं ठाणीं सरकार हुकुमावरून जप्त झालीं.]

इ० स० १८११-१२
इनन्ने अशर मया तेन व अलफ
सफर ५

८२।२३८ परशुराम रामचंद्र यांजकडे जातीस व फौजेचे बेगमीस महाल व गांवचा अंमल वगैरे सरंजामास चालत होता. त्यास ते मृत्यू पावल्यावर महाल व गांवचा अंमल त्यांचे पुत्र रामचंद्र परशुराम करीत आहेत. त्यापैकीं त्यांजकडून महाल व गांवचा अंमल दूर करून साल मजकूरी परशुराम रामचंद्र यांचे धाकटे पुत्र गणपतराव परशुराम यांजकडे जातीस व फौजेचे बेगमीबदल सरंजामास लाऊन देविला. त्यास महाल व गांवची वगैरे बेरीज रुपये.

---

81. The fort of Mahipatgad in tarf Dewrukh under the management of Parasharam Ramchandra was ordered to be attached. (His other possessions were also ordered to be attached in this month.)

A. D. 1796-97.

82. A portion of the Saranjam continued to Ramchandra Parasharam after his father Parasharam Ramchandra's death was now made over to his younger brother Ganpatrao Parasharam.

A. D. 1811-12.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA

CSL

१७२८९९॥≡ प्रांत कर्नाटक पैकीं.

१२१६७५॥ परगणे मुळगुंद येथील खेरीज दुमाले व नेमणुका करून अमलाची बेरीज.

१३२२४८≡ कसबे इंगळहळी येथील खेरीज नेमणुका करून अमलाची बेरीज.

३८००० परगणे यादवाडपैकीं गांव कसबे मजकुर सुद्धां अडतीस हजार रुपये बेरजेचे.

१७२८९९॥≡

४६२३ परगणें जमखिंडीपैकीं खेरीज कसबे मजकुर ठाणें सुद्धां करून चार हजार सहाशें तेवीस रुपये बेरजेचे गांव.

११९९७। मौजे पळूस तर्फ वाळवें येथील खेरीज दुमाले जमीन करून, अमलाची बेरीज.

४००० कसबे भिलवडी प्रांत मिरज येथील खेरीज दुमाले जमीन करून, निम्मे अमलाची बेरीज सरंजामास लागली आहे. ते रुपये ८००० पैकीं निमे चार हजार, व कसबे मजकुरचे निमें कुरण सरंजामास आहे त्या पैकीं निमें.

१५६७ परगणे कासेगांव पैकीं देहेखेरीज हिसेदार व दुमाले जमीन करून.

मौजे गोपाळपूर.

मौजे टाकळी.

१९६७

३००० मौजे अकलखोप प्रांत पन्हाला येथील निमे अमल व दरोबस्त सरदेशमुखी मिळोन बेरीज लागली नाहीं, सबब अजमासें धरिली आहे. त्यास पुढें कमजास्त होईल तशी धरावी.

१३९०९।- कर्यात तासगांव पैकीं गांव कसबे मजकुरासुद्धां तेरा हजार नऊशें सवा नऊ रुपये येक आणा बेरजेचे.

१०००० संस्थान मुरापूर येथील खंडणीपैकीं तीस हजार रुपये सरकारांत बेरीज धरिली आहे. त्यापैकीं तिजाई. रुपये.

२२१९९६।

येकूण दोन लक्ष येकवीस हजार नऊशें सवा शाहणव रुपये बेरजेचे महाल व गांव वगैरे सदरहूप्रमाणें सरंजामास लाऊन देविले. येविसी सनदा.

१ रामचंद्र परशुराम यांस, कीं वर लिहिल्याप्रमाणें महाल व गांवचा अमल ठाणीं यांचे हवालीं करून कबज घेणें म्हणून.

१० जमीदार व मोकदम गांवगन्नांचे यांस, कीं यांसी रुजू होऊन अंमल मुरळीत देणें. ह्मणोन. सनदा.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · सत्यमेव जयते · संस्कृति मंत्रालय · भारत सरकार

CSL

१ परगणे मुळगुंद येथील जमीदारांस.

१ परगणे यादवाड पैकीं कसबे मजकुरसुद्धां अडतीस हजार रुपये बेरजेचे गांव येविसी जमीदारास.

१ परगणे जमखिंडीपैकीं खेरीज कसबे मजकूर ठाणें सुद्धां करून चार हजार सहाशें तेवीस रुपये बेरजेचे गांव येविसी जमीदारांस.

१ कर्यात तासगांव पैकीं कसबे मजकूर सुद्धां तेरा हजार नऊशें सवानऊ रुपये येक आणा बेरजेचे गांव येविसी जमीदारांस.

१ कसबे इंगळहळी येविसी मोकदम यांस.

१ मौजे पळूस तर्फ बाळवे येविसी मोकदम यांस.

१ कसबे भिलवडी प्रांत मिरज येथील चार हजार रुपये व कुरण निमेपैकीं येविसी मोकदम यांस.

२ मौजे गोपाळपूर व मौजे टाकळी परगणे कासेगांव यांविसीं मोकदम यांस.

१ मौजे अक्कलखोप प्रांत पन्हाळा येथील निमे अमल व दरोबस्त सरदेशमुखी येविसी मोकदम यांस.

१०

११ अकरा सनदा दिल्या असेत. रसानगी यादी.

राजकीय. (ब) इतर माहिती.

(११) रास्ते.

इ० स० १८००-०१ इहिदे मयातेन व अलफ जिलकाद १६

८३।१२१ किल्ले पांडवगड सरंजामाचे गांवसुद्धां आनंदराव भिकाजी यांचे निसबतीस होता. ते मृत्यु पावले. त्यांचे पुत्र माधवराव अनंत हे सरकारचे अपराधी, सबब किल्ले मजकूर सरंजामाचे गांव सुद्धां सरकारांत जप्त करून जप्तीची कमावीस बाळोजी कुंजीर यांजकडे सांगितली असे, तरी तुम्हीं मशारनिल्हेचे रजातलबेंत वर्तोन सरकार लक्ष राखोन अलंग, नौबत, चौकी-पहारे यांचा बंदोबस्त यथास्थित करीत जाणें. ह्मणोन हवालदार व कारकून किल्ले मजकूर यांचे नांवें सनद.

परवानगीरूबरू.

८४।१३५ माधवराव अनंत रास्ते यांचीं मुलें किल्ले कोरीगडाहून निघाली ह्मणोन

---

83. The fort of Pandavgad with the Saranjam attached to it was in the possession of Anandrao Bhikaji. He was dead and his son Madhavrao Anant was under the displeasure of Government. The fort and the Saranjam were therefore attached and made over for management to Baloji Kunjir.

A. D. 1800-1801.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · सत्यमेव जयते

CSL

इ० स० १८०१-०२
इसने मयातैन व अलफ.
रजब ८

अकबार आली त्यास तुम्हीं नाक्यास चौक्या बसऊन बंदोबस्त चांगला राखून त्यामार्गें जाऊं लागल्यास हस्तगत करून, पक्या बंदोबस्तानें हुजूर पोहचाऊन देणें तुह्मांकडील तालुक्यांतून गेल्यास कार्यास येणार नाहीं. ह्मणोन तालुकेहाय व किल्लेहाय येथील मामलेदार यांचे नांवें सनदा.

२३ प्रांत कोकण, येथील मामलेदार यांस सनदा.

१ तालुके वसई व मामले कोहज.

१ महालानिहाय, निसबत खंडेराव निळंकठ यांस.

१ किल्लेहाय, निसबत केशवराव जगन्नाथ यांस.

२

२ प्रांत कल्याण भिवंडी व तालुके नेरळ यांस.

१ महालानिहाय, निजबत बापूजी बल्लाळ यांस.

१ किल्लेहाय प्रांत कल्याण, निसबत नारो बल्लाळ यांस.

२

१ तालुके कर्नाळा, व तालुके आठगांव, निसबत रघुनाथ धोंडदेव यांस.

१ किल्लेमाहुली, निसबत भगवंतराव शिंदे.

२ प्रांत राजपुरी.

१ महालानिहाय, निसबत विठ्ठल जयराम.

१ किल्लेहाय, निसबत आपाजी रामचंद्र.

२

१ तालुके अवचितगड व बीरवाडी, निसबत कृष्णाजी बल्लाळ.

१ तालुके रायगड व तालुके सुवर्णगड, निसबत बाळोजी कुंजीर.

२ तालुके अंजनवेल.

१ महालानिहाय, निसबत रघुनाथ त्रिंबक.

१ किल्लेहाय, निसबत बाबुराव कृष्ण.

२

२ तालुके रत्नागिरी.

१ महाला निहाय, निसबत मोरो अनंत व विठ्ठल नारायण.

१ किल्ले हाय, निसबत भास्करराव जगन्नाथ.

२

---

84. The children of Madhavrao Anant Raste, having escaped from the fort of Korigad, orders were issued to the Mamlatdars of Konkan to be on the look out and to arrest them, if they entered their charge.

A. D. 1801-1802.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA
सत्यमेव जयते
संस्कृति मंत्रालय · भारत सरकार

CSL

१ किल्ले महिपतगड निसबत आपाजी शिंदे.
१ तालुके विजयदुर्ग निसबत बापूजी यास.
१ तालुके सोदन महाल निसबत आनंदराव धुळप.
१ तालुके देवगड निसबत सदाशिव जयराम.
१ प्रांत बेलापूर निसबत त्रिंबक गणेश.
१ तालुके सरसगड निसबत विठोजी गायकवाड.
१ परगणे सांकसें निसबत नारो रामचंद्र व पुरुषोत्तम भास्कर.
१ तालुके उंदेरी निसबत आपाजी बापूजी व महादाजी निळकंठ.
१ तालुके रेवदंडा निसबत बळवंतराव रामचंद्र.

२३

१ किल्ले प्रतापगड निसबत बाळाजी रघुनाथ, यांस सनद.
१ तालुके राजमाची निसबत नारायण रामचंद्र.

२५

रसानगीयादी.

बाळोजी कुंजिराच्या कीर्दीपैकीं.

इ. स. १८०२–३
इसने मयातैन व अलफ;
जमादिलावर २१

१ सिद्दी इब्रामखान यांस कीं तुमचे तीर्थरूप सिद्दी अबदुल करीमखान यांजकडे जहागीर सरकारांतून चालत होती, त्या बेरजेंत परगणें पारचोल प्रांत गुजराथ पैकीं तीन गांवचा अंमल आहे, त्यास ते मृत्यु पावले, त्यांचे पुत्र तुह्मांसुद्धां साहा, यांजपैकीं दुसरे पुत्र सिद्दी इस्मानखान यांणीं हुजूर पुण्याचे मुक्कामीं येऊन विनंति केली कीं, आपले भाऊ पांचजण यांसी येकत्र बनेना, याजकरितां वडील भाऊ सिद्दी इब्रामखान यांजवळ आपले हिशाची सहावी वांटणी मागितली परंतु देत नाहीं, याजकरितां सरकारांतून वांटणी करून देविली पाहिजे. म्हणून त्याजवरून सिद्दी अबदुल करीमखान यांचे नांवें सरकारांतून जहागीर चालत आहे त्याची बेरीज रुपये ८६२५५।≡ शायसी हजार दोनशें सव्वापंचावन रुपये तीन आणे, पैकीं त्यांचे दुसरे पुत्र सिद्दी इस्मानखान यांजकडे सहावे हिशाचे वांटनीचे जहागिरीची बेरीज रुपये १४३७५।।।=।। चवदा हजार तीनशें पावणेंशहात्तर रुपये अडीच आणे, यांसी परगणें पारचोल प्रांत गुजराथ पैकीं सदरहु गांव आहेत त्यापैकीं बेरीज रुपये.

८२४७८≡ मौजे वेडेछा.
४१४६। मौजे कोथा.
१९८२।≡।। मौजे वासण येथील जमा ३५८२।।। पैकीं नेमणूक रुपये.

१४३७५।।।=।।

येकूण चवदा हजार तीनशें पावणे शाहात्तर रुपये अडीच आणे बेरजेची जाहागीर पेशजीचे जाहागिरीपैकीं सालमजकुरीं लाऊन देविली असे. तरी वर लिहिल्याप्रमाणें मौजे वडेछा व मौजे कोथा येथील अमल व मौजे वासणपैकीं एक हजार नऊशें सवाब्यायशीं रुपये साडे तीन आणे नेमणूक सिद्दी इस्मानखान घेतील म्हणोन. सनद.

४ यासी रुजू होऊन अंमल व नेमणुकेचा वसूल सुरळीत देणें म्हणून सनदा.

३ गांवचे मोकदम यांस.
१ मौजे वडेछा.
१ मौजे कोथा.
१ मौजे वासण, येथील नेमणूक रुपये १९८२।≡।। येविसी.
३

१ जमीदार परगणें मजकुरचे यास.
४

९

रसानगीयादी.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · सत्यमेव जयते · संस्कृति मंत्रालय · भारत सरकार

CSL

१ राजकीय (ब) इतर माहिती.

(२१) हैदरअली व टिपू.

१२६।१६. कमावीस भेट राजश्री आपासाहेब यांसी, बाबद टिपू सुलतान बहादर यांणीं पाठविलीं, ती गुजारत मल्हारजी गाइकवाड खीजमतगार, सनगें येकूण रुपये.

इ० स० १७९६-९७. सबा तिसेन मया व अलफ रबिलाखर १.

१४	चिरा जरी, कारचोबी	१.
१६	पटका जरी, कारचोबी	१.
६०	जामेवार जरी, कारचोबी	२ दर ३०.
१००	किनखाप	१.
१९०		५.

जमा जामदारखाना.

१२७।८२. कमावीसभेट राजश्री बाबासाहेब यांसी, बाबत नबाब टिपू सुलतान यांजकडील वकील वाड्यांत भेटीस आले ते समयीं दिल्ही. गुजारत मुरारजी येवला खीजमतगार सनगें येकूण रुपये.

इ० स० १७९८।९९. तिसा तिसेन मया व अलफ. सावान ३.

२४	चिरा जरी, कारचोबी सोनेरी	१.
२३	पटका जरी, सोनेरी कारचोबी	१.
९२॥	जामेवार जरी, कारचोबी सोनेरी	२.
६०	किनखाप	१.
१९९॥		५

१ राजकीय (ब) इतर माहिती.

(२२) यूरोपांतील राष्ट्रें.

(अ) इंग्रज.

१२८।३०. रघुनाथ रणसोड याजकडे मुंबईचें वकीलीचें काम होतें तें दूर करून रामचंद्र कृष्ण याजकडे सांगोन नेमणूक सालीना रुपये.

इ. स. १७९६।९७ सबा तिसेन मया व अलफ, सवाल ३.

A. D. 1796-97. 126. Present of cloths was received by Appasaheb from Tipoo Sultan Bahadoor.

A. D. 1798-99. 127. Tipoo's Agent came to the palace to pay a visit to the Peshwa.

A. D. 1796-97. 128. Ramchandra Krishna was appointed to the office of Government agent at Bombay displacing Raghunath Ransod.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · संस्कृति मंत्रालय · भारत सरकार

CSL

५४२ रघुनाथ रणसोड यास नेमणूक होती त्याप्रमाणें.

रुपये.

३८८ नक्त.

१०० जातीस.

२८८ पर दरबारी आहेत सबब दरमाही खर्चास रुपये.

१२ गाडीस.

१२ पोटखर्चाबद्दल.

२४

बारमाहीचे.

३८८

१५४ ऐन जिन्नस भात गोडें खंडी १० येकूण, दर खंडीस अजमासाचे दराप्रमाणें रुपये १५।=। येकूण.

५४२

१५८ जाजती मशारनिल्हे यांस दिवट्या व आत्फागिरा व पोरगासुद्धां.

७००

येकूण सातशें रुपये नेमणूक सालमजकुरापासून द्यावयाचा करार करून हे सनद तुम्हांस सादर केली असे, तरी सदरहूप्रमाणें सनद पैवस्तगिरीपासून प्रांत बेलापुर पैकीं दरसाल देत जाणें. म्हणोन आपाजी विष्णु याचें नांवें सनद.

रसानगीयादी.

१२९।६१. कमावीस भेट, बाबद कर्नेल पालमर वकील दिमत इंग्रज कलकत्तेकर, यांजकडे मेजवानीस गेले तेथें आली तीं सनगें एकूण रुपये.

इ. स. १७९७।९८
समान तिसेन मया व अलफ
जिल्काद ५.

७५२ राजश्री बाबासाहेब यांसी गुजारत भिवजी ढवळा खिजमतगार, सनगें एकूण.

रुपये.

१७	तिबट.	१.
४५	दुपटा.	१.
२००	शालफर्द.	२. दर १०० प्रमाणें.
२५	पटका.	१.
१३०	शेले साधे.	६.

A. D. 1797-98.

129. The Peshwa went to a feast at Col Palmer's and was given a present of clothes.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · सत्यमेव जयते · संस्कृति मंत्रालय · भारत सरकार

CSL

१५० किनखाप २.
९१॥=मुसेजरसनंग ॥।.

६१८॥= १३॥।
१३३॥ गजवार गज येकूण रुपये.
७५ मखमल गज १० दर ७॥.
५८॥ सकलाद गज ६॥ दर ९.

१३३॥ १६॥
७५२८= सनंगें १३॥। गज १६॥

४३९ राजश्री आपासाहेब यांसी गुजारत रामजी जोरी खिजमतगार सनंगें येकूण.
१८ तिवट १.
३५ दुपटा १.
१८० शालफर्द २ दर ९० प्रमाणें रुपये.
३० पटका १.
७५ किनखाप १.
६९ शेले साधे धुवट ३.

४०३ ९
३६ मखमल गज ४ दर ९ प्रमाणें रुपये.

४३९ सनंगें ९ गज ४.
११९१८= सनंगें २२॥। गज २०॥.

१३०।३९. रामचंद्र कृष्ण यांजकडे मुंबईचें वकीलीचें कामकाज होतें तें सालमजकुरीं त्यांजकडून दूर करून हरि सदाशिव यास सांगोन तैनात सालीना रामचंद्र कृष्ण यास पावत होती ती रुपये ७०० पैकीं वजा दिवट्या, अबदागिरा, व पोरगा मिळोन रुपये सालगुदस्त नेमणूक करून दिल्हे होते ते कमी केले १९८, बाकी मशारनिल्हे यांस तैनात सालीना रुपये.

इ. स. १७९७।९८ समान तिसेन मया व अलफ जिल्हेज ३.

३८८ नक्त रुपये.
१०० जातीस.
२८८ परदरबारी आहेत, सबब दरमहा खर्चास रुपये.
१२ पोटखर्चाबद्दल.

130. Hari Sadashiv was appointed Agent at Bombay in place of Ramchandra Krishna. His annual emoluments were fixed at Rupess 542.

A. D. 1797-98.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · १३८ · सत्यमेव जयते · संस्कृति संचालनालय · भारत सरकार

CSL

१२ गाडीस.

२४

बारमाही रुपये.

३८८

१९४ ऐन जिन्नस भात गोडें खंडी १०, दर खंडीस अजमासें दराप्रमाणें १५।=।. प्रमाणें रुपये.

५४२

येकूण पांचशें बेचाळीस रुपये सालीना करार करून देऊन हे सनद तुम्हांस सादर केली असे, तरी सनद पैवस्तगिरीपासून सदरहुप्रमाणें तैनात प्रांत बेलापूर पैकीं देत जाणें, म्हणोन आपाजी विष्णु याचें नांवें.

सनद १.

रसानगी यादी.

इ. स. १७९८।९९ तिसा तिसेन मया व अलफ जिलकाद १५.

१३१।९३. तालुके रत्नागिरी येथें इंग्रज कलकत्तेकर यांजकडील पलटणें आली आहेत याजकरितां तालुके मजकुरचे बंदोबस्तास दोनशें लोक जाजती जदीद ठेवावयाची आज्ञा जाहली पाहिजे. म्हणोन तुम्ही विदित केलें त्याजवरून हे सनद सादर केली असे, तरी तालुके मजकुरचे बंदोबस्तास लोक असामी २०० दोनशें जदीद तालुक्याचे शिरस्त्याप्रमाणें इंग्रजाकडील पलटणें तालुके मजकुरीं राहतील तोंपर्यंत ठेऊन बंदोबस्त करणें.

इ० स० १७९८-९९ तिसा तिसेन मया व अलफ. जिल्हेज २२.

१३२।९६ कमावीस भेट, राजश्री बाबासाहेब यांसी बाबत मेस्त्रपालमर (मि. पालमर) वकील दिमत इंग्रज कलकत्तेकर श्रीरंगपटणचें लढाईचें वर्तमान सांगावयासी वाड्यांत आले ते समयीं दिल्हीं, तीं गुजारत मुरारजी येवला खीजमतगार. सनगें येकूण रुपये.

१९। चिरा जरी कारचोबी	१.
६७।॥ जामेवार जरी कारचोबी	२.
१९। पटका जरी कारचोबी	१.
६० किनखाप	१.
१६६।	५.

131. An army of the English at Calcatta having gone to Taluka Ratnagiri, the force in the Taluka was increased.

A. D. 1798-99,

132. Clothes were received from Mr. Palmer Agent of the English at Calcatta on the occasion of his visit to the palace to communicate news of the battle of Seringapatan.

A. D. 1798-99.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · संस्कृति मंत्रालय · भारत सरकार

CSL

१३३।११९ बदल देणें परदरबारखर्च, शोरजनराल (सर जॉन शोअर) यांजकडे कलकत्यास लाला चिमणलाल कारकून शिलेदार यास हत्ती व घोडे व पोषाक देऊन सन अर्बा तिसेनांत पाठविलें होते, त्यास खरेदी हत्ती व घोडे करावयास वगैरे तेच सालीं खर्च जाहला. तो रुपये.

इ० स० १८००–०१
हिंदे मया तैन व अलफ.
सवाल २७.

१७४१॥ हत्ती व घोडे खरेदी केले त्यांची किंमत रुपये.

१०३७॥। हत्ती छ ५ जमादिलाखरीं अजिमाबादचे मुकामीं खरेदी केला. नग १ किंमत रुपये.

७०३॥। घोडे खरेदी केले त्यांची किंमत रुपये.

१७४१॥

१०६८/- महात व गडेकरी व मोताददार जदीद ठेविले, त्यांचा तागाईत छ १५ साबान पावेतों मुदत माफक आकार, कलकत्यांहून माघारे जातां येकमहा दिल्हा तो मिळोन. रुपये.

५० नूरेखान वलद पीरखान महात.

१३।-। शेखहुसेन वलद शेखइनायत गडेकरी.

२३॥।-। जहानखान वलद रुस्तुमखान मोताददार.

१८॥।=॥ महमदखान वलद हमीदखान मोताददार.

१०६८/-

९०॥।= हत्ती व घोडे यांस कलकत्यास जातां मार्गी चंदी, रतीब, व वैरण वगैरे खरेदी करून चारिलें त्याची किंमत तागाईत छ १५ साबान पावेतों रुपये.

९९॥।=॥। हत्ती नग १ यास रतीब वगैरे इस्तगबील छ ९ जमादिलाखर मुदत माहे २८११ वजा येकूण तिसा रोज ८१ बाकी एकादशीस मजलींमुळें रतीब चारिला त्या सुद्धां मुदत माहे २८१० रुपये.

३०॥।=। घोडे २ यांस चंदी वगैरे मिळोन रुपये.

९०॥।=

७२॥= हत्ती व घोडे यांस लागवड सामान कलकत्याचें मुकामीं केलें त्यास खर्च रुपये.

---

133. Elephants, horses, and dresses of honor were sent as a present to General Shore of Calcutta in A. D. 1793—94. A. D. 1800-1801.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · संस्कृति मंत्रालय · भारत सरकार

५०॥।≈ हत्ती नग १ यास गाशा व सरी सकलादी केली त्यास रुपये.

२१॥।८ घोडे २ यांस. रुपये.

७२॥≈

७० हुंडणावळ पुण्यांत लाला काशमरी याचें दुकानीं दोन हजार रुपयांची हुंडी कलकत्याची करून घेतली त्यास हुंडणावळ पडली ते रुपये.

२०८१८≈

पैकीं वजासूट मखलासी समयीं घातली ते रुपये ११८≈.

बाकी रसानगीयाद. रुपये २०७०.

दोन हजार सत्तर रुपये तसलमात लाला चिमणलाल कारकून शिलेदार याचे तसल मातीस छ २६ जिलकाद सन सीत तिसेनांत अखेर सालीं पोतापैकीं सदरहु रुपये खर्च पडले आहेत, ते जमा धरून देविले. रुपये.

१३४।१९८ इंग्रजाकडील पलटणे सहा सरकार तैनातीस ठेऊन त्यांचे खर्चास सवीस लक्ष रुपयांचे महाल नांवनिशीवार गुजराथ व कर्नाटक मिळोन अलाहिदा इंग्रजी लिपींचे यादीवर शिक्का केला आहे. त्यांत सवीस लक्ष रुपयांचे बेरजेचे महाल ठरले आहेत, त्यांपैकीं गुजराथेंतील व कर्नाटकाचे महाल यादींत नेमले आहेत. त्या शिक्क्याचे यादीपैकीं इंग्रज आपला अंमल बसवितील त्यास तुह्मीं अडथळा न करणें. ज्या ज्या महालीं अमल बसवितील तेथें बसूं देणें आणि अमक्या महालांत अंमल बसविला ह्मणोन हुजूर विनंति लिहून पाठवणें. ह्मणजे अलाहिदा शिक्क्याचे यादीवरील व तुमचे लिहिणें येईल त्या महालास ताळा पहावयास येईल ह्मणोन सनदा.

इ० स० १८०२–०३ सलास मया तैन व अलफ. जिल्हेज १४.

१ खंडेराव निळकंठ सरसुभा प्रांत गुजराथ यांस गुजराथेंतील महालाविसी.

१ समस्त सरदार महालानिहाय प्रांत कर्नाटक यांस कर्नाटकचे महालाविसी.

२

रसानगीयादी.

---

134. It was settled that the English should keep 6 battalions for service under Government and that they (the English) should be given a territory worth Rs. 26 Lacs in Guzerath and Karnatic as detailed in a separate memo in English. Orders were issued to the officers of Guzerat and Karnatik to allow the English to occupy the territory specified in the memo.

A. D. 1802-1803.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · सत्यमेव जयते · सत्यम शिवम सुन्दरम

CSL

१३५।१६३ इंग्रजांकडील पलटणें सहा सरकार तैनातेस ठेऊन त्यांचे खर्चास सवीस लक्ष रुपयांचे महाल नांवनिशीवार गुजराथ व कर्नाटक मिळोन अलाहिदा इंग्रजी लिपिचे यादीवर शिक्का केला आहे, त्यांत सवीस लक्ष रुपयांचे बेरजेचे महाल ठरले आहेत. त्यांपैकीं गुजराथेंतील महाल यादींत नेमले आहेत. त्या शिक्क्याचे यादीपैकीं किल्ले पारनेरा प्रांत मजकूर व महाल येथें इंग्रज आपला अमल बसवितील. त्यास मशार निल्हेचे स्वाधीन किल्ला करून कबज घेणें हणोन.

इ० स० १८०३-०४ आर्बा मया तैन व अलफ रबिलाबल ७.

सनदा.

१ किल्ले मजकूर निसबत गोविंदराव कृष्ण यांस.
१ हवालदार व कारकून किल्ले मजकूर यांस.
१ परगणें मजकूर निसबत धोंडोराम यांस.

३

रसानगीयाद.

१३६।१६७ सरकारचा व कुंपणी इंग्रज बहादूर यांचे सरकारचा तह वसईचे मुकामीं सालगुदस्ता सनसल्लास मया तैनांत जाहला, ते समयीं कुंपणी इंग्रज बहादूर यांचे सरकारचीं पलटणें सरकारांत चाकरीस ठेविलीं त्यांचे खर्चास प्रांत गुजराथपैकीं परगणें उरपाड वगैरे महाल व प्रांत कर्नाटक येथील प्रांत सावनूर वगैरे महाल मिळोन सवीस लक्ष रुपयांचे बेरजेचे ला-

इ० स० १८०३-०४ आर्बा मया तैन व अलफ. जमादिलाखर. १८.

---

135. The fort and amal of Parnera in Guzerath were included in the territory worth Rs 26 lacs assigned to them(Engltsh) in consideration of their placing 6 battalions at the disposal of Government. Orders were now issued for the surrender of the fort and Mahal in question.

A. D. 1803-1804.

136. It was agreed at the treaty of Bassein concluded in the preceding year with the English that the Peshwa should hand over a territory worth Rs. 26 lacs to the English in consideration of the latter placing 6 battalions at his disposal. Pargana Urpad &c in Guzerath and Prant Sawnur &c in Karnatik worth in all Rs 26 lacs were accordingly made over to the English. A portion of this territory worth Rs. 1916000 was now with the consent of the English taken back by Government. and in lien there of a portion of the territory in Bundelkhand surrendered by Ali Bahadar &c. worth Rs. 1916000 was given to them in Saranjam.

A. D. 1803-1804,

Additional territory in Bundelkhand was also given for the following reasons

worth Rs. 50000. In consideration of the revenue realized from pargana Urpad taken back by Government.

75000 In consideration of the English keeping 1000 Sawars for service under the Peshwa.

500000 In consideration of the English agreeing to pay the expenses of 5000 men entertained by the Peshwa for assisting the English till the close of the war.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA

CSL

लून दिल्हे होते. त्यांपैकीं परगणें उरपाड प्रांत गुजराथ व प्रांत कर्नाटक येथील प्रांत सावनूर वगैरे महाल येकुणीस लक्ष सोळा हजार रुपयांचे बेरजेचे दरोबस्त कुंपणी इंग्रज बहादूर यांचे विचारे पुणीयाचे मुक्कामीं सरकारांत माघारे घेतले. त्याचे मोबदला व जाजतीकलमाबद्दल मिळोन प्रांत बुंदेलखंडाकडे अलीबहादर यांणीं नवा मुद्दख सरकारांत सोडविला त्यांपैकीं कुंपणी इंग्रज बहादूर यांजकडे सरंजामास द्यावयाचा करारांत आला त्या प्रमाणें बेरीज रुपये

१९१६००० पलटणचे खर्चास वसईचे मुक्कामीं सवीस लक्ष रुपयांचे बेरजेचा मुद्दख सरकारांतून लाऊन दिल्हा त्यांपैकीं कुंपणी इंग्रज बहादूर यांचे विचारें परगणें उरपाड प्रांत गुजराथ व प्रांत कर्नाटक येथील प्रांत सावनूर वगैरे महाल दरोबस्त सरकारांत घेतले. त्यांचे मोबदला पलटणचे खर्चास मुद्दख लाऊन द्यावयाची बेरीज रुपये.

१७००००० हल्लीं जाजती कलमाबद्दल बेरीज रुपये

९०००० परगणें उरपाड प्रांत गुजराथ हा महाल सरकारांत माघारा घेतला त्यास उरपाडचे वसुलामुळें जाजती मुद्दख द्यावयाचा तो. रुपये.

७९०००० तुरकस्वार १००० येक हजार जदीद कुंपणी इंग्रज बहादूर यांजकडील सरकारांत चाकरीस ठेवावें. त्यांचे बेगमबिद्दल सालीना कूलतनखा सदरहु येक हजार स्वारांची चाकरीची नेमणूक सरकारांतून होईल तेथें करावी. त्याबद्दल रुपये.

५००००० वसई मुक्कामीं तहनामा जाहला त्यांत पंधरावें कलमांत लिहिलें आहे कीं, लढाईचे प्रसंगीं दहा हजार स्वार व सहा हजार पायदळ वगैरे सरंजाम लढाईस द्यावा त्याही वरता मगदूर करार करितात कीं ह्या फौजेशिवाय तामगदुर दारुगोळी सरंजाम देऊं, असें कलमांत आहे. तें महकूब होऊन हल्लीं करार ठरला कीं, पांच हजार फौज व तीन हजार पायदळ कुंपणी इंग्रज बहादुर यांचे कुमकेस द्यावें, याचा तनखा सरकारांतून पावत जाईल. या खेरीज मसलत अखेर पावेतों पांच हजार मराठी फौज सरकारांत चाकरीस ठेवावी. त्याचा तनखा कुंपणी इंग्रज बहादूर यांचे सरकारांतून देत जावा. त्याजबद्दल मुद्दख द्यावयाचा तो.

(The 15th article in the treaty of Bassin which stipuleted that the Peshwa should send 10000 Sawars and 6000 soldiers for assistance to the English in times of war was cancelled and he was now to furnish only 5000 Sawars and 3000 soldiers.)

400000 In consideration of the expenses required for restoring peace and order in Bundelkhand.

Rs. 1700000

Thd total value of the territory surrendered was Rs. 3616000.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · संस्कृति मंत्रालय · भारत सरकार

४००००० बुंदेलखंडाकडील प्रांतांत शरारतवाले बखेडा करून मुलखाची खराबी करितात. त्यास तंबी करून मुलखाची असुदी व अबादी करावी. त्याचे खर्चाबद्दल मुलूख द्यावयाचा तो रुपये.

१७००००

३६१६०००

येकूण छतीस लक्ष सोळा हजार रुपयांचे बेरजेचे महाल कुंपणी इंग्रज बहादूर यांजकडे नेमून देविले असेत, तरी सदरहु रुपयांचे महाल यांचे हवाली करणें ह्मणोन कारकून दिंमत अली बहादर यांचें नांवे सनद १.

परवानगीरुवरु.

जमा जामदारखाना.

१३७।१६८ कमावीस भेट राजश्री खासा यांस, बरहुकूम कर्नेल कलोष (क्लोज) वकील दिंमत इंग्रज कलकत्तेकर यांणीं इदीची मिठाई पाठविली त्याज बरोबर सनंगें पाठविलीं, तीं गुजारत येसाजी पवार सिंदा पोरगा. सनंगें येकूण किंमत रुपये.

इ० स० १८०३–०४ आर्वा मया तैन व अलफ. रमजान २०.

१५ तिवट पैठणी.

२०० शालफर्द चार १०० प्रमाणें.

४० शेले साधे, बंगाली चार २० प्रमाणें.

१२५ किनखाप काळा १ येकूण.

३८०

१३८।१६९. समुद्रांत फरासी जाहजांशीं व इंग्रजी जाहाजांशीं लढाई होऊन फरासी जाहाज इंग्रजांनीं शिकस्त करून मुंबईस घेऊन आणलें, त्याचा झाडा घेतां तीन सरदार फरासीसी बंदर संगमेश्वर तालुके रत्नागिरी येथें उतरून खुशकीवर आले आहेत, ते सरकारांत आणवावें, म्हणोन खुषरोजी मोदी दिमत इंग्रज कलकत्तेकर यांणीं हुजूर विदित केलें. त्याजवरून हे सनद सादर केली असे, तरी फरासीसाकडील तीन असामी बंदर मजकुरीं उतरले अस-

इ० स० १८०३–०४. आर्वा मयातैन व अलफ सवाल १४.

137. Presents were received fram a colonei agent of the English at Calcutta on account of Christmas.

A. D. 1808-1804.

138. There was a fight between an English and a French vessal at sea. The French vessal was captured by the Englisd and brought to Bombay. It transpired that three French officers of the ship had got down at port Sangameshwar in Taluka Ratnagiri. Khushroji Modi therefore requested on behalf of the English that they should be captured and brought before Government. The Mamlatdar of Ratnagiri was directed to trace them and to send them to Poona.

A. D. 1803-1804.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA

त्यास यांची तुम्ही वाजवी चौकशी करून तीन असामी तेथें असल्यास बंदोबस्तानें हुजूर पोहोंचवून देणें, तेथून निघोन गेले असल्यास कोणीकडे गेले याचा पत्ता लागेल तेथवर लावून हुजूर विनंति पत्र लिहिणें. म्हणोन नारो रामचंद्र मामलेदार तालुके रत्नागिरी यांचें नांवें

सनद १.

रसानगीयादी.

१३९।१७२. बद्दल देणें, पर दरबार खर्च, वसली (वेलस्ली) दिमत इंग्रज कलकत्तेकर यांस हिराबागेंत मेजवानी केली, सबब सनगें दिल्हीं त्यांची किंमत गुजारत खंडेराव निळकंठ. रुपये.

इ० स० १८०३-०४ आर्बा मयातैन व अलफ जिल्हेज २२.

रसानगीयादी.

४८५ जनरल वसली यांस.

२९०	शालजोडी केशरी	१ येकूण.
१५०	किनखाप	१.
४५	मलमली शेले	२ दर २२॥ प्रमाणें.
४८५		४

३७६॥ मेस्तर वायब.

२६२॥	शालजोडी दुसी	१.
९०	किनखाप	१.
२४	मलमली शेले	२ दर १२ प्रमाणें.
३७६॥		४

३६१॥ कर्णेल कोलमन.

२६२॥	शालजोडी सफेत	१.
७५	किनखाप	१.
२४	मलमली शेले	२ दर १२.
३६१॥		४.

१८२ मेस्तर गुडविन.

१०५	शालजोडी	१.
५३	किनखाप	१.
२४	मलमली शेले	२ दर १२.
१८२		४

139. General Wellesly in the service of the English at Calcatta was given a feast by the Peshwa in Hirabag at Poona. Presents of clothes were made to the following persons on that occasion. The names of the English afficers to whom presents were made are given. The total value of the presents was Rs. 3288.

A. D. 1803-1804.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · सत्यमेव जयते · भारत सरकार

CSL

२०६।।। मेजर इसदन. (इसदेल).

११२।। शालजोडी. १.

७० किनखाप. १.

२४। मलमली शेले. २ दर १२८=.

२०६।।। ४.

१७४।।।= कपतान बाकनेल.

१०५ शालजोडी हिरवी. १.

५३ किनखाप. १.

१६।।।= महमुद्या दर ८।≡.

प्रमाणें सनेगें २.

१७४।।।= ४.

१८०।।।= लपटन (लेफटेनेंट) ए. यंग.

११० शालजोडी. १.

५४ किनखाप. १.

१६।।।= महमुद्या. २ दर ८।≡.

१८०।।।= ४.

१३३।।। कपतान नाकस. (नाक्स).

६५ शालजोडी. १.

५३ किनखाप. १.

१५।।। महमुद्या.

८।≡ प्रत. १.

७।- प्रत. १.

१५।।।

१३३।।। ४.

१३४ कपतान कॉमन.

६५ शालजोडी. १.

५५ किनखाप. १.

१४ महमुद्या. २ दर ७.

१३४ ४.

१३७।। डाकतर वेल्स.

६५ शालजोडी. १.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · संस्कृति मंत्रालय · भारत सरकार

CSL

९९ किनखाप.		१.
१७॥ महमुद्या.		२.
९. ८॥.		
१३७॥		४.
१३७॥।≈ मेस्तर इसकरल.		
६९ शालजोडी.		१.
९६ किनखाप.		१.
१६॥।≈ महमुद्या.	२ दर ८।≈.	
१३७॥।≈		४.
१२८॥≈ मेस्तर कलोस. (क्लोज).		
७५ शालजोडी.		१.
३९ किनखाप.		१.
१८॥≈ महमुद्या.	२ दर.	
१७॥।≈.		
१०॥।.		
१२८॥≈		४.
१३६॥ मेस्तर बिलगन.		
६९ शालजोडी.		१.
४९ किनखाप.		१.
२२॥ महमुद्या.		२.
११ ११॥.		
१३६॥		४.
२४७॥ गोविंदराव.		
१४० शालजोडी.		१.
२० तिवट.		१.
७५॥ किनखाप.		१.
१२ मुहमुदी		-॥-
२४७॥		३॥.
१७९ आपाराव.		
१५ तिवट पैटणी.		१.
१२९ शालजोडी.		१.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · संस्कृति मंत्रालय · भारत सरकार · सत्यमेव जयते

CSL

३० किनखाप -॥-
९ महमुदी १
१७९ ६॥
४९॥ रामराव
१३॥ तिबट पैठणी १
३६ शेला जाफरखानी १
४९॥ २
१६॥= सुबराव
१२॥≡ तिबट पैठणी
२४ जाफरखानी
३६॥≡
३२८८।≡ ६३

पैकीं वजा मखलासी समयीं सूट ।≡ बाकी ३२८८ रुपये.

तीन हजार दोनशे अठ्यायशी रुपये, परगणें जंबुसर प्रांत गुजराथ निसबत नरसिंगराव कृष्ण यांजकडे सालमजकूरचे रसदेचा ऐवज येणें त्यापैकीं चैत्र शुद्ध पौर्णिमेचे हप्तयापैकीं देविले.

१४०।१७६. नारायणराव रामचंद्र यांस सरकारांतून कलकत्यास कामगारीस रवाना केलें आहेत, त्यांजबरोबर तुम्हांकडील सरंजामी फौजेपैकीं स्वार असामी येकशें देविले असेत, तरी येकशें स्वार चांगले यांचे दरमाहाची बेगमी करून मशारनिल्हेचे हवालीं करून देऊन, हे कामगिरीहून माघारे येत तोंपावेतों लिहिल्याप्रमाणें येकशें स्वार त्यांजवळ असो देणें. म्हणोन रघुनाथराव बळवंत यांस सनद १. रसानगी यादी.

इ० स० १८०३-०४ आर्बा मयानैन व अलफ, सफर १९

१४१।१७७. १३२२ बद्दल. वसली जनराल (जनरल वेलस्ली) दिमत इंग्रज कलकत्तेकर यांचे डेऱ्यास स्वारी गेली, तेथें सनगें आलीं तें छ २४ सफर.

इ० स० १८०३।०४ आर्बा मयानैन व अलफ सफर २५.

८९२॥ राजश्री बाबासाहेब यांस. जमा गुजारत त्रिंबकजी डेंगळे हस्तें राघोजी गोरा. रुपये.

A. D. 1803-1804. 140. Narayanrao Ramchandra was sent on some mission to Calcutta.

A. D. 1803-1804. 141. Presents were received from General Wellesley on the occasion of the Peshwa's visit to him in his tent.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · संस्कृति मंत्रालय · भारत सरकार

CSL

दुसरे बाजीराव पेशवे यांची रोजनिशी.

२० तिवट पैठणी. १.
२०० शालफर्द २ दर १०० प्रमाणें रुपये.
७० शेले बंगाली कोरे २.

३० प्रत	१.
४० प्रत	१.
७०	२.

५० शेले साधे धुवट बंगाली बुटेदार २ दर २५ प्रमाणें.
३०० किनखाप. १.
२०० जामेवार जरी सफेद. १.
८४० ९

५२॥ सकलाद दुरंगी लाल काळी गज ३॥.
येकूण दर गजीं १५ रुपये प्रमाणें.

८९२॥ गज ३॥ ९

४३६॥ राजश्री आपासाहेब यांस. जमा गुजारत रामजी जोरी खिजमतगार,
सनंगें येकूण किंमत. रुपये.
१२ तिवट पैठणी. १.
२०० शालफर्द २ दर १०० प्रमाणें रुपये.
१७५ किनखाप भरगची लाल. १
३२ शेले साधे. रुपये.

७ प्रत	१
२५ प्रत	१
३२	२

४१५

१७॥ सकलाद जुबर्दी, गज ३॥.
दरगजी ५ प्रमाणें.

४३६॥ ३॥ ६

१३२९ ७ १५

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · सत्यमेव जयते · संस्कृति मंत्रालय · भारत सरकार

CSL

रत्नशाळेपैकीं.

१४२।१८१. देणें. दिमंत इंग्रज कलकत्तेकर यांस निरोप समयीं विद्यमान खासा.

इ स. १८०४।०५ सदरेस रुबरु पाहून दिल्हे. किंमत. रुपये.
खमस मया तैन व अलफ
रबिलावल १४

३३७८।- ऐन.
८४४॥-। सवाई.
४२२२॥।=।

जडाव दागिने.

१ जनराल वेसली (जनरल वेलस्ली) यांस. किंमत रुपये.
२७११॥।- ऐन.
६७७॥।=। सवाई.
३३८९॥।-।-

येकूण दागिने.

१ शिरपेंच घाट साधा, तीन फुलांचा किरणाचा, बाबद नरसिंह खंडेरावपैकीं.

रुपये.

४५० ऐन.
११२॥ सवाई.
५६२॥

शहत.

७९ हिरे, हिरकण्या.
४ माणकें.
१ पाचमणी लोलक.
८४

१ जगो घाट साधा, बदल खरेदी गोपाळशेट सोनारपैकीं किंमत रुपये.
४६० ऐन.
११५ सवाई.
५७५

शहत

A. D. 1804-1805. 142. Jewelry worth Rs. 4222 was presented to General Wellesley and others at the time of their farewell visit to the Peshwa.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · सत्यमेव जयते · संस्कृति मंत्रालय · भारत सरकार

CSL

७४ हिरे हिरकण्या मदनाईकसुद्धां.
१ मोतीं लोलक.

७५

१ तुरा मोत्यांचा, बाबद खरेदी वजीरचंद जोहरी पैकीं छ मजकुरीं खरेदी केला. किंमत रुपये.
६८९ ऐन.
१७२। सवाई.

८६१।

---

४५९ मोत्यें वजन टांक १२॥ ४।८ चव ११५॥८॥ येकूण सर १७ दर सरास २७ प्रमाणें दाणे.
१ दांडीरुपें मुलामा सोनें, व फुदण्यास मुकेस (?).

४६०

१ कंठीं मोत्यांची, बदल सखाराम घाटगे पैकीं किंमत रुपये.
९१७॥।८ ऐन.
२२९।=। सवाई.

११४७।.।

---शहत.

१० धुगधुगी, घाट साधा शहत.

---सुमार.

९ हिरे व हिरकण्या.
१ मोतीं लोलक.

१०

५० मोतीं माळेस वजन टांक ५८॥। चव १६७॥८ एकूण.

६०

१ आंगठी हिऱ्याची, घाट मिनेगार मिना हिरवा व निळा व सफेद, बाबद भेट सावळ भक्ति साहुकारपैकीं, किंमत रुपये.
१९५ ऐन.
४८॥। सवाई.

२४३॥।.

---शहत.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · संस्कृति मंत्रालय · भारत सरकार

CSL

१ हिरा, अष्टपैलु, वजन रती १॥ एकूण.

० सोनें.

१

५

२ मेजर मालकम यास. किंमत रुपये.

६६६॥ ऐन.

१६६॥= सवाई.

८३३४=

दागीने.

१ शिरपेंच, घाट साधा तीन फुलांचा रुप्याचें किर्णाचा. बदल दादाजी व्यंकाजी साहुकार पैकीं किंमत रुपये.

४२५ ऐन.

१०६। सवाई.

५३१।

शहत.

९३ हिरे व हिरकण्या.

९ माणकें.

४ पातास (पानास)

१ लोलक

५

९८

१ जगो घाट साधा, बदल वेंकाजी दादाजी साहुकारपैकीं किंमत रुपये.

२४१॥ ऐन.

६०।= सवाई.

३०१॥।=

शहत.

५८ हिरे, हिरकण्या, मदनाईक, मुद्दां

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · सत्यमेव जयते · संस्कृति मंत्रालय · भारत सरकार

इ० स० १८०४–०५
खमस मया तैन व अलफ.
रबिलाखर १९.

१४३।१८४ जनरल वलजली (वेलस्ली) बाहादूर यांणीं बापूजी गणेश गोखले यांजकडे तालुके सावनूर वगैरे सरकारचीं ठाणीं गैर सनदी होतीं, तीं पंधरा दिवसांत खालतीं करून तुमचे स्वाधीन करावीं, व तुह्मांकडून रुपये ३३०००० तीन लक्ष तीस हजार रुपये दीडा वर्षाचे मुदतीनें मशार निल्हेस देविले, या मजकुराचे ठरावाची याद तुमची व गोखले यांची जनराल यांचे विद्यमानें जाहली, तिची नक्कल जनरलांनी कर्नेल कलोश वकील दिंमत कुंपणी इंग्रज बहादुर यांजकडे पाठविली, वकील महसुफ यांणीं सरकारांत गुजरविली त्याबरून समजलें. त्यास गोखले यांणीं कशाचा ऐवज जनरलांस समजाऊन तुह्मांकडून घेतला, हा जाबसाल गोखले पुणीयास आलीयावर मनास आणितां येईल. जनराल बहादुर यांणीं पंधरा दिवसांत गोखले यांजकडून सावनूर वगैरे ठाणीं तुमचे स्वाधीन करवून तीन लक्ष तीस हजार रुपये तुह्मांकडूत दीड वर्षाचे मुदतीनें गोखले यांस देविले त्याप्रमाणें पंधरा दिवसांचे आंत सावनूर वगैरे ठाणीं तुम्हीं आपले स्वाधीन करून घेऊन तीन लक्ष तीस हजार रुपये गोखले यांणीं ज्या सावकारास वगैरे देविले असतील, त्यांची निशा दीड वर्षाचे मुदतीनें करून देणें. म्हणोन केशवराव बाळकृष्ण मामलेदार सरसुभा प्रांत कर्नाटक याचें नांवें.

सनद १.

रसानगीयादी.

इ० स० १८०४–०५
खमस, मया तैन, व अलफ.
रमजान २६.

१४४।१९० हरि उद्धव यांस सरकारांतून वकिलीचें कामाकरितां कलकत्यास पाठविले आहेत. त्यास मशारनिल्हे तेथें पोहोंचल्यावर त्यास वकीली संबंधी माहितगारी आठा चौरोजांत करून देऊन तुम्हीं निघोन हुजूर येणें ह्मणोन लाला गुलाबराय याचे नांवें चिटणीसी पत्र.

A. D. 1804-1805.

143. It was settled through General Wellesly that Bapuji Ganesh Gokhle should restore to Keshavrao Balkrishna Mamlatdar Sirsubha of Karnatic, Talooka Sawanoor and other Government territory unauthorizedly held by him and that Keshavrao should pay to Bapuji Gokhle Rs. 330000 in a year and a half. An agreement was drawn up to the above effect and a copy of it was sent by General Wellesly to the English agent at Poona, who sent it on to Government. Government had no information as to why the sum of Rs. 330000 was demanded by Gokhle. Inquiries were to be made on the point on Gokhle's arrival at Poona. In the meanwhile the agreement was ordered to be given effect to.

A. D. 1804 1805.

144. Hari Udhav was appointed Government agent at Calcutta in place of Lala Gulabray. The latter was directed to give the necessary information regarding the duties of the office to Hari Udhav in a week and to repair to Poona.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · सत्यमेव जयते · भारत सरकार

CSL

१४५।१९३ देणें, सार्जि मिसमिकीन रिकार्डर कोडदचा (कोर्टाचा) मुखत्यार दिमत इंग्रज कलकत्तेकर मुंबईस राहतात, ते वाड्यांत भेटीस आले सबब विद्यमान राजश्री बाबासाहेब, रुबरु पाहून दिल्हे. ते किंमत. रुपये.

इ० स० १८०५-०६ जीत मया तैन व अलफ. सवाल ७.

१४७९८/- ऐन किंमत.
३६९॥।-। सवाई.
१८४८॥।/।

जडाव दागीने.

१ शिरपेंच, घाट साधा तीन फुलांचा किर्णाचा, बदल शामराव लक्ष्मण रास्ते पैकीं. किंमत. रुपये.

२३० ऐन किंमत.
५७॥ सवाई.
२८७॥

८२ हिरे व हिरकण्या.
१ माणिक मदनाईक.
१ मोती लोलक.
८४

१ जगो, घाटसाधा, बदल खंडेराव निळकंठ रास्ते पैकीं, किंमत. रुपये.

३२५ ऐन किंमत.
८१। सवाई.
४०६।

६८ हिरे व हिरकण्या.
१ मोती लोलक.
६९

१ कंठी मोत्यांची, बदल बापूजी गणेश गोखले पैकीं, किंमत. रुपये.

९२४८/- ऐन किंमत.
२३१८। सवाई.
११५९८/।.

145. An English judge at Bombay having came to pay a visit to the Peshwa, present of jewel y worth of Rs. 1848 was made to him.

A. D. 1805-1806.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · सत्यमेव जयते · संस्कृति मंत्रालय · भारत सरकार

CSL

१० धुगधुगी घाट साधा, शहत.
९ हिरे.
१ मोती लोलक.

१०

६० मोत्यें माळेस वजन टांक ६॥१॥

७०

३

१४६।१९७ कुंपणी इंग्रज बहादूर यांचे विद्यमानें सालसंबंधी इस्तकबिल मार्गशीर्ष मास
इ० स० १८०६।०७ सालमजकूर सनसबा मयातैनापासून दोनलक्ष रुपये तुमचे कुलबाब
सबा मयातैन व अलफ. खर्चास द्यावयाचे ठरले. त्यापैकीं रुपये.
मोहरम २

५०००० मार्गशीर्षमासचे हप्त्याचे पेशजी देविले ते.
५०००० फालगूनमासचे हप्त्याचे हल्लीं देविले ते.

१००००० येकूण येक लक्ष रुपये चांदवड देविले असेत, घेऊन पावली याचा जाब देणें, ह्मणोन
चिरंजीव राजश्री चिमणाजी रघुनाथ यांचेनावें फडणीसी पत्र १.
१४७।१९९ देणें, कर्णेल कलोष वकील दिमत इंग्रज कलकत्तेकर, यांस राजश्री बाबा
इ० स० १८०६।०७ साहेब यांचे लग्नाचा परत आहेर हिराबागांत केला. त्याजवर रुबरु
सबा, मयातैन व अलफ पाहून दिल्हे. ते जडाव बाबत सदाशिव माणकेश्वर पैकीं, छ
साबान २६ २८रविळावल सन सबा मयातैन आहेरावर आले. ते किंमत
२०५२।≡॥ रुपये.

जडावदागीनें

१ शिरपेंच, घाट साधा तीन फुलांचा किंमत रुपये २९०.

शहत

५५ हिरे व हिरकण्या किंमत रुपये २४३.
१ मोतीं लोलक मजीद. रुपये १२.
० सोनं व अजुरा किंमत रुपये ३५.

५६

146. It was agreed through the agency of the English that Government
A. D. 1806-1807. should pay annually Rs. 2 Lacs to Chimnaji Raghunath
from the current year.

147. A return present consisting of jewelry was made in Hirabag to the
A. D. 1806-1807. English agent at Poona on the occasion of the Peshwa's
marriage.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · सत्यमेव जयते · संस्कृति मंत्रालय · भारत सरकार
CSL

१ जगो, घाट साधा किंमत. रुपये ३१५

शहात.

५९ हिरे व हिरकण्या, किंमत रुपये २७२॥.
१ मोतीं लोलक, रुपये ८
० सोनें, व अजुरा किंमत रुपये. ३४॥
६०

१ कंठी मोत्यांची, किंमत रुपये १४४७।≡॥.

शहात.

१० घुगधुगी, घाट साधा किंमत रुपये ८५

शहत.

९ हिरे.
१ मोतीं लोलक. रुपये १५.
सोने व अजुरा. रुपये ७॥.
१०

४८ मोत्यें, माळेस किंमत १३६२।≡॥ रुपये.
५८

३

१४८।२०२ देणें, खुसरोजी मोदी दिमत इंग्रजकलकत्तेकर यांस निरोप समयीं, विद्यमान राजश्री बाबासाहेब यांणीं सदाशिव रघुनाथ गद्रे यांचे वाड्यांत रुंबरु पाहून दिला. तो शिरपेंच, घाटसाधा तीन फुलांचा बाबत नरसिंह खंडेराव पैकीं छ २८ रविलावल सबा मयातैनात आला. तो किंमत रुपये २२५.

इ० स० १८०६-७ सबा मयातैन व अलफ मोहरम ८

शहत

५० हिरे व हिरकण्या.
६ माणकें चुणी.
१ पाचमदनांईक.
१ मोतीं लोलक.
० सोनें व अंजुरा.
५८

जडावडागिना,

148. A present of jewelry was made to Khushroji Modi in the service of the English on the occasion of his farewell visit to the Peshwa.
A. D. 1806-1807.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · संस्कृति मंत्रालय · भारत सरकार

१४९।२२४ देणें, जनरेल चंपनी, (चापमन ?) दिमत इंग्रज कलकत्तेकर, शिरूरचे लष्करांतून येऊन मुंबईस जातात, सबब यांस हिराबागांत मेजवानी केली ते समयीं खाशांनीं रुबरु पाहून दिल्हें.

इ० स० १८०९–१०
अशर मैयातैन व अलफ
सवाल १८

छ १४ रोज किंमत रुपये.

१२८३। ऐन किंमत.
३२०॥।- सवाई.

१६०४०-

जडाव दागिने.

१ शिरपेंच, घाट साधा, सिदोजीराव निंबाळकर सर लष्कर यांजपैकीं आहेरावर आला तीं, छ २८ रबिलावल, सन सबा मयातैन किंमत. रुपये.

२७५ ऐन किंमत.
६८॥। सवाई.

३४३॥।-

शहत

७ पाचा व किडे रुपये २२.
५८ हिरे व हिरकण्या किंमत रुपये २००.
१ मोतीं लोलक, किंमत रुपये १८.
० सोनें व अजुरा रुपये ३५.

६६

१ जगो घाट साधा, बदल लाट ईलस दिमत इंग्रज विलायतकर यांजपैकीं, छ १५ रजब सन खमस मयातैन, किंमत रुपये.

४०६॥।- ऐन किंमत.
१०१॥≈ सवाई.

५०८॥

शहत.

४५ हिरे व हिरकण्या, किंमत २७०॥।- रुपये.
१८ पाचा व किडे, किंमत ७९॥= रुपये.
० सोनें व अजुरा, रुपये ५६।=

६३

149. An English in the service of the English at Calcutta who had come from the camp at Sirur and was proceeding to Bombay was given a feast at Hirabag and presented with jewels worth Rs. 1604.

A. D. 1809-1810.

१ कंठी मोत्यांची, बद्दल रामचंद्र परशुराम यांजपेकीं छ. ८ रबिलावल सनसन मयातैन, आहेरावर आली ती किंमत रुपये.

६०१।। ऐन किंमत.

१५०।= सवाई.

७५१।।।=

शहत.

८ धुगधुगी, घाटसाधा. किंमत रुपये.

शहत

७ हिरे व हिरकण्या.

१ मोतीं लोलक.

८

६४ मोत्यें माळेस.

७२

३

१५०।२३२ इंग्रज कलकत्तेकर यांजकडील खासगत जागाचे (जाहजाचे?) कामाकरितां, कारखानदार, सरकारची तिजाई व जकात वगैरे बाब शिरस्ते-प्रमाणें जी असेल ती देऊन, लांकडे सरकारकाराखान्याकडे घ्याव-याची असतील तीं खेरीजकरून, बांकडीं तिकडीं लांकडें सरकारचे उपयोगीं नसतील तीं, जो संतोषानें विकत देईल, त्याजपासून उदम्यास व रयतेस कोणेविसी उपद्रव न देतां, सालमजकूर सन इसने अशर मयातैनांत, येकसाला खुषखरेदी करावयासी तालुके वसई येथें पाठाविणार त्यास अडथळा होऊं नये. येविसी तालुके मजकूर येथील मामलेदार यांस ताकीद जाहली पाहिजे, ह्मणोन मेस्तर अलपीष्टण वकील दिमत इंग्रज कलकत्तेकर यांणीं हुजूर विनंती केली. त्याजवरून हे सनद सादर केली असे. तरी इंग्रज कलकत्तेकर यांजकडील खाजगत जहाजाचे कामाकरितां कारखानदारास सरकारची तिजाई व जकात वगैरेबाब शिरस्तेप्रमाणें जी असेल ती देऊन व लांकडें सरकार कारखान्याकडे घ्यावयाची असतील तीं खेरीज करून बांकडी तिकडीं लांकडे सरकारचे उपयोगीं नसतील तीं संतोषानें विकत देईल, त्याजपासून उदम्यास व रयतेस कोणेविसी उपद्रव न देतां

इ. स. १८१०।११ हिंदे अशर मयातैन व अलफ जमादिलावल २

150. At the request of Mr. Elphinstone agent of the English at Calcutta, the Mamlatdar of Bassein was directed to permit the ryots and merchants to sell to the English wood not useful for Government purposes in the current year. The wood was required by the English for their naval workshop.

A. D. 1810-11.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · संस्कृति मंत्रालय · भारत सरकार

CSL

रसानगीयादी.

१५१।२४६ इंग्रज कलकत्तेकर यांजकडील लष्कर त्या प्रांतीं आहे. तिकडे घोड्यांस चंदीस हरभरे विकत मिळत नाहींत. उमरखेड माहालांत हरभरे मिळतात याजकरितां परगणें मजकुरीं हरभरे खुषखेरदी करून दहा हजार पर्यंत बैल भरून लष्करांत नेऊन त्याची जकात सालमजकुरीं एक साला मात्र माफ केली पाहिजे, ह्मणून मेस्तर अलपष्टिन, वकील इंग्रजाकडील यांणी हुजूर विनंती केली. त्यास इंग्रजाकडील लष्कर त्या प्रांती आहे तेथें घोड्यास चंदीस हरभरे विकत मिळत नसल्यास उमरखेड माहालांत हरभरे हे खासगत खुष खेरदी करून दाहाहजार बैलापैकीं जे बैल भरून सालमजकूरीं येकसाला लष्करांत नेतील. त्यास परगणें मजकूरचा सालाबाद जकातीचा ऐवज जमेस येतो त्यांत नुकसान न येतां सदरहु बैलापैकीं जे बैल भरून जातील त्या जकातीविसी साल मजकूरी येक साला मात्र तगादा न करणें. ह्मणून सदाशिव माधवराव कमाविसदार परगणें उमरखेड यांचे नांवें. सनद १.

इ० स० १८१४।१८१५. समस अशर मयातैन व अलफ सवाल १२

१५२।२४८ गोपाळ नागनाथ यांस कीं, सरकारांतून तुमचे तीर्थरूप नागो शिवराम चिनापटणास वकीलीचे कामावर होते ते मृत्यु पावले. सबब हें पत्र तुह्मांस सादर केलें असे, तरी तुम्ही सरकार लक्ष एकनिष्ठपणें ठेऊन गवरनर येलीयट (इलियट) दिमत इंग्रज कलकत्तेकर चिनापटणास आहेत त्यांजवळ राहून तेथील बातमी वरचेवर लिहित जाणे. म्हणोन चिटणीसीपत्र १.

इ०स० १८१६।१८१७ सबाअशर मयातैन व अलफ जिल्काद २०

१५३।२५० कुंपणी इंग्रज बहादूर याजकडील कारकून किल्ले महिमानगड नजीक कोंडी घाटाजवळ अखबरेचे कामावर आहे; त्याजकडील चार असामी जासूद किल्लेमजकुरचे मामलेदार यांणी पाहऱ्यांत बसऊन कारकुनास कैद करावयाकरितां लोक पाठविले, म्हणोन हुजूर विदित

इ०स० १८१६।१८१७ सबा अशर मयातैन व अलफ जमादिलावल २५

---

151. At the request of Mr. Elphinstone the Kamavisdar of Umarkhed was directed to allow the English to purchase gram for the army which was in that province as it was not procurable in the neighbouring district and to remit the duty on the removal of the gram to the extent of 10000 bulock loads.

A, D. 1814-15.

152. Nago Sivram agent at the court of the English Governor Chinapatan having died his son, Gopal Nagnath was appointed in his place and was directed to communicate news frequently to Government.

A. D. 1816-17.

153. A Carkoon was kept by the English at Kondi ghat near Mahimangad for obtaining intelligance. His messengers were kept in confinement by the Government Kamavisdar and men were sent by him to arrest the karkun. The Kamavisdar was directed to release the messengers and to allow the karkun to remain at the Ghant [illegible] year

A. D. 1816-17.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · GSL

जाहलें त्याजवरून हे सनद सादर केली असे, तरी कुंपणी कडील जासूद पाहन्यांत तुम्ही ठेविले असल्यास व कारकुनास अटकावलेला असल्यास सोडून देणें. व अखबरीचें कामावर कारकून कोंडीघाटाजवळ राहतील त्यांस सालमजकुरीं येकसाला अडथळा न करणें. म्हणोन आत्माराम लक्ष्मण कमाविसदार तालुके महिमानगड याचें नांवें सनद १.

रसानगीयाद.

राजकीय (ब) इतरमाहिती.

(२३) युरोपांतील राष्ट्रें.

१९४।२६ कमावीस भेट, बाबद फिरंगी गोवेकर यांजकडील वकील विठ्ठल गोरक्ष घेऊन आले ते गुजारतहाय सनगें येकूण रुपये.

इ. स. १७९६।९७
सबासेन मया व अलफ.
रमजान १.

३७३। राजश्री बाबासाहेब यांसी गुजारत माहादजी घुला खिजमतगार.

सनगें येकूण रुपये.

२९० मुसेजरे.

२१० प्रत ३ दर ७०

४० प्रत, १

२९० ४

१२२ मखमल गज १७ ८३

दरगजी रुपये ७८२ प्रमाणें रुपये

१। जापता (तापता) सनंग ८-

३७३। सनगें गज

४८- १७८३

२३१। राजश्री अमृतरावसाहेब यांसी गुजारत कृष्णाजी काळा खिजमतगार.

सनगें येकूण रुपये.

२०० मुसेजरे.

१४० प्रत २ दर ७०

६० प्रत १

२०० ३

३० गुलबादज १

A. D, 1796-97. 154. Present of clothes was received by Bajirao from the Portuguese of Goa.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · सत्यमेव जयते · संस्कृति मंत्रालय · भारत सरकार

CSL

१। तापता सनंग ८८

२३१। ४८८

६०४॥ सनगें ८८९ गज १७८३

१५५।८३ फिरंगी गोवेकर यांस दमणचे सरंजामास सरकारांतून परगणें नगर हवेली प्रांत रामनगर तालुके वसई हा माहाल जकात व मोहतर्फा व शिंगशींगोटीसुद्धां दरोबस्त दिल्हा. त्याप्रमाणें त्यांजकडे चालत आहे. त्यास जकात फतेपूर येथील नाक्यास फिरंगी यांजकडील प्यादा बसवून आपले हिशाची जकात घेतात, ती गंभीरगडचे हिशापैकीं घेतात ह्मणोन मामलेदाराचा उपद्रव लागतो, व नाक्याच्या खटखटीकारितां जप्ती केली तेव्हां गुरें भांडीं व ऐवज मामलेदार यांनीं नेला, तो माघारा द्यावयाकरितां पेशजी सरसुभ्याहून सनद सादर झाली असतां दिल्हा नाहीं. ह्मणोन विठ्ठलराव गोरक्ष वकील यांनीं हुजूर विदित केलें. त्यावरून हे सनद तुह्मांस सादर केली असे तरी पेशजी सरकारची सनद सादर झाली आहे, त्याप्रमाणें चालविणें. नवीन दिकत न करणें. फतेपूरचे नाक्यावर फिरंगी आपला प्यादा बसवून आपल्या हिशाची जकात घेतात त्याप्रमाणें घेऊं देणें. जप्तीमुळें गुरें, भांडीं, व ऐवज घेतला असेल तो माघारा देणें. येविसी फिरोन बोभाट न येई तें करणें. म्हणोन वामनाजी हरि मामलेदार यांचें नांवें सनद १.

इ. स. १७९८।९९ तिसा तिसेन मया व अलफ साबान ४

रसानगीयादी.

राजकीय (ब) इतर माहिती.

(२३) लहान लहान संस्थानें.

१५६।१७ रामचंद्र कृष्ण यांचे नांवें सनद कीं, राजे खंडणशाहा हटीयाराय, संस्थान ममडाई सरकार हांडे प्रांत नेमाड सुभा खानदेश यांजकडील दुर्गादास भवानी कारभारी यांणीं हुजूर येऊन विनंती केली कीं, राजे खंडणशाहा यांचे वडील बंधु राजे घाडशाहा, यांचें पुत्र राजे भारतशाहा यांचे नांवें संस्थान चालत असतां ते सन अर्बातिसेनांत मृत्यु

इ० स० १७९६–९७ सबातिसेन मया व अलफ रविलाखर २

155. The Mahal of Nagar Haveli in prant Ramnagar in Taluka Bassein was given to the Portuguese of Goa, being the territory assigned for the expenses of Daman.

A. D. 1798-99.

156. Three villages belonging to Khandanshaha Raja Hatiyaray of Sansthan Mamdai in Sarkar Hande of Prant Nemad in Subha Khandesh having been wrongly appropriated by Ramchandra Krishna Bhuskute, the latter was directed to restore the villages to the former and Scindia Alija Bahadoor was instructed to see that the order was carried out.

A. D. 1796-97.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA

पाहिजे. त्यास त्यांचे चुलते असतां राजे यांचें नकल जाहले. संस्थान चालवावयास कोणी नाहीं असें रामचंद्र कृष्ण भुसकुटे यांणीं सरकारांत गैरवाका समजाऊन संस्थान मजकुरची जप्ती करून घेतली, हें वर्तमान समजल्यानंतर राजे यांणीं आपल्यास हुजूर पाठविलें. आपण येऊन विनंति करून संस्थानचे जप्तीची मोकळीक करविली. ते समयीं भुसकुटे यांणीं संस्थानचा देहेझाडा सरकारांत समजाविला. त्यांत मौजे सामर्दा व मौजे उदराकछ तर्फ सौताडा व मौजे धुदकर्ण तर्फ जुनवाण्या येकूण तीन देहे आह्मांस इनाम दिल्हे आहेत, ह्मणोन मशारनिल्हे यांणीं समजाविले. त्यास पेशजी सन सीत सीतेनांत पंचवीस हजार रुपयांचा सरंजाम आम्हांकडे ठेऊन वरकड सरकारांत घेतला, ते समयीं सरकारांतून आज्ञा जाहली कीं यांत कोणास पेशजीगांव इनाम असल्यास पुढें चालऊं नयेत. ह्मणोन त्याजवरून भुसकुटे यांणीं आपले नांवचा तहनामा शिक्यानिशीं लिहून दिला. त्यांत इनाम गांवांविशीचा कांहींएक दाखला नाहीं. असें असतां मशार निल्हे यांस गांवचा लोभ न सुटे सबब खांडव्याचे मुक्कामीं राजे यांजकडील रामजीभाई कारभारी यांजला त्यांणीं मनस्वी तसदी देऊन राजे यांजकडे कांहीं ऐवज नसतां पंचेचाळीस हजार रुपयांचा कागद राजे भारतशाहा यांचे नांवाचा लिहून घेऊन त्यांत सरहू तीन गांव गहाण लिहून घेतले, आणि गांवचा उपभोग करतात. येविशी आम्ही उद्योग करीत गेलों परंतु जबरदस्तीमुळें उपाय नाहीं. त्यास गहाणपत्राचे पूर्वीच भुसकुटे यांचे ऐवजाचा झाडून फडशा जाहला. त्यांचे वगैरे कागदपत्र बजिन्नस आह्मांपासीं आहेत, ते ध्यानास आणून आमचे गांव आह्मांकडे देविले पाहिजेत, व भुसकुटे यांणीं गांवांचा उपभोग केला आहे, तो ऐवज आमचा आह्मांस देविला पाहिजे. ह्मणोन त्याजवरून तुह्मांस येविसीचें कागदपत्र तुह्मांपाशीं काय असतील ते सरकारांत समजाविणें म्हणोन पुशिलें असतां इनामपत्राच्या नकला मात्र दाखविल्या, या शिवाय गहाणपत्र वगैरे हिशेबाचे कागदपत्र आह्मांपाशीं कांहींएक नाहींत. जळाले, दंग्यांत गेले, असें ह्मणतात. सबब राजे खंडणशाहा यांजपाशीं कागदपत्र पाहून पंचाईत मतें मनास आणितां तुमचा ऐवज राजे भारतशाहा यांजकडे येणें त्याचा झाडून फडशा गहाणपत्राचे पूर्वीच जाहला. त्याचे कागदपत्र बजिन्नस आहेत. त्यांपैकीं चारशें अर्धा रुपयांचे पावतीचा मात्र दाखला नाहीं. असें असतां अलीकडे तुह्मीं गहाणपत्र रामजीभाई कारभारी यांजपासून राजे यांचे नांवें लिहून घेऊन सदरहू तीन गांवचें उत्पन्न घेतां हें अनन्वित दिसोन येतें. येविसीं कारभारी याचें पत्र बजिन्नस ते वेळचे आहे. त्यांत तुमचे गैर रीतीचें करण्याचा व बोलण्याचा मजकूर लिहिला आहे. सबब तुमचा ऐवज व गांवास गहाणाचा संबंध लागू होत नाहीं हल्लीं तुह्मीं गहाणपत्राचे ऐवजाचे भरण्याचा झाडा वगैरे हिशेब कांहींएक दाखवीत नाहीं. इनामपत्राच्या नकला मात्र दाखवितां त्यास तुह्मी जे गांव इनाम म्हणतां तेच गांव तुम्हीं गहाण लिहून घेतलें तेव्हां इनामाविषयीं संबंध राहिला नाहीं. कदाचित इनामपत्रेंहीं असल्यास बातल पडलीं असें सिद्ध होतें. याजमुळें सदरहू तीन गांवांविशीं तुमचा वारसा इनाम किंवा गहाण या दोहींतून एकही पोंचत नाहीं असें ठरलें. सबब देहेहाय मौजे सामर्दा व मौजे उदराकछ तर्फ सौताडा व

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA

CSL

मौजे बुद्रुकणे तर्फ जुणवण्या एकूण तीन गांव राजे यांजकडे सरकारांतून द्यावयाचा करार करून हें सनद तुह्मांस सादर केली असे, तरी सदर्हू तीन गांव राजे यांचे दुमाला करून आजपर्यंत गांवचे उत्पन्नाचा ऐवज तुह्मीं घेतला आहे. तो माघारा राजे यांस देणें. ह्मणोन सनद.

दौलतराव शिंदे आलीजा बाहादर यांस सदरहू अन्वयें कीं, देहेहाय मजकूर राजे खंडणशाहा यांजकडे सरकारांतून द्यावयाचा करार करून रामचंद्र कृष्ण यांस गांवाविशी अलाहिदा सनद सादर केली आहे, तरी मशारनिल्हे राजे खंडणशाहा यांजकडे गांव द्यावयास दिक्कत करूं लागल्यास त्यांस ताकीद करून गांव राजे यांचे स्वाधीन करून गांवचा मागील वसूल घेतला आहे तो माघारे देवविणें ह्मणोन. सनद.

२

रसानगी यादी.

१५७।१८. इ. स. १७९६।९७. सबा तिसेन मया व अलफ रबिलाखर २.

मोकदम देहहाय, संस्थान ममडाई, सरकार हांडे, प्रांत नेमाड सुभा खानदेश, यांचे नांवें सनद कीं, देहे व जकातीचें नाकें बितपसील. कितादेहे. कितादेहे.

× × × ×

येकूण देहे ब्यांणव व जकात नाकें राजे खंडणशाहा हटीयाराय संस्थान मजकूर यांचे वडील बंधु राजे धाडशाहा, यांचे पुत्र राजे भारतशाहा यांचे नांवें संस्थान व देदेहाय जकातीचाअंमल सुद्धां चालत होते. त्यास ते सन अर्बा तिसेनांत मृत्यु पावले. त्यांस त्यांचे चुलते असतां राजे यांचें नक्कल जाहालें, संस्थान चालवावयास कोणी नाहीं, असें रामचंद्र कृष्ण भुसकुटे यांणीं सरकारांत गैरवाका समजाऊन संस्थानाची जप्ती करून घेतली. तेव्हां राजे यांनीं आपलेकडील दुर्गादास भवानी हुजूर पाठवून जप्तीची मोकळीक करावयाविसीं विनंती केली. त्याजवरून सन अर्बा तिसेनांत संस्थानाचे जप्तीची मोकळीक केली, परंतु राजे खंडणशाहा यांचे नांवें संस्थान करार जाहालें नव्हतें. सबब हल्लीं संस्थान मजकूर व संस्थानसंबंधें सरंजाम पंचवीस हजार रुपयांचा तहनामा सन सीतसीतेनांत करून दिल्हा आहे त्याप्रमाणें यांचे नांवें करार करून देऊन हे सनद सादर केली असे. तरी देहेहाय ब्यांणव येथील अंमल व जकात नाकें येथील जकातीचा अंमल सदरहूप्रमाणें राजे यांजकडे रुजू होऊन सुरळीत देत जाणें म्हणोन. सनद

---

157. Raje Bharat Shah son of Raje Dhadshah of Sansthan Hatyaray died in A. D. 1793-94 Ramchandra Krishna Bhuskute represented that the Raja had left no heirs and the Sansthan was attached. The deccased had however a brother named Raje Khandunshah who urged his claim to the Sansthan and attachment therefore removed in the same year. A formal Sanad conferring the Sansthan and the Saranjam worth Rs. 25000 attached to it as agreed upon in A. D. 1765-66 was now issued, and Khandunshah was exhorted to act loyally towards Government.

A. D. 1796-97.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA

राजे खंडणशाहा हटीयाराय संस्थान ममडाई यांस कीं, संस्थान मजकूर व संस्थानसंबंधें सरंजाम तुमचे नांवें सदरहूप्रमाणें करार करून दिल्हा असे. तरी संस्थानाची सरकार लक्ष राखोन वहिवाट करीत जाणें. म्हणोन सनद.

२

रसानगी यादी.

१५८।८९. विक्रमशाहा राजे संस्थान जवार यांचे तीर्थरूप पतंगशाहा राजे यांजकडे संस्थान आहे. त्यास ते मृत्यु पावले सबब तुमचे नांवें संस्थान पेशजीप्रमाणें सरकारांतून करार करून देऊन हे सनद सादर केली असे, तरी तुम्ही सरकार लक्षांत राहून संस्थानाचा बंदोवस्त करून सुखरूप राहणें ह्मणोन मशारनिल्हे यांचे नांवें सनद १.

इ. स. १७९८।९९. तिसा तिसेन मया व अलफ सवाल २४.

येविसी सदरहू अन्वयें पांडुरंग धोंडाजी यांस पत्र कीं, विक्रमशाहा राजे संस्थान जवार यांचे नांवें संस्थान पेशजीप्रमाणें सरकारांतून करार करून देऊन हें पत्र तुह्मांस सादर केलें असे, तरी हरएकविसी संस्थानचा उपराळा तुम्ही पेशजीपासून करीत आला त्याप्रमाणें करीत जाणें. ह्मणोन चिटणीसी पत्र.

२

रसानगी यादी.

१५९।९० कृष्णशाहा जवारकर यांचा पुत्र याजपासून कांहीं अंतर जाहलें, सबब त्यास वसईस सरदारी करून नेहमीं सरकार चाकरी करून असावें, बाहेर येऊं नये. ह्मणोन गणपतराव जिवाजी मामलेदार तालुके वसई यांचे नांवें चिटणीसी पत्र १.

१७९८।९९ तिसा तिसेन मया व अलफ सवाल २४

१६०।१०३ मोहनासिंग राजे संस्थान बडवाणी यांचें नांवें सनद कीं, तुम्हांकडील परमानंद मल्हार कारकून यांणीं हुजूर विदीत केलें कीं, उमेदसिंग राजे यांजकडे संस्थान मजकूर पेशजीपासून आहे. तेथील पेशकसी बाबद दरसाल सहा हजार रुपये सरकारांत देत होते. त्याजवर

इ०स० १७९९।१८०० मया तैन व अलफ सवाल २.

---

158. Patangshah Raja of Jawar having died his son Vikramshah was allowed to succeed him and was told to act loyally towards Government.

A. D. 1798-99.

159. Krishnashah Jawarkars' son being guilty of some misconduct was given a comand and directed to remain at Bassein. He had no permission to leave the place.

A. D. 1798-99.

160. Umedsing Raja of Sansthan Badwani used to pay Rs. 6000 as tribute to the Peshwa. On the transfer of certain Mahals in Sarkar Bijagad to Malharji Holkar in Saranjam the amount of tribute was paid by him to Holkar. Umedsing died and his son Mohonsing being a Minor the Holkar usurped the village of Bramhangam and some other villages and oppressed the Sansthan to a great extent. Parmanand Malhar a karkun of the Sansthan asked for Peshwas' help. Durgadas Bhawani was therefore sent to manage the Sansthan on behalf of the Raja and the following instructions were issued.

A. D. 1799-1800.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA

CSL

सरकारें बिजौगड पैकीं महाल मल्हारजी होळकर यांजकडे सरंजामास सरकारांतून दिले. त्यापासून पेशकसीचा ऐवज ते घेतात. अलीकडे उमेदसिंग राजे मृत्यु पावले. त्यांचे पुत्र मोहनसिंग हे लहान यांजमुळें संस्थानपैकीं परगणें ब्राम्हणगांव वगैरे गांव होळकर यांणी दाबून संस्थानांत मनस्वी उपद्रव करितात. व गीरास पूर्वीपासून आह्मीं घेत आलों त्याप्रमाणें महालकरी देत नाहींत. त्यास संस्थान मोहनसिंगराजे यांचे नांवें करार करून देऊन सरकारांतून संस्थानचा बंदोबस्त करून दिला पाहिजे. ह्मणोन त्याजवरून तुमचे तीर्थरूप उमेदसिंगराजे संस्थान मजकूर हे मृत्यु पावले. सबब तुमचे नांवें संस्थान पूर्ववतप्रमाणें करार करून देऊन संस्थानचे बंदोबस्तास सरकारातून दुर्गादास भवानी यांस पाठविलें आहेत त्यासंबंधें कलमें.

संस्थान संबंधें तुम्हांपासून सालमजकुरीं येक साल नजरेचा ऐवज सरकारांत ध्यावयाचा करार केला रुपये ७५००० पाऊण लक्ष रुपये याचा भरणा सरकारांत करून जाब घेणें. कलम १.

पेशकसी बाबत साहा हजार रुपये सालाबाद पेशजी प्रमाणें पेस्तरसालापासून दरसाल सरकारांत पावते करून जाब घेत जाणें.

कलम १.

संस्थान संबंधें पेस्तरसालापासून शंभर स्वार घोडेमाणूस धडधडीत, सामान चांगलें, बराबर संस्थानांतील दाखल्याचा माणूस चांगला देऊन स्वाराचे तैनातेची बेगमी करून हुजूरचाकरीस नेहमीं पाठवीत जाणें. कलम १.

संस्थानचे बंदोबस्तास स्वार व गाडदी दुर्गादास भवानी यांस ठेवावयाची आज्ञा केली आहे. तरी संस्थानचा बंदोबस्त होय तोपावेतों स्वार व गाडदी मशारनिल्हे ठेवतील, त्यांचे तैनातेचा ऐवज द्यावयाबिसी आलाहिदा तुह्मांस सनद सादर जाली आहे त्याप्रमाणें देत जाणें.

कलम १.

संस्थानचे कामकाजास सरकारांतून दुर्गादास भवानी यांस पाठविले आहेत. तरी तुह्मीं संस्थानचे कामकाज यांजपासून घेत जाणें. कलम १

एकूण पांच कलमें करार करून देऊन हे सनद तुह्मांस सादर केली असे तरी तुह्मी सरकार लक्षांत राहून सदरहु प्रमाणें करणें ह्मणोन.

सनद.

रसानगी यादी येकंदर.

१६०।१०३ पैकीं. मोहनसिंग राजे संस्थान बडवाणी यांचे नांवें सनद कीं तुमचे तीर्थरूप उमेदसिंगराजे संस्थान मजकूर हे मृत्यु पावले. सबब तुमचे नांवें संस्थान पूर्ववतप्रमाणें करार करून देऊन संस्थानचे बंदोबस्ताचें काम दुर्गादास भवानी यांजकडे सांगितलें आहे. त्यास मशार

इ० स० १७९९।१८०० मया तैन व मया अलक सबाल २.

1 The Raja should pay Rs 75000 as Nazar in the current year.
1 He should continue to pay tribute at Rs. 6000 as before.
1 He should send 100 Sawars to the Peshwa for service, their expenses being defrayed by the Raja.
1 Durgadas should be given the expenses of the force which he was directed to keep for service in the State.
1 The Raja was to let Durgadas to carry on the business of the Sansthan.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA

निवडक कारकून यांस तैनात व रोजमरा व संस्थानचे बंदोबस्तास स्वार व गाडदी ठेवावाविसीं दुर्गादास भवानी यांस आज्ञा केली. त्याचे तैनातेचा वगैरे ऐवज संस्थान मजकूरपैकीं सरकार ऐवजाशिवाय द्यावा याविसीं कलमें.

बितपसील.

१ दुर्गादास भवानी यांस तैनात सालीना.

नक्त रुपये.	कापड आंख.
२५०० जातीस शागीर्द पेशासुद्धां.	१५००
१००० पालखीस.	
३५००	

येकूण साडेतीन हजार रुपये नक्त व कापड आंख पंधराशें तैनांत सालीना कुल करार केली असे; तरी मशार निल्हेस सदरहूप्रमाणें देत जाणें. कलम.

१ कारकून संस्थानचे बंदोबस्तास राहतील त्यांस.

रोजमरा दुमाही रुपये.	कापड सालीना आंख.
बाळाजी दुलुभराम ५०.	३००.
चिमणाजी धोंडदेव ४०.	२९०.
बाळाजी येशवंत ४०.	२९०.
१३०	८००

येकूण येकशें तीस रुपये रोजमरा दुमाही व कापड आंख सालीना आठशें करार केले असेत; तरी हजेरीचे तेरखेपासून चाकरी बरहुकुम रोजमरा दुमाही येकशें तीस रुपये व कापड आंख सालीना आठशें सदरहू प्रमाणें देत जाणें. कलम.

१ स्वार असामी २२५ येकूण दर राऊती शेरा सालीना रुपये तीनशे शिरस्तेप्रमाणें करार करून तैनातपैकीं रोजमरा व नालबंदी.

रोजमरा दर राऊती दरमाहा	नालबंदी सालीना दर राऊती.
रुपये १८ प्रमाणें रुपये ४०५०	रुपये ७५ प्रमाणें १६८७५

येकूण चारहजार पन्नास रुपये रोजमरा येकमाही व सोळा हजार आठशें पंचाहत्तर रुपये नालबंदीची नेमणूक सालीना शिरस्तेप्रमाणें करार केली असे; तरी घोडे माणूस सामान चांगलें ठेऊन संस्थानचा बंदोबस्त करावा. गणतीचे तेरखेपासून चाकरीबरहुकूम स्वारांचा रोजमरा व नालबंदीचा ऐवज बंदोबस्तामुळें होईल तो देत जाणें. कलम १

१ गाडदी असामी २२५ येकुण तैनात जमातदार व कारकून सुद्धां शेरा

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA
संस्कृति मंत्रालय · भारत सरकार

सरासरी दर महा दर असामीस रुपये १४ प्रमाणें तैनात दर महा रुपये ३१५०.

तपसील.

२१००	रोजमरा तैनातपैकीं, वीस रोजा येकमाही.	रुपये.
१०५०	तहकूब अखेर सालीं हिशेब करून द्यावें ते.	रुपये.
३१५०		

येकूण तीन हजार एकशें पन्नास रुपये तैनात दरमाहा करार केली असे. तरी गाडदी चांगले चाकरीचे उपयोगी पाहून ठेवावे. त्यांस हजिरीचे तेरखेपासून चाकरी बरहुकूम दरमाहा तैनात पैकीं वीस रोजा दोन हजार येकशें रुपये देत जाणें, तहकुबी एक हजार पन्नास रुपये प्रमाणें अखेर सालीं अकरा माही व येकूणतीसारोज वजा करून तैनातेचा हिशेब संस्थानचे बंदोबस्तामुळें होईल तो ऐवज देत जाणें. कलम.

४

येकूण चार कलमें करार करून हे सनद तुह्मांस सादर केली असे. तरी सदरहुप्रमाणें करणें म्हणोन. सवद १.

रसानगी कराराची यादी.

१६१।१४१. रूपदेराणा संस्थान रामनगर यांचे नांवें सनद कीं, तुह्मांवर सरंजामपट्टीबद्दल पन्नास हजार रुपयांची वरात जाली आहे. त्यास चार वर्षें होत आलीं त्याचा फडशा अद्यापि होत नाहीं, व सरकारचे मुत्सदी यांजकडे तुह्मांकडून देहेचार चालत आले होते त्यांची जप्ती तुम्हीं केली आहे, व सरकारच्या जकाती संस्थान मजकुरीं आहेत त्यांचे अमलाची कैदकानू वगैरे यांत बखेडा तुह्मीं करून पायमल्ली करीत आल्यामुळें नुकसानी जाली, व तालुके वसई येथील कारकून प्यादे यांसी बेकैदी केली, ह्मणोन हुजूर विदीत झालें. त्याजवरून सरसुभा प्रांत कोंकण येथून बाबुराव भास्कर यांस पाठविले असेत, तरी सरंजामपट्टीबद्दल वरातेचे ऐवजांचा फडशा करणें, विलंब न लावणें, व मुत्सद्दी यांस तुम्हांकडून गांव चालत होते त्यांची जप्ती तुम्हीं केली आहे ती मोकळी करणें, आणि गांवची कमाविस खंडेराव निळकंठ यांजकडे सरकारांतून सांगितली असे तरी गांव त्यांचे हवालीं करणें, हे

इ. स. १८०१।०२
इसन्ने मयातैन व अलफ,
जिलकाद ९.

161. Acess called Saranjampatti amounting to Rs. 50000 was imposed on Rupde Rana of Sansthan Ramnagar. The Raja failed to pay the amount. He more over attached certain villages granted by him to the officers of Govt and interfered with the management of the octroi which was in the hands of Government. He was informed that if he did not pay the cess and the expenses incurred on account of his interference with the octroi management and if he did not restore the villages in question it would go hard with him.

A. D. 1801-1802.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA

१९४।१२७ दोराबजी रतनजी पारशी वस्ती कसबें बलसाड प्रांत गुजराथ याणें कसबें पुणें येथील मुक्कामीं येऊन अर्ज केला कीं, मोहाचीं फुलें बिछायती कसबे बलसाड येथें विकावयास आणितात तीं माझे दुकानीं विकावीं, दुसरें कोणीं घेऊं नये व विकूं नये. याप्रमाणें करून मजपासून जीवन माफक नजर घेऊन पेस्तर सालापासून मक्ता दर साल पन्नास रुपये करार करून दिल्हा पाहिजे. म्हणोन त्याजवरून कसबे मजकुरीं मोहाचीं फुलें तूंवा आपले दुकानीं घेऊन विकावीं. दुसरे कोणी घेऊन विकूं नये. याप्रमाणें ठराव करून त्याबद्दल पेस्तर

इ० स० १८००।१८०१. इहिदे मयातैन व आलफ. मोहरम २२

194. At the request of Dorabji Ratanji Parsi of Balsad in Gujarath, the Right of purchasing and selling Mowra flowers at Kasbe Balsad was given to him on condition of his paying a fee of Rs. 50 annually to Government.

A. D. 1800-1801.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA

CSL

सालापासून मक्ता दरसाल रुपये ५० पन्नास रुपये सरकारांत ध्यावयाचा करार करून हे सनद सादर केली असे. तरी कसबे मजकुरीं मोहाचीं फुलें विछायती याजपासून घेऊन आपले दुकानीं विकीत जाणें, आणि पेस्तर सालापासून दरसाल मक्ता पन्नास रुपये सरकारांत कसबे मजकूरचे कमाविसदार यांजकडे देत जाऊन सदरील उदीम करून सुखरूप राहणें. यासंबंधें तुजकडे नजरेचा ऐवज ध्यावयाचा करार केला ते रुपये ३०० तीनशें रुपये सरकारांत भरणा करून जाब घेणें. म्हणोन पारशी मजकूर याचे नांवें छ ६ जिलकाद सनद १.

१ सदरहू अन्वयें २.

१ बाळोजी कुंजीर कमाविसदार परगणें बलसाड यास कीं, सदरहु मक्त्याचे पन्नास रुपये दरसाल घेऊन परगणें मजकुरचे हिशेबीं जमा करीत जाणें म्हणोन सनद.

१ जमीदार परगणें मजकुर यांस सदरहु अन्वयें चिटणीसी पत्र.

२ ३

रसानगी यादी.

---

५. गांवचे व महालाचे वतनदार.

१९५।६२ मौजे आंबे व मौजे वरखेडें परगणें वण येथील कुळकर्णी मैराळ त्रिंबक यांस पोटीं संतान नाहीं असें समजोन मल्हार खंडेराव रवळगांवकर यांणीं हरदुगांवचे कुळकर्णाचा कागद करून घेतला त्यास वतनदारीचा शिरस्ता पाहतां मालीक वतनदार वतन द्यावयास सिद्ध जहाल्यावर अवलाद व अफलादीचा वंश व वतनाचा हकशाई असेल त्यास अगोदर विचारावें तें न करितां कुळकर्णाचें खरेदीखत करून घेतलें. मैराळ त्रिंबक याचे अफलादीचा वंश पाहतां जगजीवन चौडाजी याचा दोहीत्र आंबादास कुळकर्णी मौजे राजापुर व त्रिंबक जगजीवन यांचा दोहीत्र गोविंद राव निंबाजी या उभयतांस व शिवधडे यांस न विचारितां खरेदी करून घेतलें. व जमीदार यांच्या साक्षी जबरदस्तीनें करून घेतल्या व गाईकवाड पाटील यांच्या साक्षी करून मागत होते, परंतु त्यांणीं करून दिल्या नाहींत ह्मणोन हुजूर विदित उभयतां दोहित्र यांणीं केलें. त्याजवरून हरदुगांवचे कुळकर्णाचे वतनाची जप्ती करून हे सनद तुह्मांस सादर केली असे. तरी कुळकर्णाची जप्ती उत्पन्नाचा आकार होईल तो सरकारांत पावता

इ० स० १७९७।९८ समान तिसेन मया व अलफ. जिलकाद २४.

---

195. Mairal Trimbak the Kulkarni of Ambe and Warkhede in Pargana Wan having no son, sold his watan to Malhar Khanderao Rawalgaumkar. The consent of the descendants of the watandar in the female line or of the watandars' kinsmen was not obtained. The descendants in the female line therefore protested against the sale. The watan was therefore ordered to be attached.

A. D. 1797-98.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA

करीत जाणें व रवळगांवकर यांणीं कुळकर्ण घेतल्यापासून त्यांजकडे उत्पन्नाचा ऐवज गेला असल तो माघारा घेऊन सरकारांत पावता करणें ह्मणोन बाणाजी शेव्ये पागा याचे नांवें सनद. १.

सदरहु अन्वयें चिठणीसीं पत्रें. ३

१ रामचंद्र हरि यांस.

१ व्यंकटराव गंगाधर यांस.

१ मल्हार खंडेराव रवळगांवकर यांस कीं, इस्तकबीलपासून कुळकर्णाचें उत्पन्न जाहलें असेल तें देऊन तुम्हीं कागदपत्र घेऊन हुजूर येणें ह्मणोन पत्र.

३ ४

एक सनद व तीन पत्रें दिल्हीं असेत.

रसानगीयादी.

बाणाजी शेव्ये याचे नांवें जप्तीच्या सनदा दिल्या होत्या त्या माघाऱ्या घेऊन खंडो अनंत यांचे नांवें सनदा लिहून देणें ह्मणोन परवानगी रुबरू. रसानगी चिंतो वामन कारकून निसबत दप्तर.

---

६. इतर मुलकी नोकर.

१९६।३८ रामाजी महादेव सहस्रबुद्धे यांणीं सन अर्बातिसेनांत पाऊस पाडावयाचा नेम केला होता त्याप्रमाणें पडला. सबब दोनशें रुपये सालीना तैनातीची असामी तालुके किटुराकडे सालगुदस्त करार करून दिल्ही आहे. त्याप्रमाणें करार असे तरी सदरहु प्रमाणें तैनात सालीना २०० दोनशें रुपये तालुके मजकूर पैकीं पावतीत जाणें ह्मणोन आनंदराव रामचंद्र यांचे नांवें सनद. १.

इ० स० १७९६।९७
सवा तिसेन मया व अलफ
जिल्हेज २

रसानगी यादी.

१९७।६०. कारकून निसबत दप्तर यांचे तांदुळ वगैरे जिन्नस खरीज फिरंगाण कोंकणांतून हरएक घाटें व गल्ला देशांतून खरेदी करून एकदम पुण्यास आणतील त्यांस आणूं देणें जकातीचा तगादा न करणें म्हणोन सालगुदस्ताप्रमाणें सालमजकुरीं. दस्तकें.

इ. स. १७९७।९८.
समान तिसेन मया व अलफ
जिलकाद ६.

---

196. Ramji Mahadeo predicted that there would be sufficient rainfall in A. D. 1793-94. The prediction having been fulfilled, he was
A. D. 1796-97. given an appointment worth Rs. 200 a year in Taluka Kittoor.

197. This gives a list of the Karkuns employed in the Daftar to whom passes
A. D. 1797-98. exempting their imports from octroi were issued.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · संस्कृति मंत्रालय · भारत सरकार · सत्यमेव जयते
CSL

दुसरे बाजीराव पेशवे यांची रोजनिशी.

निसबत चालतें दसर.	दस्तकें.	तांदुळ वगैरे संडी.	बेलसर.
विष्णु महादेव.	२	५	६०
गोविंदराव बाजी जोशी.	१	५	५०
त्रिंबक लक्ष्मण सिधये.	३	३८	५५
पांडुरंग कृष्ण गोडबोले.	२	३०	३००
त्रिंबकराव नारायण परचुरे यांचे तांदुळ.	२	५	५०
मोरो बापुजी फडके.	३	१८	१८०
भास्कर विश्वनाथ सोहनी.	१	१	१०
गणेश राम बापट.	१	१	१०
गंगाधर बाबाजी जोशी.	२	४	२०
रामचंद्र गोविंद पेंडसे.	१	१	१०
गोपाळ कृष्ण बिवलकर.	१	२	२०
त्रिंबक आपाजी लागु.	१	२	२०
माहादाजी बाबुराव लिमये.	१	२	२०
बाळाजी मल्हार बापट (मल्हार राम मृत्यु पावले सबब पुत्राचे नांवें.	१	३	३०
रघुनाथ सदाशिव शेवडे.	१	२	२०
बाळाजी नारायण शेवडे.	१	२॥	२५
रामचंद्र हरि ढवळे.	१	३	३०
रामचंद्र बाजी पंडित (बाजी अनंत मृत्यु पावले सबब पुत्राचे नांवें.)	१	१	१०
धोंडो केशव काळे.	१	१	१०
कृष्णाजी राम चोळकर.	१	१	१०
मोरो महादेव जोशी.	१	१	१०
महादाजी विश्वनाथ दातार.	१	१	१०
बाळाजी महादेव मोघे.	१	१	१०
शिवराम शंकर जोशी.	१	१	१०
अंताजी गोविंद आपटे.	१	२	२०
सदाशिव बल्लाळ भिडे.	१	२	२०
मोरो कृष्ण गोडबोले.	१	२	२०
कृष्णाजी तुकदेव वृद्ध जाहले सबब पुत्राचे नांवें.			

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · संस्कृति संचालय · भारत सरकार · सत्यमेव जयते

CSL

जनार्दन लक्ष्मण सहस्त्रबुद्धे.	१	१॥	१५
बाबुराव अनंत करमरकर.	१	२	२०
सदाशिव अनंत अभ्यंकर.	१	१	१०
आबाजी बल्लाळ आगाशे.	१	२	२०
मोरो महादेव गपचुप.	१	१॥	१५
दिनकर अनंत.	१	५	५०
चिमणाजी बाबाजी भट.	१	१॥	१५
नारो रामचंद्र काळे.	१	१	१०
शिवराम बल्लाळ.	१	१	१०
मोरो विष्णु गुणे.	१	१	१०
गणेश कृष्ण पेणशे यांचे तांदूळ.	२	४	४०
विसाजी भास्कर जोशी.	१	१	१०
राघो महादेव लिमये.	१	२	२०
लक्ष्मण अनंत करमरकर.	१	१	१०
काशीनाथ बाजी दाम्ले.	१	१	१०
बाजी लक्ष्मण मृत्यु पावले. सबब पुत्राचे नांवें.			
बापुजी माणकेश्वर शालिग्राम.	१	१	१०
गणेश बल्लाळ फाटक.	१	२	२०
बाजी गंगाधर परचुरे.	१	१॥	१५
विठ्ठल लक्ष्मण कोकणांतून अगर मावळांतून आणतील त्याविसी.	१	२	२०
सदाशिव चिंतामण फडके.	३	३०	३००
गंगाधर भिकाजी पाळंदे.	२	१०	१००
बळवंत बाबुराव.	५	१३	१७०
राघो नारायण गुणे.	१	१	१०
धोंडो सदाशिव ओक.	१	१	१०
सदाशिव बल्लाळ लेले.	२	८॥	८५
बापुजी बल्लाळ लेले.	२	८॥	८५
रामचंद्र बल्लाळ शेवडे.	१	१	१०
महादाजी अबाजी विद्वांस.	१	१	१०
त्रिंबक शंकर सोवनी.	१	१॥	१५
बाजी नारायण आगाशे.	१	१	१०

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · संस्कृति मंत्रालय · भारत सरकार · सत्यमेव जयते

CSL

दुसरे बाजीराव पेशवे यांची रोजनिशी.

कृष्णाजी चिंतामण सोवनी.	१	१	१०
मोरो लक्ष्मण ठाकूर.	१	३	३०
गोविंद मल्हार भाभडे.	१	२	२०
केसो विश्वनाथ टिळक.	१	२	२०
बाळाजी हरि ढवळे.	१	१	१०
विनायक मोरेश्वर मेहेंदळे.	१	२॥	२५
महादाजी नारायण बापट.	१	१	१०
लक्ष्मण बाबाजी करंदीकर.	१	१	१०
भिकाजी नारायण भातखंडे.	१	१	१०
रुद्राजी नारायण करमरकर.	१	२	२०
बापुजी नारायण परचुरे.	१	२	२०

लक्ष्मण महादेव जोशी यांचे नांवें कारकून सिलेदारीचे असामीवार दस्तक पावत होते. त्यास मशारनिल्हेची असामी सालमजकुरापासून चालते दप्तराकडे करार करून दिल्ही सबब सदरहु दस्तक दप्तरचे असामीकडे करून दिल्हे असे.

भगवंत अनंतराव.	१	१	१०
महादाजी बल्लाळ साठे.	१	५	५०
आनंदराव गोपाळ जोशी.	१	५	५०
दामोदर गोविंद.	१	५	५०
मोरो जनार्दन भट.	१	२	२०
लक्ष्मण गोविंद जोशी.	१	१	१०
राघो अनंत गोखले.	१	१	१०
गोपाळ अनंत अभ्यंकर.	१	२॥	२५
बाळाजी कृष्ण भोगले.	१	१	१०
बाजी रघुनाथ भावे.	१	१॥	१५
महादाजी नारायण अभ्यंकर.	१	१	१०
बिसाजी बहिरव ढवळे.	१	२	२०
जगन्नाथ बल्लाळ गानु.	१	१	१०
जनार्दन बाबुराव गोडबोले.	१	१	१०
मोरो आबाजी साठे.	१	१	१०
वासुदेव त्रिंबक अचवळ.	१	१	१०
आबाजी त्रिंबक जोगळेकर.	१	२	२०

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · संस्कृति मंत्रालय · भारत सरकार

CSL

नारो कृष्ण गद्रे.	१	२	२०
बाळाजी सदाशिव करमरकर.	१	१	१०
धोंडो बल्लाळ लेले.	१	१	१०
आपाजी राम सदावर्ती.	१	१	१०
बाळाजी रघुनाथ वेलणकर.	१	१	१०
लक्ष्मण दादाजी खाडीलकर.	१	१	१०
आबाजी भिकाजी फडके.	१	१	१०
बापुजी अनंत देवधर.	१	१	१०
लक्ष्मण सदाशिव अभ्यंकर.	१	१	१०
गणेश बल्लाळ हडप.	१	१॥	१५
अंताजी विश्वनाथ खांडेकर.	१	१	१०
हरि नारायण कोल्हटकर.	१	१	१०
मोरो हरि करंदीकर.	१	२॥	२५
मोरो कृष्ण दाभोळकर,	१	१॥	१५
बाळाजी सदाशिव वैशंपायन.	१	२	२०
दादो बल्लाळ अचवळ.	१	१	१०
निळो रंगनाथ करमरकर.	१	१	१०
नारो शिवराम चक्रदेव.	३	१३	३०
त्रिंबक महादेव जोशी.	१	१	१०
मोरो आपाजी भावे.	१	२	२०
रामचंद्र गोपाळ करकरे.	१	३	३०
लक्ष्मण दिनकर करंदीकर.	१	१	१०
गोविंद हरि देवधर.	१	२	२०
रघुनाथ मोरेश्वर देवधर.	१	४	४०
राघो नारायण ओक.	१	१	१०
अंताजी बल्लाळ जोशी.	१	१	१०
नारो महादेव अभ्यंकर.	१	१॥	१५
कृष्णाजी गणेश रहाळकर.	१	१॥	१५
नारो गणेश लिमये.	१	१	१०
कृष्णाजी रघुनाथ दातार.	१	१	१०
गोविंद हरि भट.	१	१॥	१५
लक्ष्मण बल्लाळ गोखले.	१	१॥	१५
गोपाळ लक्ष्मण लवाटे.	१	१	१०
रामचंद्र बल्लाळ गोखले.	१	१	१०

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · संस्कृति मंत्रालय · भारत सरकार · सत्यमेव जयते · २०८

CSL

मोरो गोविंद पटवर्धन.	१	१	१०
अंताजी गोविंद केळकर.	१	१	१०
चिमणाजी नारायण फडके.	१	१	१०
चिमणाजी बल्लाळ ह्मसकर.	१	-॥-	७
त्रिंबक नारायण जोशी.	१	-॥-	७
बाळाजी अनंत पंडित.	१	-॥-	७
आबाजी राम जोशी.	१	-॥-	७
सदाशिव गोविंद देवधर.	१	१॥	१५
आबाजी शंकर जोशी.	१	-॥-	७
विठ्ठल बल्लाळ दात्ये.	१	१	१०
गोविंद केशव बिवलकर.	१	१	१०
महादाजी बल्लाळ कर्वे.	१	१	१०
पांडुरंग रामचंद्र देवधर.	१	३	३०
राघो नारायण साठे.	१	१	१०
विनायक नारायण गोखले.	१	-॥-	७
बाळाजी गणेश जोशी.	१	-॥-	७
बापुजी अनंत.	१	-॥-	७
पांडुरंग गोविंद.	१	-॥-	७
बाजी रवळनाथ घाटे माजी प्रतापगडकरी.	१	२	२०
नारोराम.	१	१	१०
महादाजी रघुनाथ जोशी.	१	१	१०
कोन्हेर राम.	१	१	१०
निलकंठ खंडेराव कारकून.	२	३	७०
रामचंद्र गोपाळ.	१	१॥	१५
बाळाजी केशव.	१	१	१०
वासुदेव शिवराम जोशी निसबत दप्तर पोतनिशी	१	२	२०
महादाजी गोविंद.	१	१	१०
केसो जगन्नाथ.	१	-॥-	५
पांडुरंग हरि वैद्य.	१	१॥	१५
बाळाजी सदाशिव निसबत जिराईतखाना.	१	१	१०
रामचंद्र नारायण.	१	१	१०
आबाजी हरि.	१	१	१०

MINISTRY OF CULTURE : GOVERNMENT OF INDIA
संस्कृति मंत्रालय • भारत सरकार
सत्यमेव जयते

GSL

शिवराम बल्लाळ.	१	-॥-	५
भालचंद्र विनायक.	१	-॥-	५
अंताजी महादेव.	१	-॥-	५
लक्ष्मण गणेश गोगटे.	१	१	१०
शिवराम विश्वनाथ सोबनी.	१	२	२०
महिपतराव हरि.	१	२	२०
नारो लक्ष्मण.	१	३	३०
गोपाळ महादेव.	१	१	१०
बाळकृष्ण बाबाजी वैद्य.	१	१॥	१५
विठ्ठल मोरेश्वर.	१	२	२०
त्रिंबक विश्वनाथ भाटवडेकर.	१	२	२०
भगवंत गंगाधर मौजे माळशिरस येथें आणतील त्याविसी.	१	१॥	१५
विसाजी आबाजी.	१	-॥-	५
रामचंद्र बल्लाळ वैद्य.	१	१॥	१५
मोरो नारायण.	१	१	१०
बापुजी महादेव गुणे.	१	-॥-	५
रामचंद्र गणेश परांजपे.	१	१	१०
हरि त्रिंबक भावे.	१	१	१०
	१९१	४२०॥।	३८४८

येकूण चारशें पावणे एकवीस खंडी. येकूण बैलसर तीन हजार आठशें आठेचाळीस. यांचीं दस्तकें एकशें एक्याण्णव दिल्हीं असत.

१९८।६९ प्रांत गुजराथ मही दक्षिणतीर येथील सरसुभा आनंदराव भिकाजी याजकडे होता. तो दूर करून सालमजकुरीं बाळोजी कुंजीर यांजकडे सांगितला येविसी. सनदा पत्रें.

इ. स. १७९८।९९.
तिसा तिसेन मयाव अलफ
मोहरम २०

१ अनंदराव भिकाजी यांस कीं, महालानिहाय येथील घांस दाण्याचे ऐवजीं वगैरे तुझाकडे वसूल पडला असेल त्यापैकी महाल मजकूर खर्चाची हिशेरसीद नेमणुकेप्रमाणें मुदत माफक होईल ते वजा करून बाकी ऐवज राहील तो याजकडे माघारा देऊन कबज घेणें म्हणोन सनद. १.

११ कमावीसदार महालानिहाय व फुटगांव यांस कीं, वहिवाट मशारनिल्हेचे विद्यमानें करीत जाणें. म्हणोन सनदा.

198. Baloji Kunjar was appointed to the office of Sir Subha of Prant Gujarath to the South of the Mahi in supercession of Anandrao Bhikaji.
A. D. 1798-99.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · संस्कृति मंत्रालय · भारत सरकार · सत्यमेव जयते

१ अनंदराव विठ्ठल कमावीसदार शहर सुरत व मौजे फुलपाडे वगैरे तीन गांव परगणें चौऱ्यायशी येविसी.
१ सदाशिव कुंजीर फाल्हई यांस.
१ खंडो मोरेश्वर कमावीसदार परगणें सावला यांस.
१ महादाजी बल्लाळ कमावीसदार परगणें बलवाड यांस.
१ सदाशिव केशव कमावीसदार परगणे सरभुवन यांस.
१ आबाजी बापूजी कमावीसदार जकात तापी दक्षिणतीर.
१ विठ्ठल नारायण व चिंतो अनंत कमावीसदार परगणें हांसोट.
१ बाळोजी कुंजीर यास कीं, इमानें इतबारें (वर्तावें) ह्मणोन परगणें बलसाड वगैरे तीन महाल व पारनेरा येविसी.
१ नारायणराव यादव कमावीसदार परगणे अमोद व देहेनबारें.
१ आजीमजंग यांस परगणे जंबूसर व परगणें अंकलेश्वर व कसबें बारडोली येविसी.
१ निंबाजी भास्कर कमावीसदार परगणें पारचोल यांस.

११

१७ रुजु होणें ह्मणोन — सनदा पत्रें.

२ सनदा.
१ मौजे फुलपाडे वगैरे तीन गांव परगणें चौऱ्यायशी.
१ कमावीसदार बारडोली.

२

१५ महालानिहायचे जमीदारांस चिटणीसीं पत्रें.
१ परगणे बलसाड.
१ परगणे सावली.
१ परगणे बोहारी.
१ परगणे देहजबारें.
१ परगणे आमोद.
१ परगणे भुतसर.
१ परगणे पारनेरा.
१ परगणे पारचोल.
१ परगणे ढबई.
१ परगणे सरभुवन.
१ परगणे हांसोट.
१ परगणे बलवड.
१ परगणे अंकलेश्वर.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · संस्कृति मंत्रालय · भारत सरकार

GSL

१ परगणे जंबूसर.

१ परगणे चौऱ्यायशी पैकीं मौजे फुलपाडे वगैरे देहे तीन येविसी.

१६

१७

१ बाळोजी कुंजीर यांस कीं, प्रांत मजकूर येथील सरसुभा साल मजकुरीं तुह्मांकडे सांगितला असे. तरी इमानें इतबारें वर्तोन चौकशीनें वहिवाट करून आलाहिदा बेहडा ठराऊन दिल्हा जाईल त्याप्रमाणें वर्तणूक करणें ह्मणोन सनद. १.

३०

येकूण तीस सनदा व पत्रें मिळोन दिल्हीं असेत.

रसानगीयादी.

१९९।८१ प्रांत कोंकण येथील सरसुभा चिरंजीव राजेश्री विनायक अमृतराव यांचे नांवें आहे. तेथील कामकाज वामनाजी हरि यास सांगितलें होतें. तें दूर करून सालमजकुरीं गणपतराव जीवाजी यांस सांगितलें येविसी. सनदा.

इ. स. १७९८।९९
तिसा तिसेन मया व अलफ
साबान ३

१ गणपतराव जीवाजी याचे नांवें कीं, प्रांत मजकूर येथील सरसुभा यांचे नांवें आहे. तेथील कामकाज तुह्मांकडे सांगितलें असें. तरी इमानें इतबारें वर्तोन जमाखर्चाचा बेहडा आलाहिदा करून दिल्हा जाईल त्याप्रमाणें वर्तणूक करणें ह्मणोन. सनद.

१ वामनाजी हरि यास कीं, प्रांत मजकूर येथील सरसुभा याचे नांवें आहे. तेथील कामकाज तुह्मांस सांगितलें होतें. तें दूर करून सालमजकुरीं गणपतराव जीवाजी यास सांगितलें असे. तरी सरसुभ्याकडे ऐवज जमा जाहला असेल त्यापैकीं नेमणुकी खर्च मुदत माफक हिसेरसीद वजा करून बाकी ऐवज राहील तो मशारनिल्हे यांजकडे देऊन कबज घेणें. व निसबतवार वगैरे बाकी असेल त्याची रुजुवात करून घेणें. ह्मणोन सनद.

२

रसानगीयाद.

२००।११० प्रांत गुजराथ येथील सरसुभा महिपतराव भवानी यांजकडे होता तो दूर

199. The Sir Soobha of Konkan stood in the name of Peshwa's nephew.
A. D. 1798-99. Vinayak Amritrao, Ganpatrao Jiwaji was now appointed his deputy.

200. The office of Sir Soobha of Guzarath was taken from Mahipatrao
A. D. 1800-1801. Bhawani and conferred on Baloji Kunjar.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · सत्यमेव जयते

इ. स. १८००।०१ इहिदे मयातैन व अलफ सफर २२

करून सालमजकुरीं बाळोजी कुंजिर यांजकडे सांगितला आहे. त्यांस परगणें सत्रागांव प्रांत मजकूर येथील देसाईगिरिचा ऐवज सालाबाद सरसुभाकडे पावत असतो त्या बमोजिब देत जावा. ह्मणोन सिदि अबदुलकरीमखान यांस चिटणीसी पत्र १.

२०१।१११ प्रांत कोकण येथील सरसुभा चिरंजीव राजेश्री विनायक अमृतराव यांचे नांवें आहे. तेथील कामकाज तुह्मांकडे सांगितलें होतें. तें दूर करून सालमजकुरीं बाजीराव गोविंद यांजकडे सांगितलें असे. तरी तुह्मांकडे मुतालिकीचा शिक्का व मोतेब व कटार व शिक्के दऊत येणेंप्रमाणें दागिने आहेत. ते आणावयाकरितां कृष्णाजी रोकडा व मोराजी ह्मसका खिजमतगार पाठविले आहेत यांजबरोबर सदरहूप्रमाणें दागिने हुजूर पाठवून देणें ह्मणोन गणपतराव जिवाजी यांचे नांवें सनद. १.

इ० स० १८००।०१ इहिदे मयातैन व अलफ सफर १६.

परवानगीरुबरू.

२०२।१३० तालुके विजयदुर्ग येथील पोतनिशी धोंडो भोजदेव याजकडे आहे. ते त्याजकडून दूर करून नारो शंकर चितळे यास सालमजकुरापासून सांगोन नेमणूक सालीना धोंडो भोजदेव यास होती त्याजप्रमाणें रुपये.

इ० स० १८०१।०२ इसन्ने मयातैन व अलफ लफर १४

२५० नक्त मोईन.
२० कापड आंख ५० येकूण.
१०० कारकुनी.
३७०.

पैकीं वजा कमी रुपये ७० बाकी रुपये ३०० तीनशे सालीना करार करून देऊन हे सनद सादर केली असे. तरी याचा पुत्र थोर चाकरीचे उपयोगी होईतों पावतों मशारनिल्हे कारकून पाठवितील त्याचे हांतून तालुके मजकुरचे पोतनिशीचें कामकाज घेऊन सदरहू प्रमाणें तैनात व कारकुनी मिळोन सालीना पाववीत जाणें ह्मणोन आबाजी बापूजी मामलेदार याचे नांवें. सनद. १.

नारो शंकर चितळे याची असामी वाडयांत आचारीयांत होती. त्यास दरमहा रुपये १२ बारा रुपये पावत होते. त्यास तालुका विजयदुर्ग येथील पोतनिसीची असामी सांगोन सदरहू दरमहा दूर केला असें. रसानगीयाद येकंदर.

---

201. The Sir Soobha of Prant Konkan was held by Peshw's nephew Vinayak Amritrao and Bajirao Govind was appointed as his deputy.
A. D. 1800-1801.

202. Naro Shankar Chitale, a cook at the palace on Rs. 12 per month was appointed Potnis of Taluka Vijaydurga and was permitted to send a deputy to do the duties of the office till his son should come of age.
A. D. 1801-1802.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · भारत सरकार

२०३।१९१ प्रांत बेलापूर येथील हशमनिशी लक्ष्मण हरि याजकडे आहे. ते त्याजकडून दूर करून महादाजी गणेश काणे यांस सालमजकुरापासून सांगोन तैनांत सालीना लक्ष्मण हरि यांस होती ते रुपये २०६ पैकीं वजा कमी रुपये ६ बाकी रुपये २०० दोनशें सालीना करार करून देऊन हे सनद सादर केली असे. तरी याजपासून प्रांत मजकुर येथील हशमनिशीचें काम-काज घेऊन सदरहू प्रमाणें तैनांत सालीना पावावीत जाणें व लक्ष्मण हरि यांस कारकुनी पावत आली असेल ते प्रमाणें मजकुरचे हिशेबी जमा धरीत जाणें ह्मणोन त्रिंबक गणेश मामलेदार प्रांत मजकुर यांचे नांवें. सनद: १.

इ० स० १८०१।०२
इसने मयातैन व अलफ
सफर १४

महादजी गणेश काणे यांची असामी वाडयांत शागिर्दीत तैनांत सालीना रुपये १७५ पावणेंदोनशे व कापड आंख १०० याप्रमाणें होती. त्यास मशारनिल्हे यांस प्रांत बेलापूर येथील हशमनिशि सांगून सदरहू शागिर्दीतलि असामी दूर केली असे. रसानगी याद येकंदर.

---

७. न्याय खातें.

(अ) दिवाणी.

२०४।२५ रघुपतराव दशरथ देशपांडे परगणें हुकेरी यांणीं हुजूर कसबे तासगांव प्रांत मिरज येथील मुक्कामीं येऊन विदित केलें कीं, आमचे भाऊबंद भीमराव व्यंकटेश देशपांडें परगणें मजकूर यांणीं पुण्याचे मुक्कामीं हुजुर जाऊन विदित केलें कीं तिमाजी निलकंठ देशपांडे परगणे मजकूर यांस पुत्र संतान नव्हतें. सबब त्यांणीं आमचे बंधु शामराव यांस दत्तक घेतले दशरथराव कन्येचे पुत्र यास तिमाजी निळकंठ यांणीं दत्त घेतला नाहीं. धर्मार्थ मुंज केली असतां दशरथराव तिमाजी निलकंठ यांच्या हिशाचें वतन खातात याजकरितां त्या वतनाची जप्ती झाली पाहिजे. त्याजवरून तिमाजी निलकंठ यांच्या वतनाची जप्ती करून जप्ती महिपतराव कृष्ण यांजकडे सांगितली. त्याजवरून आमचे तीर्थरूप दशरथराव तिमाजी देशपांडे परगणें मजकूर याणे हुजूर पुण्याचे मुक्कामीं जाऊन विदित केलें कीं, तिमाजी निल-कंठ यांणीं आह्मांस दत्तपुत्र घेऊन स्वगोत्रीं मुंज केली. त्याचे तक्षीमीचें वतन आम्हीं अन-भवीत आलों. व भिवराव यांचे वंडिलांस तिमाजी निलकंठ यांच्या वडिलांनीं कापसी कर्यात धर्मवांटा दिल्हा असतां त्यांणी सरकारांत गैरवका समजाऊन आमच्या वतनाची जप्ती कर-

इ० स० १७९७।९८
समान तिसेन मयातैन व अलफ
मोहरम १०

---

203. Mahadaji Ganesh Kane, a Shagirda at the palace on Rs. 175 a year in addition to the clothes worth Rs 100 was appointed Hashamnis of Prant Belapoor.

A. D. 1801-1802.

204. A Deshpande of Hukeri adopted his daughter's son as his son. The fact of the adoption was however questioned by one of the Bhaubunds. The matter was inquired into the adoption having been proved, the adopted son was allowed to enjoy the watan.

A. D. 1797-98.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA

CSL

विलें. यास्तव स्वामींनीं भिवराव व्यंकटेश याच्या वतनाची जप्ती करून उभयतांची पंचाईत मनास आणावयाची आज्ञा जाहली पाहिजे. त्याजवरून परशुराम रामचंद्र यांस सन समानिनांत सरकारांतून सनद सादर जाहली. जे दशरथराव तिमाजी यांच्या वतनाची जप्ती महिपतराव कृष्ण यांजकडे सांगितली होती; ते दूर करून हल्लीं तुह्मांकडे सांगितली आहे. तरी तुम्ही भिमराव व्यंकटेश याचे वतनाची जप्ती करून उभयतांची पंचाईत करणें ह्मणोन. त्याजवरून आह्मी हरदुवाद्यांस परस्थळीं पंचाईतीस पाठवावयाचा ठराव केला. तों आमचे तीर्थरूप दशरथराव तिमाजी निवर्तले, तेव्हां आम्हीं व आमचे बंधु रामाजी दशरथ यांचें व भीमराव व्यंकटेश यांचे राजीमतें अमदानगरचे स्थळ नेमून स्थळीं जाण्याचे राजीनामे व वर्तणुकेविसीं जामीन घेऊन परशुराम रामचंद्र यांणीं अमदानगरास महादाजी नारायण यांजकडे पत्रें देऊन मनसुबीस पाठविलें. तेथें त्यांनीं आह्मां उभयतांची मनसुबी पंचाईतमतें मनास आणितां भिमराव व्यंकटेश हे आपला बंधु शामराव यास तिमाजी निलकंठ यांणीं दत्तक घेतला. दशरथराव यांस तिमाजी निलकंठ यांणीं दत्तक विधिपूर्वक घेतलें नाहीं. धर्मार्थ मुंज केली असें ह्मणत होते. त्यांची पुरवणी त्याजकडून जाहली नाहीं. परंतु दशरथराव तिमाजी यांस तिमाजी निलकंठ यांणीं दत्त विधीपूर्वक घेऊन स्वगोत्रीं मुंज केली. त्याप्रमाणें दशरथराव तिमाजी, तिमाजी निलकंठ यांचें वृत्तीस अधिकारी होऊन भोगवटा करीत आले. ऐसी आह्मीं पुरवणी केली. त्याजवरून महादाजी नारायण यांणीं अमदानगरहून हरदुवाद्यांचे निवाड्याचीं कागद पत्रें पंचाईतमतें करून परशुराम रामचंद्र यांजकडे तासगांवीं पाठविलीं आणि आह्मां हरदुवाद्यांस निरोप दिल्हा. आम्हीं तासगांवीं आलों. भीमराव व्यंकटेश अमदानगराहून निघाले ते पुण्यास येऊन राहिले आणि सदरहूच्या फडशाकरितां आपले पुत्र येशवंत भीमराव यांस तासगांवीं पाठविलें. त्यास परशराम रामचंद्र यांनीं सांगितलें कीं, येविसीचे कागदपत्र भीमराव व्यंकटेश यांचे नांवचे आहेत यास्तव ते आले पाहिजेत. याजकरितां त्यास आणवणें. त्याजवरून भीमराव व्यंकटेश पुण्याहून निघून येत असतां मार्गी मृत्यु पावले. व आमचे बंधु रामाजी दशरथ हे घरीं होते तेही निवर्तले. त्यांचे पुत्र हल्लीं येशवंत रामाजी आहेत. याकरितां अमदानगरच्या निवाड्याप्रमाणें वर्तूं ह्मणोन आम्हांपासून व येशवंत भीमराव देशपांडे परगणे मजकूर यांजकडून राजीनामे लिहून घेऊन परशराम रामचंद्र यांनीं अमदानगराहून महादाजी नारायण यांजकडून निवाड्याचे कागदपत्रांचा लखोटा आला होता, तो आह्मां उभयतां वाद्यांसमक्ष फोडून वांचून पाहिला. त्यांत भीमराव व्यंकटेश हे आपला बंधु शामराव यांस तिमाजी निलकंठ यांनीं दत्तक घेतला दशरथराव यास तिमाजी निलकंठ यांनीं दत्तक विधिपूर्वक घेतले नाहीं. धर्मसुंज केली असें ह्मणत होते. त्याची पुरवणी त्यांजकडून जाहाली नाहीं. व आमचे तीर्थरूप दशरथराव तिमाजी हे कापसी कर्यात तिमाजी निलकंठ यांच्या वडिलांनीं भीमराव व्यंकटेश यांचे वडिलांस धर्मवाटा दिला असें ह्मणत होतें. त्याची पुरवणी आह्मांकडून झाली नाहीं. परंतु आमचे तीर्थरूप दशरथराव उर्फ निलकंठ तिमाजी यांस तिमाजी निलकंठ यांनीं दत्तक विधिपूर्वक

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA

घेऊन स्वगोत्रीं मुंज केली. त्याजप्रमाणें तिमाजी निलकंठ यांचे वृत्तीस अधिकारी होऊन भोगवटा करीत आले. अशी पुरवणी कागदपत्रीं पंचाईत मतें आम्हीं केली. याप्रमाणें लिहिलें आहे. याकरितां स्वामींनीं कृपाळू होऊन अमदानगरच्या निवाड्याबरहुकूम आमच्या वतनाची जप्ती मोकळी होऊन तिमाजी निलकंठ यांचे दो तक्षिमींचें वतन आमचे स्वाधीन होय तें केलें पाहिजे. ह्मणून विनंति केली. त्याजवरून मनास आणतां भीमराव व्यंकटेश हे आपला बंधु शामराव यांस तिमाजी निलकंठ यांनीं दत्तक घेतला, दशरथराव यांस तिमाजी निलकंठ यांनीं दत्तक विधिपूर्वक घेतला नाहीं. धर्मार्थ मुंज केली असें ह्मणत होतें. त्याची पुरवणी भीमराव यांजकडून जाहली नाहीं. ते खोटें पडलें व रघुपतराव दशरथ याचे तीर्थरूप दशरथ तिमाजी हे कापसी कर्यात तिमाजी निलकंठ यांच्या वडिलांनीं भीमराव व्यंकटेश यांच्या वडीलांस धर्मवांटा दिल्हा असें ह्मणत होतें. त्याची पुरवणी रघुपतराव दशरथ यांजकडून जाहली नाहीं. ते खोटें पडलें. परंतु दशरथराव उर्फ निळकंठ तिमाजी यांस तिमाजी निळकंठ यांणीं दत्तविधिपूर्वक घेऊन स्वगोत्रीं मुंज केली. त्याप्रमाणें दशरथराव तिमाजी, तिमाजी निळकंठ यांच्या वृत्तीस अधिकारी होऊन, भोगवटा करीत आले. अशी पुरवणी कागदपत्रीं व पंचाईतमतें रघुपतराव दशरथ यांणीं केली. असें नगरच्या निवाड्यांत लिहून आलें आहे. तें पाहून रघुपतराव दशरथ देशपांडे परगणे मजकूर यांस तिमाजी निळकंठ यांच्या दोन तक्षिमा देशपांडेपण वडीलकीसुद्धां वतन पूर्ववतप्रमाणें यांजकडे करार करून देऊन सालमजकुरापासून यांच्या वतनाची जप्ती मोकळी करून हें पत्र सादर केलें असे. तरी तिमाजी निळकंठ याचें दो तक्षिमेचें देशपांडेपणाचें वतन दुमाली गांव व इनाम जमीनी व हक्क वगैरे कानुकायदे पेशजीपासून चालत आल्याप्रमाणें भोगवटीयाचा दाखला पाहून रघुपतराव दशरथ देशपांडे परगणे मजकूर यांचे दुमाला करणें ह्मणून परशुराम रामचंद्र यांचे नांवें छ २२ मोहरमीं. पत्र १.

२०५।१३२ गोविंद श्रीधर दिमत रामराव नारायण याचे नांवें सनद कीं, तुम्हीं छ १० मोहरमचें विनंति पत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहलें. व्यंकणभट तैलंग मौजे रोहे परगणे घोसाळे प्रांत राजापुरी येथें होता. तो मृत्यु पावला. त्याचे कोणी येथें नव्हतें. यास्तव त्याची वस्तवानी वगैरे होतें तें सुभा आणून त्याची किंमत करून दोनशें पावणे बहात्तर रुपये अमानत ठेविले. त्याचे कोणी येईल याजकरितां एक वर्ष मार्गप्रतिक्षा केली. परंतु कोणी आलें नाहीं. तेव्हां सन तिसा तीसिनांत आखेर तारखेस सदरील ऐवज कमावीस मवेसी

इ. स. १८०१।०२
इसने मयातैन व अलफ
सफर २७

205. Vyankanbhat Telang died at Rohe in Prant Rajpuri without any known heir. His property was attached and was found to be worth Rs. 171-12. It was kept in deposit for one year to enable to claiments to appear and claim it. At the end of the period, the amount was brought to the credit of Government. Venkan Bhat's son subsequently appeared and claimed the amount. The amount having been credited to Government, its refund required the sanction of Government. The sanction was asked for and was granted.

A. D. 1801-1802.

सरकारांत प्रांत मजकूरचे हिशेबीं जमा धरिला. त्यास हल्लीं सन इहिदे मयातैनांत वेंकणभट तेलंग याचे पुत्र वेदमूर्ति अयंभट तेलंग येथें ऐवज मागावयास आले. ऐशास ऐवज सरकार-हिशेबी जमेस आला तो सनदेशिवाय देतां नये यास्तव भटजी हुजूर आले आहेत. ह्मणून लिहिलें. त्यास व्यकंण भट तेलंग यांचे रुपये २७१॥। दोनशें पावणें बहात्तर रुपये जमेस आले आहेत. ते त्याचे पुत्र अयंभट यास सदरहु रुपये मावारे देविले असेत. तरी लिहिले-प्रमाणें दोनशें पावणे बहात्तर रुपये प्रांत मजकूरचे हिशेबीं बाजदादन खर्च लिहून देणें ह्मणोन

सनद.

रसानगीयाद.

२०६।१७८ वेदमूर्ति नारायण भट बीन माणीक भट इंगळे जोतिषी व धर्माधिकारी ग्रामो-पाध्ये याणीं हुजुर विदित केलें कीं कसबे पांगरी व मौजे चिंचवली व मौजे जहानपूर व मौजे ममदापूर परगणें पांगरी देहाय मजकूर येथील जोतीष व धर्माधिकरण व ग्रामोपाध्या-यपणाची वृत्ति पुरातन आमची आमचे वडील पिढी दर पिढी अनुभवीस आले असतां, दर-म्यान शिवभट सामक यांचे वडील जोतिषाचे निमे वृत्तीस जडोन वहिवाट करीत असतां, अलीकडे परगणें मजकूर हा महाल सरंमजामास निलकंठ आंबुराव बारामतीकर याजकडे होता. त्याजकडील कमाविसदार आबाजी व्यंकटेश याजकडे सामकांनीं आपली कन्या दिली. त्या नात्याने त्यांनीं आमचे वृत्तीपैकीं दरोबस्त जोतिषाची वहिवाट सामकाकडे चालवून उ-पाद्धिक व धर्माधिकरणाची वृत्ति आमानत केली. त्याजवरून सामकाचा व आमचा जोति-षाची वृत्तिविषयीं कजियापुरवी हुजूर पडला. तेव्हां पांढरीची व जमीदार यांची सडी साक्ष जाहली. त्याचा निर्णय झाला नसतां जोतिषाची वृत्ति दरोबस्त सामक अनुभवितात त्यास पूर्ववतप्रमाणें देहाय मजकूरच्या वृत्ति आमच्या आह्माकडे चालवून सामक यासी हुजूर आणून मनास आणावयाची आज्ञा जाहली पाहिजे ह्मणोन त्याजवरून हें आज्ञापत्र सादर केलें असे. तरी देहाय मजकूरचे जोतीष व धर्माधिकरण व ग्रामोपाद्धिकपणाची वृत्ति नारायणभट इंगळे व त्याचे भाऊबंद यांजकडे पूर्वीपासून सुदामत चालत आल्याप्रमाणें चालवणें दिक्कत असली यास सिंह भट सामक याजपाशीं साधनाचे कागदपत्र असतील त्यासुद्धां हुजूर पाठ-वणें. हरदुजणांचे वृत्त मनास आणून आज्ञा होईल त्याप्रमाणें करणें ह्मणोन छ १७ साबान

इ० स० १८०३।०४
अर्वा मयातैन व अलफ
सफर २५.

पत्रें.

---

206. The Joshi and Dharmadhikari watans of Pangri and other villages in Pargana Pangari were enjoyed by two families, Ingle and Samak. The new Kamavisdar Abaji Vyankatesh being re-lated to the Samaks, made over the whole watan to them. The Ingles having complained the village officers and the Deshmukha and the Deshpande were directed to continue the old practice and in case there was any doubt to send the Samaks with their papers to the Huzur. (This and other orders in judicial matters recorded on this date appear to have been passed on the recommendation of Balshastri Tokekar.)

A. D. 1803-1804.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · संस्कृति मंत्रालय · भारत सरकार

CSL

१ मोकदम देहाय मजकूर यांस.
१/२ देशमूख व देशपांडे देहाय मजकूर यांस.

(या व इतर बऱ्याच सनदा न्यायसंबंधाच्या या तारखेस बार आहेत त्यांच्या आरंभीं विद्यमान वेदमूर्ति बाळशास्त्री टोकेकर असें लिहिलें आहे.)

७. न्यायखातें.

(ब) फौजदारी गुन्हे.

१. फंद फितुरी व राजद्रोह.

इ. स. १७९८।९९ तिसा विसेत मया व अलफ साबान ४

२०७।८९ गोविंदराव कृष्ण काळे यांस कैद करून किल्ले सिंहगड येथें अटकेंस ठेवावयास पाठविले असेत. तरी किल्ले मजकुरीं पक्के बंदोबस्तीनें अटकेस ठेवून पोटास सिधा उत्तम प्रतीचा देत जाणें. जेवणाचा बंदोबस्त चांगला राखीत जाणें. यांजबरोबर बंदोबस्तास बळबंतराव कृष्ण यांजकडील स्वार दिल्हे आहेत, ह्मणोन बाळाजी बाबुराव याचें नांवें सनद. १.

परवानगी रुबरू.

गोविंदराव कृष्ण काळे याणीं फितूर केला. सबब कैद करून अटकेंस ठेविलें त्यांचें घर कसबे बारामती येथें आहे. त्याची जप्ती करावयास हुजरून विसाजी बापुजी कारकून दिमत जोत्याजी जाधवराव यांस समागमें गाडदी देऊन पाठविले असेत. तरी तुह्मीं आपला कारकून देऊन वस्तवानीची व घोडीं व उंटें व गुरें जराबाजरा जप्त करून चौकी पाहऱ्याचा बंदोबस्त चांगला राखून मोजदादीचा जाबता पाठवून देणें. येथें घरीं मुलें माणसें व कारकून वगैरे असतील त्यांचा बंदोबस्त चांगला राखणें. विसाजी बापुजी यांजबरोबर स्वार दिमत जोत्याजी जाधवराव यांसही दिल्हे आहेत, ह्मणोन पांडुरंग बापुराव याचें नांवें. सनद. १.

परवानगी रुबरू.

इ. स. १७९८।९९ तिसा विसेन मया व अलफ साबान ७

२०८।८९ शिवराम नारायण थथे यांस कैद करून किल्ले कर्नाळा येथें अटकेंस ठेवावयास पाठविले असेत. तरी यांस पक्कें बंदोबस्तानें अटकेंस ठेवून पोटास सिधा उत्तम प्रतीचा देत जाणें यांजबरोबर बंदोबस्तास नारो शिवराम यांजकडील स्वार दिल्हे आहेत, ह्मणोन परशराम निलकंठ चक्रदेव यांचे नांवें. सनद. १.

परवानगी रुबरू.

---

207. Govindrao Krishna Kale being implicated in a conspiracy, was arrested and imprisoned at fort Sinhgad and his house at Baramati was attached.
A. D. 1798-99.

208. Shivaram Narayan Thathe was also arrested and sent to prison.
A. D. 1798-99.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · संस्कृति मंत्रालय · भारत सरकार

GSL

इ०स०१७९९।००
मयातैन व अलफ
साबान १३

२०९।१०७ किल्ले पारगड तालुके धारवाड येथील हवालदार यांणीं करवीरकर यांजकडे फितूर करून किल्ला त्यांजकडे द्यावा याप्रमाणें केलें हा मजकुर किल्ले मजकूरचे दरकदार व लोक यांणीं तुह्मांकडुन कलानिधी येथें गोपाळ बल्लाळ कारकून आहेत त्यांस सांगितला. त्याजवरून त्यांणीं तेथील दरकदार व लोक याजबरोबर आपलेकडील लोक व कारकून देऊन हवालदार यांस अटक करून किल्ले मजकूरचा बंदोबस्त केला. आणि फितुरी असामी सांपडले त्यांचे पायांत बिडी घालून किल्ले कलानिधी येथें अटकेंत ठेविले आहेत. ह्मणोन तुम्हीं विदित केलें. त्याजवरून हे सनद तुम्हांस सादर केली असे. तरी किल्याचा बंदोबस्त यथास्थित राखोन फितुरी असामी सांपडले आहेत त्यांच्या जबान्या चौकशीनें घेऊन फितुराचे कागदपत्र व जबान्या हुजूर पाठवून देणें. समजोन आज्ञा होईल त्याप्रमाणें करणें, ह्मणोन बाळाजी रामचंद्र तालुके कलानिधी यांचे नावें. सनद. १.

रसानगी चिमणाजी खंडेराव.

इ. स. १८००।०१
इहिदे मय्यातैन व अलफ
मोयरम २१.

२१०।१०७ सरकारचे अपराधी सबब त्यांचे घराचे जप्तीविसीं व असाम्या चालवुंनये येविसी वगैरे मामलेदार तालुके हाय यांचे नावें सनदा.

२ कृष्णराव महिपतराव मामलेदार तालुके रत्नागिरी यांचे नावें सनदा.

१ धोंडो नारायण लिमये यांचें घर मौजे सोमेश्वर तर्फ हरचीरी तालुके मजकूर येथें आहे. त्याची जप्ती करावयाकरितां हुजुरून विनायकराव कारकून व खिजमतगार असामी २ पाठविले आहेत. तरी तुम्हीं मशारा निल्हेबरोबर सुभाहून कारकून व लोक देऊन यांचे घराची जप्ती करून वस्तवानीची वगैरे जराबाजरा मोजदाद करून हुजूरचे व सुभ्याचे कारकुनाकडून जाबता तपशीलवार तयार करून हुजूर पाठवून देणें. व मुलें माणसें बंदोबस्तानें ठेवणें ह्मणोन सनद.

---

209. The Havaldar of fort Pargad in Taluka Dharwad was conspiring with the Kolhapur State regarding the surrender of the fort. The Darkdars and men of the fort communicated the fact to Gopal Ballal Karkun at fort Kalanidhi. He caused the conspirators to be arested. The matter being reported to Government, it was ordered that all papers regarding the conspiracy together with the statements of the persons implicated should be submitted for orders.

A. D. 1799-1800.

210. Some karkoons having incurred the displeasure of Government were removed from service and their property was attached. Among other names which are given in the Sanad, appear the names of Naro Shivaram Chakradev, Dhondo Narayan

A. D. 1810-11.

Limaye &c.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · सत्यमेव जयते · संस्कृति संचालय · भारत सरकार

CSL

१ राघो विश्वनाथ गोडबोले यांजकडे किल्ले जयगड तालुके मजकूर येथील फडणिसी आहे. त्यांस हे सरकारचे अपराधी सबब फडणिसीचें कामकाज मना केलें असे. तरी त्यांजकडील कारकुनापासून किल्ले मजकूरचे फडणीसीचें कामकाज न घेणें, ह्मणोन सनद.

२

१ बाळकृष्ण बापुजी मामलेदार तालुके अंजनवेल यांस कीं, राघो विश्वनाथ गोडबोले यांचें घर मौजे शिरळ तालुके मजकुर येथें आहे. त्याची जप्ती करावयाकरितां हुजुरून बाळाजी राम कारकून व खिजमतगार आसामी २ दोन व गाडदी पाठविले आहेत. तरी हे घराची जप्ती करून वस्तवानीची वगैरे जराबाजरा मोजदाद करून जाबता हुजूर पाठवून देतील, व मुलें माणसें बंदोबस्ताने ठेवतील ह्मणोन सनद.

१ गणपतराव जिवाजी मामलेदार तालुके वसई यांस कीं, शंकराजी विश्वनाथ चक्रदेव यांजकडे तालुके मजकूर येथील हाशमाकडील फडणिसीची असामी आहे. त्यांस यांजकडील कारकूनाचें हातें दरकाचें कामकाज न घेणें ह्मणोन सनद.

१ कारकून दिमत पंतसचीव यांस कीं, नरसो तुकदेव यांचें घर-कसबे शिरवळ येथें आहे. त्याची व वतनाची जप्ती करावया-करितां सरकारांतून बाळाजी व्यंकटेश कारकून व खिजमत-गार व गाडदी पाठविले आहेत. हे घराची जप्ती करून व-स्तवानीची वगैरे जराबाजरा मोजदाद करतील. व त्यांचे हि-शाचे वतनाची जप्ती करतील ह्मणोन सनद.

१ जोत्याजी जाधवराव यांस कीं, चिमणाजी खंडेराव यांचें घर वाडी मौजे दिवे येथें आहे त्याची जप्ती करावयाकरितां हुजूरून राघो निळकंठ कारकून व खिजमतगार व गाडदी पाठविले आहेत. तरी तुम्हीं मशारनिल्हे बरोबर प्रांत पुणें पैकीं कारकून देऊन यांचें घराची जप्ती चौकशीनें करून वस्तवानीची वगैरे जराबाजरा मोजदाद करून हुजूरचे व प्रांत मजकुरांकडील कारकुनाकडून जाबता तयार करून हुजूर पाठवून देणें, ह्मणोन रामचंद्र नारायण मामलेदार प्रांत पुणें यांस आलाहिदा सनद सादर केली असे. तरी हुजूरचे व प्रांत मजकुराकडील कारकून वस्तवानीची वगैरे जराबाजरा जप्ती करून मुलें माणसें तुमचे जिमेस करतील त्याप्रमाणें

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · संस्कृति मंत्रालय · भारत सरकार

CSL

तुम्हीं आपले जिमेस करून घेऊन बंदोबस्तानें ठेवणें. ह्मणोन सनद.

१ रघुनाथ धोंडदेव मामलेदार तालुके कर्नाळा यांस कीं, नारो शिवराम चक्रदेव हे सरकारचे अपराधी सबब काशिनाथ कृष्ण मशारनिल्हेचे पुतण्ये यांजकडे तर्फ मजकूर येथील सुभ्याची फडणिसी आहे. त्यांचे हातें कामकाज ध्यावयाचें मना करून हे सनद सादर केली असे. तरी तालुके मजकुरची फडणिसी त्याजकडे न चालवणें. मशारनिल्हेचे पुतण्यास हुजूर पोंहचवून देणें, ह्मणोन सनद.

१ सदाशिव भास्कर मामलेदार किले विसापूर यांस कीं, नारे शिवराम व परशराम निलकंठ व लक्ष्मण बल्लाळ व शंकराजी विश्वनाथ चक्रदेव हे सरकारचे अपराधी सबब यांचीं घरें मौजे डूमगांव प्रांत कल्याण येथें आहेत. त्यांची जप्ती करावयाची आज्ञा तुह्मांस करून हे सनद सादर केली असे. तरी यांचे घरांतील वस्तवानी वगैरे याची जप्ती चौकशीनें जराबाजरा करून चौकी पाहरे याचा बंदोबस्त राखोन मोजदादीचा जाबता हुजूर पाठवून देणें व मुलें माणसें बंदोबस्तानें ठेवणें. ह्मणोन सनद.

१ रामचंद्र नारायण मामलेदार प्रांत पुणें यांस कीं, चिमणाजी खंडेराव यांचें घर जाधवाची वाडी मौजे दिवे येथें आहे. त्याची जप्ती करावयाकरितां हुजरून राघो निलकंठ कारकून व खिजमतगार असामी २ दोन व गाडदी पाठविले असेत. तरी तुह्मीं मशारनिल्हे बरोबर प्रांत मजकूरपैकीं कारकून देऊन त्याची जप्ती चौकशीनें करून वस्तवानीची वगैरे जराबाजरा मोजदाद हुजूरचे व तुम्हांकडील कारकुनांकडून करून जाबता हुजूर पाठवून देणें व मुलें माणसें जोत्याजी जाधवराव यांचे हवालीं करून देऊन बंदोबस्तानें ठेवणें ह्मणोन आलाहिदा सनद सादर केली आहे. तरी मुलें माणसें त्याचें हवालीं करणें. ह्मणोन सनद.

१ श्रीनिवास शामराव मामलेदार प्रांत वऱ्हाड यांस कीं, धोंडो नारायण लिमये हे सरकारचे अपराधी सबब जनार्दन धोंडदेव मशारनिल्हेचे पुत्र याचे नांवें प्रांत मजकूर येथील दप्तरदारीची असामी आहे. त्याचे हातें कामकाज ध्यावयाचें

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · संस्कृति मंत्रालय · भारत सरकार

मनाकरून हे सनद सादर केली असे. तरी प्रांत मजकूरची दसरदारी त्याजकडे न चालवणें. जनार्दन धोंडदेव यांस बरोबर प्यादे देऊन हुजूर पाठवून देणें. म्हणून सनद. १.

१ कृष्णसिंग पागा दिमत मजकूर यांस कीं, धोंडो नारायण लिमये याचे नांवें तुह्मांकडील पागेची पोतनिसीची असामी आहे. त्याचे हातें कामकाज ध्यावयाचें मनाकरून हे सनद सादर केली असे. तरी पागेकडील पोतनिसी त्याजकडे न चालवणें. व मशारनिल्हे यास हुजूर पोंहचवून देणें. म्हणून सनद.

१ बळवंतराव नागनाथ पागा दिमत मजकूर यांस कीं, तुम्हांकडील पागेची फडणिसी परशराम निळकंठ चक्रदेव यांजकडे आहे, व दसरदारी धोंडो नारायण लिमये यांजकडे आहे. त्यास हे सरकारचे अपराधी सबब यांचे हातें कामकाज ध्यावयाचें मनाकरून हे सनद सादर केली असे. तरी फडणिसी व दसरदारी त्यांजकडे न चालवणें, म्हणून सनद. १.

१ गणपतराव निंबाजी मामलेदार तालुके वसई यांस कीं, हरि शिवराम याची, शिवराम चक्रदेव याचे बंधु यांचे नांवें आरमार तालुके वसई येथील कारकूनांत असामी आहे, त्यांजकडे दर्यावर्दीयांचें हजीरीचें काम आहे. तें त्याचें हातें ध्यावयाचें मनाकरून हे सनद सादर केली असे. तरी त्याजकडे असामी न चालवणें, व हरि शिवराम याजबरोबर प्यादे देऊन हुजूर पाठवून देणें. म्हणोन सनद.

१३

२११।१०८. किल्ले हडसर येथें अटकेंत ठेवावयाकरितां असामी.

इ. स. १८००।०१.
इहिदे मयातैन व अलफ
सफर १.

१ नारो शिवराम चक्रदेव.
१ लक्ष्मण बल्लाळ चक्रदेव.
१ नरसो तुकदेव.
१ धोंडो नारायण लिमये.
१ राघो विश्वनाथ गोडबोले.

५

211. Naro Shivram and other karkoons were sent for imprisonment at fort
A. D. 1800-1801. Hdsar and orders were issued to give them excellent food
and to take every care of their health.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · सत्यमेव जयते · संस्कृति मंत्रालय · भारत सरकार

CSL

येकूण पांच असामी यांचे पायांत बिडया घालून समागमें बाळाजी रघुनाथ यांस पागा व गाडदीसुद्धां देऊन पाठविलें असेत. तरी सदरील पांच असामी यांस किल्लेमजकुरीं पक्कें बंदोबस्तानें अटकेंत ठेवून पोटास शिधा उत्तम प्रत देत जाणें; यांस कैदेंत वेगळाले ठेवून बेकमेकांची गांठ पडो न देणें. यांजकडेस चाकरीस ब्राम्हण व आचारी चांगला स्वयंपाक करावयास ठेवून देणें. हे तेथें पोंहचल्यावर बाळाजी रघुनाथ यांस पागा व गाडदीसुद्धां माघारी पाठविणें. या पांच असामींची शरीरप्रकृतिविसीं जपोन निगा चांगली करीत जाणें. म्हणोन परशराम खंडेराव यांचे नांवें सनद. १.

परवानगीरुबरू.

२१२।१०९. नारो शिवराम चक्रदेव वगैरे असामी पांच किल्ले हडसर येथें अटकेंस ठेविले आहेत त्यांच्या हजामती करवीत जाणें. म्हणोन परशराम खंडेराव यांचे नांवें सनद. १.

इ. स. १८००।०१. इहिदे मयातैन व अलफ सफर १०

परवानगीरुबरू.

---

७. न्यायखातें.

—:०:—

(ब) फौजदारी. (अ) गुन्हे.

(२) खून व आत्महत्या.

२१३।२१८. मैनी सफरी विधवा ब्राह्मण बायको व तिचा लेक धोंडो नरसी सफरे वस्ती पेठ नारायण शहर पुणें या हरदुजणांनीं आवचितराव तात्याजी कुकडे ब्राह्मण नगरकर यांस ओळखीमुळें आपलें घरीं दिपवाळींत भाऊबिजेचे दिवशीं रात्रौ फराळास बोलावून करंज्यांत व पेढ्यांत कैफ घालून खाण्यास दिलें. त्यामुळें कैफ येऊन बेसुस्त होऊन सफरीचें घरीं निजोन राहिला. नंतर दोन प्रहर रात्रीचें अमलांत सफरीनें सुरी धोंडो नरसीजवळ देऊन आपण आवचितराव याचे हात धरून लेकानें मान कापून जिवें मारिला. आणि आवचितराव याचें हातांत सोन्याचें कडें होतें तें घेतलें. सबब हरदुजणांस कैद करून किल्लेहाय मामले कोहोज येथें पाठविलें आहेत. असामी.

इ. स. १८०८।०९ तिसा मयातैन व अलफ जिल्काद १७

A. D. 1800-01. 212. Permission was given to allow them to get shaved.

A. D. 1808-1809. 213. Maini Safri a Bramine widow and her son Dhondo Narsi Safare invited Awchitrao Tatyaji Kukde for supper during the Divali festival. They mixed some intoxicating articles with food and gave it to Awchitrao to eat. He got intoxicated and slept at Maini's house. At midnight Maini gave a sythe to his son and asked him to murder Awchitrao. He did so while Maini held Awchitrao's hands. They then removed a golden bracelet, he had on his person. The widow and her son were therefore arrested and sent to prison.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · सत्यमेव जयते · संस्कृति मंत्रालय · भारत सरकार

१ मैनी सफरी किल्ले अशेर येथें.
१ घोंडो नरसी सफरे किल्ले कोहोज येथें.

येकूण दोन असामी यांस बराबर रखवालीस बाळाजीराम गोखले यांजकडील लोक देऊन हरदु किल्यावर अटकेंत ठेवावयास पाठविले असेत. तरी यांस पक्कें बंदोबस्तानें अटकेंत ठेऊन पोटास शेर शिरस्तेप्रमाणें देत जाणें. ह्मणोन केशवराव जगन्नाथ किल्लेदार मामले मजकूर यांस.

सनद. १.

रसानगीयाद.

इ. स. १८११।१२
इसन्ने अशर मयातैन व अलफ
मोहरम २७

२१४।२३७ सदाशिव बाजी मराठे वस्ती पेठ शुक्रवार शहर पुणें याणें आपली मातुश्री उमाबाई मराठी इजला तरवारीनें तोडून जीवें मारिलें. सबब किल्ले कोहोज मामले मजकूर येथें अटकेंस ठेवावयास बरोबर बंदोबस्ता-करितां बाळाजीराम गोखले याजकडील शहरचे चौकी पहाऱ्याचे नेमणुकेंपैकीं लोक देऊन पाठविले असेत. तरी पक्या बंदोबस्तानें किल्ले मजकुरीं अटकेंत ठेवून पोटास शेर शिरस्तेप्रमाणें देत जाणें. ह्मणोन परशराम खंडेराव मामले मजकूर यांचे नांवें

सनद. १.

रसानगीयादी.

---

७. न्यायखातें.

—:०:—

(ब) फौजदारी. (अ) गुन्हे.

(३) डाके. (दरोडे.)

इ. स. १८०१।०२
इसन्ने मयातैन व अलफ
रबिलाखर २५

२१५।१३३ वेदमूर्ति वैजनाथ भट भागवत यांचें घरीं सातारीयास दरवडा पडला आहे. त्यास चोरांचा पत्ता लाऊन घरावयासी आपाजीराम मामलेदार व गोपाळजी येवले सरनोबत किल्ले नांदगिरी यांस आज्ञा केली येविसी सनदा पत्रें.—

२ आपाजीराम मामलेदार व गोपाळजी येवले सरनोबत यांस कीं, ह्मातारजी नाईक सातारकर यानें जबानींत चोरांची नांवनिशी लिहून दिली आहे. ते असामी.—

---

214. Sadashiv Baji Marathe residing in Poona killed his mother with a sword
A. D. 1811-12. He was therefore sent to prison.

215. A dacoity was committed at the house of Vaijanath Bhat of Satara.
A. D. 1801-1802. Mhatarji Naik of Satara was examined and orders were issued for the apprehension of the dacoits named by him together with their families. The Pant Pratinidhi was informed that persons residing in his charge frequently committed thefts in Government territory, that he should guard against this practice and hand over persons committing theft to the officers of Government.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · संस्कृति मंत्रालय · भारत सरकार

CSL

८ मुवोजी व मुरारजी व हैबती व लिंब्या व राणा व सदू व माल्हू व मल्या मांग वाठारकर असामी.

१ साब्या मांग बोरगांवकर.

३ म्हातारजी व खेत्रू व चांग्या जाखणगांवकर.

१२

एकूण बारा असामींचा चौकशीनें पत्ता लाऊन त्यांस व त्यांचे मिलाफी आणखी कोणी असतील त्यांस धरून पोराबाळासुद्धां किल्ले मजकुरीं अटकेंत ठेऊन त्यांचे घराची चीजबस्त व गुरे वगैरे जराबाजरा जप्ती करून भागवत यांचे वस्तवानींचा पत्ता लावून किल्ल्यास आणून हुजूर लिहून पाठविणें. ह्मणोन सनदा.

१ आपाजीराम यांस.

१ गोपाळजी येवले यांस.

१ पंत प्रतिनिधि यांस कीं तुह्मांकडील जिल्हेंत चोरटें राहून सरकारचे महालांत चोऱ्या करतात. व हल्लीं मशारनिल्हेचे घरीं दरवडा पडला. त्या चोरांचे पत्ते तुमचे जिल्हेंत लागतात. ह्मणोन विदित जाहलें ऐशास तुम्हांकडील जिल्हेंत चोरांचा पत्ता हे लावतील त्यांस धरून यांचे हवालीं करणें. व पुढें गांवगन्ना महालानिहाय वगैरे ठिकाणीं तुमचे जिल्हेंत चौकशी करून चोरटे सांपडतील त्यांचें पारिपत्य करून पुन्हा सरकारचे महालांत वगैरे चोऱ्या जाहल्यास कार्यास येणार नाहीं, ह्मणोन तुह्मांकडील कमाविसदार वगैरे यांस ताकीद करावी. म्हणोन पत्र.

१ मोकदम देहाय यांस कीं, गांवगन्ना चोरांचा पत्ता लाऊन चोर सांपडतील ते यांचे हवालीं करणें म्हणोन पत्र.

४

रसानगीयाद.

७. न्यायखातें.

(ब) फौजदारी. (अ) गुन्हे.

४ बनावट दस्तऐवज.

२१६।४४ वतन संबंधें प्रांतांत खोटें महजर होऊन वृत्तीचे बखेडे जाहले आहेत.

216. False documents relating to watans having been forged in the country, many disputes had arisen regarding watans. Balaji Vyankatesh was appointed to inquire into the matter. He was now superseded in the office by Ramchadra Narayan,

A. D. 1797-98.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · सत्यमेव जयते · CSL

इ० स० १७९७।९८ समान तिसेन मया व अलफ मोहरम २०

योविसाचें वगैरे चौकशीचें काम बाळाजी व्यंकटेश योजकडे सांगितलें होतें, तें दूर करून रामचंद्र नारायण यांजकडे सांगितलें असें. तरी चोकशी संबंधें जे आणतील त्यांस आणून मशारनिल्हे यांस राऊत व प्यादे लागतील तसे देऊन कोणी खटला केल्यास ताकीद करीत जाणें, म्हणोन

सनदा पत्रें.

२ सनदा लढ्याचीं कुळें किल्ले मजकुरीं पाठविल्यास ठेऊन चौकशीस मागतील तेव्हां मशारनिल्हेचे हवालीं करीत जाणें म्हणोन.

१ नारो बल्लाळ किल्ले सज्जनगड यांसी.
१ विश्वासराव नारायण किल्ले चंदन.

२

११ चिठणीशीं पत्रें.

१ परशुराम पंडित प्रतिनिधी.
१ भवानी शंकर हैबतराव.
१ नरसो तुकदेव.
१ बाबुराव कृष्ण.
१ सदाशिव अनंत.
१ कृष्णराव अनंत.
१ गंगाधरराव गोविंद.
१ कृष्णाजी थोरात.
१ जानराव नाईक निंबाळकर.
१ शामराव अनंत प्रांत वऱ्हाड.
१ श्रीनिवास रामचंद्र कमावीसदार परगणें शिराळे.

११

१३

रसानगीयादी.

---

७. न्यायखातें.

—:०:—

(ब) फौजदारी (अ) गुन्हे.

५. बदकर्म.

२१७।२ शंकराजी हरि करमरकर याची सून, वेणू विधवा इणे गैररहा वर्तणूक केली सबब

---

217. Shankaraji Hari Karmarkar's widowed daughter-inlaw having misconducted herself, was sent to prison.

A. D. 1795-96.

इ० स० १७९५।९६ तीन तिसेन मय्या व अलफ रजब १७

किल्ले मानगड प्रांत राजपुरी येथें अटकेंत ठेवावयास बरोबर गाडदी राघो विश्वनाथ यांजकडील देऊन पाठविले असे. तरी किल्ले मजकुरीं बंदोबस्तानें अटकेस ठेऊन पोटास शेर शिरस्ते-प्रमाणें देत जाणें. ह्मणोन चिमाजी माणकर यांचे नांवें सनद. १.

रसानगी राघो विश्वनाथ गोडबोले.

---

७. न्यायखातें.

—:०:—

(ब) फौजदारी (अ) गुन्हे.

६. किरकोळ गुन्हे.

२१८।७४ रामचंद्र कृष्ण गोडबोले, यानें आपले तीर्थरूपावर दारूचा मिथ्या आरोप घेऊन सरकारांत समजाविला. तो खोटा पडोन अपराधी ठरला. सबब किल्ले सिंहगड येथें अटकेंत ठेवावयाकारितां पाठविला असे. तरी पायांत बिडी घालून बंदोबस्तानें ठेऊन पोटास शेर शिरस्त्याप्रमाणें देत जाणें. ह्मणोन बाळाजी बाजीराव याचे नांवें सनद. १.

इ० स० १७९८।९९ तिसा तिसेन मय्या व अलफ रमजान ५

रसानगी धोंडो गोविंद गोडबोले.

---

७. न्यायखातें.

—:०:—

(क) पोलीस.

२१९।७ कसबे खेड प्रांत जुन्नर येथें चोरांचा उपद्रव बहुत होतो. सबब त्यांचे बंदोबस्तास बेरड असामी ३ तीन सालमजकुरापासून तेथील शिबंदीचे शिरस्तेप्रमाणें ठेवावयाचे करार केले असेत. त्यांस सदरहु तीन आसामी चाकरीस ठेवून त्यांपैकीं एक आसामीचा मुशाहिरा सनद पैवस्तागिरीपासून सरकारचे ऐवजीं दरसाल देऊन हिशेबीं खर्च लिहीत जाणें व बाकी दोन आसामीचे मुशाहिऱ्याचा आकार होईल तो कसबे मजकूर येथील ब्राह्मण व कुणबी वगैरे दरोबस्त पट्टी करून त्यांजपासून ऐवज घेऊन बेरडास दरसाल देत जाणे. आणि चोरांचा बंदोबस्त यथास्थित राखणें, ह्मणोन बाळाजी वासुदेव कमाविसदार याचे नांवें सनद. १.

इ० स० १७९५।९६ तीन तिसेन मय्या व अलफ. रमजान ५

मोकदम कसबे मजकुर यांस सदरहू अन्वयें सनद. १

२

रसागगीयाद.

---

218. Ramchadra Krishna Godbole having falsely accused his father of drinking liquor was sent to prison.

A. D. 1798-99.

219. The village of Khed being infested by robbers. 3 Berads were sent there for keeping watch. The pay of one of these watchmen was paid by Government, the pay of the rest being raised by subscriptions from the villagers, Brahmins and others.

A. D. 1795-96.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · सत्यमेव जयते · संस्कृति मंत्रालय · भारत सरकार

CSL

७. न्यायखातें.

—:०:—

(ड) तुरुंग

इ० स० १८०६।०७
सबा मयातैन व अलफ
रविलासर ९.

२२०।१९६ केसो मोरेश्वर, मोरो बापुजी फडके यांचे पुत्र यांची स्त्री सौभाग्यवती रखमाबाई गरोदर आहे. त्यास केसो मोरेश्वर स्त्रीसुद्धां जंजीरे रेवदंडा तालुके मजकूर येथें कैदेंत आहेत. तेथें रखमाबाई यास गरोदरपणीं मानत नाहीं याजकरितां तिचे चुलतबंधु वेदमूर्ति जगन्नाथ दीक्षित पाटणकर कायगांवकर यांचे हवालीं तूर्त करावयाची आज्ञा करून हे सनद तुह्मांस सादर केली असे. तरी रखमाबाई यांस दीक्षित यांचे हवालीं करून कबज घेणें ह्मणोन कृष्णा भवानी मामलेदार तालुके रेवदंडा यांचे नांवें सनद. १.

रसानगीयादी.

इ० स० १८१०।११
इहिदे अशर मयातैन व अलफ
सफर १४

२२१।२२९ गंगाभागीरथी अंबाबाई फडके मोरो बापुजी फडके यांची स्त्री किल्ले माहुली येथें अटकेंत आहे. त्यास तीर्थरूप राघो शंकर जोशी हल्लीं वस्ती कसबे पुणें यांस समाधान नाहीं सबब त्यांस भेटावया करितां आणविली असेत. तरी किल्लेमजकुर येथील नेमणुकी शिबंदीपैकीं लोक बरोबर रखवालीस देऊन अंबाबाई फडके यांस हुजूर पोंहचऊन देणें, म्हणोन त्रिंबकजी डेंगळे मामलेदार किल्ले माहुली यांचे नांवें सनद. १.

रसानगीयादी.

---

८. सरकारी कामगार व जहागीरदार यांचें गैरवर्तन.

इ० स० १७९८।९९
तिसा तिसेन मया व अलफ
मोहरम २४.

२२२।७० महालानिहाय प्रांत गुजराथ येथील किल्ले पारनेरा येथील मामलेदार व रयत यांचे न बनें यास्तव रयत हुजूर फिर्याद जाहली सबब मामलतीची जप्ती सरकारांत करून जप्तीची कमावीस बाळोजी कुंजीर यांजकडे सांगितली येविसी सनदा.

---

220. Rakhamabai, wife of Keso Moreshwar who was in prison in fort Rewadanda with her husband being pregnant was ordered to be made over to her relations as the climate of the fort did not agree with her.

A. D. 1806-1807.

221. Ambabai Fadke, wife of Moro Bapuji Fadke, was in prison at fort Mahuli. Her father Ragho Shankar Joshi being ill at Poona she was ordered to be sent to the Huzur in order that she might see him.

A. D, 1810-11.

222. The ryots of Gujarath having complained against their Mamlatdars, the latter were deprived of their offices and Baloji Kunjir was appointed in there place.

A. D. 1798-99.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · संस्कृति मंत्रालय · भारत सरकार

१ आनंदराव भिकाजी यांस कीं, परगणें पारनेरा येथील देखील किल्ला ठाणीं जकिरासुद्धां त्यांचे हवालीं करून कबज घेणें व परगणें मजकूर येथील साल गुदस्ताचा कचा हिशेब यांस समजावणें ह्मणोन सनद. १.

१ रामाजी केशव यांस कीं, परगणें बलसाड व भूतसर व बेहरी येथील सालगुदस्ता सनसमान तीसेनचा हिशेब मशारनिल्हेस समजाऊन महालानिहायचीं ठाणीं जकिरासुद्धां यांचे हवालीं करून कबज घेणें ह्मणोन सनद.

१ हवालदार व कारकून किल्ले पारनेरा यांस कीं, तुम्ही मशारनिल्हेचे रजा तलबेंत वर्तोन अलंग नोबत चौकी पहारा करून पक्कें बंदोबस्तानें राहणें ह्मणोन सनद.

२ जमीदार महालानिहाय यांस कीं, रुजू होऊन अमल सुरळींत देणें ह्मणोन सनदा.

१ परगणा बलसाड व भूतसर व बहेरी यांस.
१ परगणे पारनेरा यांस.
२
५

येकूण पांच सनदा दिल्या असेत. रसानगीयाद.

---

९. इनाम, नक्त नेमणुकी, वतनें वगैरे.

(अ) देणग्या.

१. नोकरी केल्याबद्दल अगर नुकसानी झाल्याबद्दल अगर मेहेरबानी दाखल.

इ० स० १८०१।०२ इसने मय्यातैन व अलफ. मोहरम १४

२२३।१४३ खुसरवांजी वल्लद जमशेटजी पारशी हे सरकार कामाचे उपयोगीं सबब कुटुंबास बेगमीस गांव पेस्तर साल सन सल्लास मयातैन-पासून नूतन इनाम पांच हजार सवासात रुपयांचे कमाल आकाराचा खेरीज हक्कदार व इनामदार करून सरकारांतून करार करून दिल्हे असेत. तरी गांव यांचे हवाली करून यांस व यांचे पुस्त दर पुस्त वंशपरंपरेनें इनाम चालवणें. दरसाल नवीन सनदेचा आक्षेप न करणें. या सनदेची प्रती लिहून घेऊन हे अस्सल सनद यांजवळ भोगवटीयास परतोन देणें, ह्मणोन सनदा पत्रें.

१ रामचंद्र त्रिंबक कमावीसदार यांस कीं, गांव यांचे हवाली करून इनामपत्राप्रमाणें यांजला इनाम चालऊन आकार यांचे

---

223. Khuserwanji Walad Jamsedji Parsi of Khambayat having proved useful
A. D. 1801-2. to Government was given a village valued at R. 5000 for
the maintenance of his family.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · सत्यमेव जयते · संस्कृति मंत्रालय · भारत सरकार

CSL

नांवें परगणें मजकूरचे हिशेबी इनामखर्च लिहीत जाणें, ह्मणोन सनद.

१ खुसरवांजी वल्लद जमशेटजी पारशी यांस कीं, गांव तुह्मीं हवाली करून घेऊन तुम्हीं व तुमचे पुस्त दर पुस्त वंशपरंपरेनें सरकार लक्ष एकनिष्ठपणें राखोन इनाम अनुभवीत जाणें, ह्मणोन सनद.

१ मोकदम मौजे मजकूर यांस. सनद.

१ जमीदार परगणें मजकूर यांस. पत्र.

१ देशाधिकारी व लेखक वर्तमान व भावी परगणे मजकूर यांस. पत्र.

५

येकूण पांच सनदा व पत्रें दिल्हीं असेत. यांस मौजे मजकूरचा कमाल आकार रुपये.—

× × × ×

९. इनाम, नक्त नेमणुकी, वतनें वगैरे.

(अ) देणग्या.

धर्मकृत्यें व नवस.

२२४।४० धर्मादाय दक्षणा श्रावण मास विद्यमान आप्पासाहेब

इ० स० १७९६।९७
सबा तिसेन मया व अलफ.
जिल्हेज ६

रुपये.

१४०१४३ रमण्यांत दिल्ही प्रारंभ इस्तकबील छ० ५ सफर श्रावण शु० ६ सह सप्तमी भौमवार येकुणीस घटका दिवस तागायत छ० ६ सफर शुद्ध ८ अस्तमानपर्यंत ब्राह्मण येकूण रुपये.

९३९२९ दरवाजा पहिला विद्यमान खासा व परशुराम रामचंद्र. ब्राह्मण असामी १३८६० शेरा सरासरी ३॥।=। प्रमाणें रुपये.

२४९०९ दरवाजा दुसरा विद्यमान यज्ञेश्वरशास्त्री. असामी ५९३५ येकूण शेरा ४०≈ प्रमाणें रुपये.

२८४१४ दरवाजा तिसरा विद्यमान माधवराव कृष्ण पानसी. असामी ७९०६ येकूण शेरा ३॥-॥ प्रमाणें रुपये.

३२८९१ दरवाजा चौथा विद्यमान रामचंद्र हरि फडके.

---

224. The ceremony of distributing the Shrawanmas Daxina commenced in the after noon of the 7th of the bright half of Shrawan and ended in the evening of the next day. The Daxina was distributed at 4 doors. The number of Bramins present was 36612 and the amount paid to them was Rs. 140143. Besides Rs. 105847 were paid to 3851 Bramins at the palace.

A. D. 1796-97.

MINISTRY OF CULTURE · GOVERNMENT OF INDIA · सत्यमेव जयते · संस्कृति मंत्रालय · भारत सरकार

CSL

ब्राह्मण असामी ८९११ येकूण शेरा ३।≡
प्रमाणें रुपये.

१४०१४३ शेरा ३॥।-। ३६६१२.

१०७७१३ वाड्यांत दिल्ही व गांवगन्ना पाठविली ते मिळोन. असामी
४०१६ येकूण शेरा सरासरी २६॥।- प्रमाणें तपशील
बंद आलाहिदा १४९. येकुण रुपये.

३२६८ दुखणेकरी ब्राह्मण रमण्यांत गेले नाहींत त्यांस पुण्यांत
घरोघर दक्षणा नेऊन दिल्ही. गुजारत रामचंद्र नारा-
यण सुभा प्रांत पुणें व वेदमूर्ति रामचंद्र दीक्षित गोडबोले
बरहुकूम याद.

२ देवापुढें ठेवले रुपये.

१ श्रीरामचंद्र तुळशीबाग.
-॥- श्री ओंकारेश्वर.
-॥- श्री गणपती कसब्यांतील.

२

३२६६ ब्राम्हण असामी ८८० येकूण रुपये.
३४० प्रत असामी १७० दर २ रुपये प्रमाणें.
८७० प्रत असामी २९० दर ३ रुपये प्रमाणें.
८०८ प्रत असामी २०२ दर ४ प्रमाणें रुपये.
६२५ प्रत असामी १२५ दर ५ प्रमाणें.
३६० प्रत असामी ६० दर ६ प्रमाणें. रुपये.
